एप्रिल — जून 1991
खंड 15, अंक 1

# अर्थसंवाद

- भारतातील औद्योगिक कलह
- दारिद्र्याचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र
- अर्थसिद्धान्त : चुकीचे आणि/वा चकवे
- उत्पादनक्षमतेची संकल्पना
- उद्योगीकरणाकडे झेपावणारे चार देश आणि भारत

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 15, अंक 1

एप्रिल–जून 1991

* प्रमुख संपादक

रवीन्द्र दोशी

* सहाय्यक संपादक

सु. गो. भानुशाली

* संपादकीय मंडळ

विकास चित्रे
अ. रा. पडोशी
सु. दा. तुपे
दि. व्यं. जहागिरदार

* व्यवस्थापकीय पत्रव्यवहार

रवीन्द्र दोशी,
प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर–416 004

## अनुक्रमणिका

1 भारतातील औद्योगिक कलह
**माणिक खेर**

13 [illegible]
**भा. रा. ढेकणे**

22 अर्थसिद्धान्त : [illegible]
**नी. वि सोवनी**

35 [illegible]
**लक्ष्मण बुरंगे**

45 [illegible]
**शि. ना. माने**

55 [illegible]
**मृणालिनी फडणवीस**

65 सांख्यिकी पुरवणी – 12
भारतातील बँक व्यवसाय (७)
**रवीन्द्र दोशी**

■ **कार्यालयीन पत्रव्यवहार :**

( वर्गणी व जाहिरात पाठविणे, अंकाविषयी चौकशी करणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, इत्यादी )

**व्यं. मु. पाटणकर**
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,
' संपदा, ' प्राध्यापक वसाहत, देवपूर, धुळे - 424 002

■ **वर्गणीतील बदल :**

1 एप्रिल 1991 पासून वर्गणीच्या दरात खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे याची परिषदेचे सदस्य आणि ' अर्थसंवाद ' चे वर्गणीदार यांनी कृपया नोंद घ्यावी.

(अ) **परिषदेचे सदस्य**

( 1 ) आजीव सदस्य : रु. 600 ( एकरकमी )
( 2 ) साधारण सदस्य : रु 80 ( वार्षिक )
( 3 ) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 80 ( वार्षिक )
व्यावसायिक संस्था : रु. 150 ( वार्षिक )

[ * परिषदेच्या सदस्यांना ' अर्थसंवाद ' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो. ]

(आ) **' अर्थसंवाद ' वर्गणीदार**

ग्रंथालये : रु. 80 (वार्षिक)

( इ ) **वर्षगणना** 1 एप्रिल ते 31 मार्च.

** वर्गणी डिमांड ड्राफ्ट / मनी ऑर्डरने ' मराठी अर्थशास्त्र परिषद ' या नावाने कार्यवाहांकडे धुळ्यास पाठवावी.

■ **' अर्थसंवाद ' साठीच्या अनुदानाबद्दल आभार**

( 1 ) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
( 2 ) पश्चिम विभागीय केंद्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद

# भारतातील औद्योगिक कलह

माणिक खेर*

मोठ्या उद्योगव्यवसायातून औद्योगिक ताण–तणाव हे अंगभूतच असतात. परंतु अलीकडे मजूर व व्यवस्थापन (मालक) यांचे संबंध रस्सीखेचीचे, डाव–पेचांचे बनत चालल्याने या तणावांना तंटाबखेड्याचे तीव्र स्वरूप येत चालले आहे. कामगारांनी दहशत–वादाचा अधिकाधिक प्रमाणात अवलंब सुरू केला आहे. त्यामुळे एकीकडे मोठे कारखाने सुरू करण्यास भांड–वलदार डळमळू लागले आहेत, आणि विकासाला खीळ बसत आहे तर दुसरीकडे सार्वजनिक सेवा–सुविधांच्या बाबतीत नित्य अडथळे येत राहून साऱ्या समाजाला वेठीला धरले जात आहे.

या तंट्यांचे मूळ व स्वरुप यांचा या लेखात ऊहापोह करावयाचा माझा प्रयत्न आहे.

स्वातंत्र्योत्तर भारतात मोठाल्या (10 हून अधिक कामगार असलेल्या व नोंदणीकृत) कारखान्यांची संख्या आणि एकूण कारखानदारीत असलेल्या काम–गारांची संख्या यावरुन औद्योगीकरण वाढत असल्याचे स्पष्ट आहे (तक्ता 1 पहा). प्रति कारखाना काम–गारांची संख्या मात्र घटत चालल्याचे दिसते. याची दोन कारणे असू शकतात. एक तर नवीन कारखाने मध्यम प्रमाणाकडे झुकत असावेत, किंवा नवीन कार–खाने श्रमधन न राहता भांडवलधन होत असावेत (कदाचित्त अशांत वातावरणामुळे). अर्थात, नवीन कारखान्यांच्या भांडवल गुंतवणुकीच्या तपशिलाअभावी याबाबतीत निश्चितपणे काही सांगता यावयाचे नाही.

औद्योगीकरणाच्या विस्ताराबरोबर औद्योगिक कलहांची संख्या वाढत आहे. कारणानुसार उपलब्ध कलहांचे वर्गीकरण तक्ता 2 मध्ये दिलेले आहे. पण सालोसाल दिलेले आकडे हे पूर्णपणे तुलनीय नाहीत. कारण त्रोटक माहितीवर ते आधारलेले आहेत. 1975 पर्यंत हिंसाचारामुळे निर्माण झालेल्या तंट्यांचे वेगळे वर्गीकरण केलेले नव्हते. ते 'अन्य' या सदरात समा–विष्ट केले आहेत. 'अन्य' या सदरात मोडणाऱ्या

* यू. जी. सी. रिसर्च सायंटिस्ट, सेंटर फॉर इंटर–डिसिप्लिनरी स्टडीज, पुणे विद्यापीठ, पुणे.

**तक्ता 1**

**भारतातील कारखान्यांची वाढ**

| वर्ष | कारखान्यांची संख्या (हजारात) | सरासरी प्रतिदिन कामगारांची संख्या | प्रति कारखाना प्रतिदिन कामगार | प्रति कामगार वास्तव उत्पन्न (रु) (1960-61 च्या किमतीत) |
|---|---|---|---|---|
| 1947 | 15 | 2,230 | 153 | – |
| 1957 | 38 | 3,367 | 89 | 1,150 |
| 1966 | 65 | 4,700 | 72 | 1,398 |
| 1975 | 111 | 5,900 | 53 | 983 |
| 1981 | 141 | 7,003 | 50 | 1,558 |
| 1984 | 167 | 7,600 | 46 | 1,570 |
| 1985 | 176 | 7,710 | 44 | 1,461 |
| 1986 | 179 | 7,794 | 44 | उपलब्ध नाही |

**संदर्भ** : त्या त्या वर्षाचे इंडियन लेबर इयर बुक

तंट्यांचा अधिक तपशील उपलब्ध नाही.

1966 व 1986 या सालांच्या तंट्यांच्या कारणांची ढोबळणे तुलना करता असे दिसते की, कामगारांनी 'आर्थिक' प्रश्नांवरून (वेतन, भत्ते व बोनस) अन्य सुविधांकडे (रजा व कामाचे तास) अधिक लक्ष पुरविण्यास सुरवात केली आहे. 1981 साली हिंसाचाराचे प्रमाण सर्वात जास्त होते. (9 टक्के). त्याचे प्रमाण कमी झाले असले तरी पूर्णपणे नाहीसे झालेले नाही. याचा परिणाम नवीन कारखाना काढावयाचा की नाही, त्याचा विस्तार करावयाचा की नाही याबद्दलच्या निर्णयावर होत असल्याने तो समूळ नष्टच करावयास हवा.

तक्ता 1 वरून असेही म्हणता येईल की, कामगारांचे वास्तव उत्पन्न सर्वसाधारणपणे वाढते आहे. त्याचबरोबर औद्योगिक कलह अधिक दिवस टिकण्याचे प्रमाणही वाढते आहे. 30 दिवसाहून अधिक टिकलेल्या कलहांचे प्रमाण 1951 मधील 7.2 टक्क्यांवरून 1987 साली 30.6 टक्क्यांपर्यंत वाढले आहे (तक्ता 3).

सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे मालक व मजूर असे जिथे संबंध येतात तिथे ताणतणाव अंगभूतच असतो. मग तो घरात असो, उद्योगेतर व्यवसायात असो किंवा औद्योगिक क्षेत्रात असो. याउलट, तणावविरहित संबंध म्हणजे सलोख्याचे संबंध असा अर्थ करता येत नाही. वास्तविक औद्योगिक कलहाचा अभाव हे काही सलोख्याच्या संबंधाचे लक्षण नव्हे. स्वतःचे हित नित्य जपत राहणारे अनेक गट एकत्र आलेले असतात. पण तसे करीत असताना ज्या उद्देशासाठी ते एकत्र येतात त्या उद्देशाला किंवा सामूहिक हितसंबंधाला जिथे डावलले जात नाही असे सहअस्तित्व 'संवादी' संबंधात गृहीत आहे. म्हणजे हे संबंध परस्परांच्या हक्कांवर अतिक्रमण न करणारे, त्यांना धक्का पोचू न देणारे असले पाहिजेत, असा याचा अर्थ होतो. तेव्हा संवादी संबंधाची महत्त्वाची अट अशी की, तंट्याचे स्वरूप धारण करण्याआधीच परस्परातील ताण हे सामोपचाराने मुळातच निपटले जावयास हवेत. मालक–व्यवस्थापन व कामगार या दोघांनीही ही जाण न ठेवल्यामुळे औद्योगिक कलह उद्भवत राहतात. या कलहांची कारणे स्थूलपणे दोन

## तक्ता 2

### औद्योगिक कलहांची कारणे

| कारणे | 1947 | 1958 | 1966 | 1975 | 1981 | 1984 | 1985 | 1986 | 1987 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 वेतन व भत्ते | 574 | 405 | 612 | 611 | 728 | 556 | 383 | 460 | 484 |
| 2 बोनस | 195 | 133 | 181 | 152 | 207 | 162 | 123 | 173 | 135 |
| 3 कामगारविषयक | 349 | 382 | 454 | 421 | 456 | 339 | 340 | 343 | 236 |
| 4 कामगार कपात | – | 53 | 44 | 149 | 94 | 55 | 52 | 73 | 64 |
| 5 हिंसाचार | – | – | – | 171 | 244 | 37 | 31 | 23 | 22 |
| 6 रजा व कामाचे तास | – | 55 | 45 | 44 | 43 | 281 | 274 | 271 | 246 |
| 7 अन्य | – | 444 | 489 | 363 | 681 | 575 | 497 | 445 | 569 |
| 8 माहीत नाही | – | – | – | – | 136 | 89 | 55 | 104 | 43 |
| **9 एकूण नोंदलेले कलह (संख्या)** | **1,118** | **1,472** | **1,825** | **1,911** | **2,589** | **2,094** | **1,755** | **1,892** | **1,799** |
| 10 कलहाचा फटका बसलेल्या कामगारांची संख्या (हजारात) | 1,841 | 694 | 1,003 | 1,143 | 1,588 | 1,949 | 1,013 | 1,645 | 1,770 |
| 11 बुडालेले श्रमदिवस (लाख) | 166 | 56 | 77 | 219 | 366 | 560 | 263 | 327 | 353 |

गटात एकत्र करता येतात. (1) आर्थिक कारणे : मजुरी, बोनस, भत्ते इत्यादी; (2) व्यवस्थापन व कामगार यांच्या अहंकाराला डिवचणारी : कामगार संघटनांना मान्यता, संघटनासंघटनांतून ईर्षा, कामगार संघटनेवर लादलेले किंवा नाकारलेले पुढारीपण इत्यादी. या दोन्ही प्रकारचे प्रश्न सामूहिक सौदाचे करार करताना निर्माण होतात.

सामूहिक सौदा

आपले उत्पादक श्रम व प्रयत्न यांचे फळ म्हणून मिळणाऱ्या नफ्यात आपापला वाटा किती असावा याबद्दलचा कामगार संघटना आणि व्यवस्थापन यांच्यात समझोता करावयाचे सामूहिक सौद्याचे करार हे एक साधन आहे. या व्यवस्थेत वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवरची देवघेव ही स्पष्टपणे भिन्न असते. सामूहिक पातळीवर, कामाबद्दलचे नियमन केले जाते; कामाबद्दलची व्यवस्था, अटी व सुविधा, तसेच कामाशी संलग्न अशा गोष्टींबद्दल कामगार–संघटना व व्यवस्थापन यांच्यात सौदा चालतो. वैयक्तिक पातळीवर व्यक्तीला नोकरी देतानाच्या अटींचा व शर्तींचा विचार असतो परंतु कामगाराला जेव्हा काम करावयाला बंदी केली जाते किंवा कामावरून काढून टाकले जाते

## तक्ता 3

### औद्योगिक कलह टिकण्याचे प्रमाण

(टक्के)

| कालावधी दिवस | 1951 | 1957 | 1968 | 1975 | 1981 | 1984 | 1985 | 1986 | 1987 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 वा कमी | 41.9 | 36.6 | 29.2 | 22.6 | 22.9 | 19.9 | 15 6 | 14 3 | 16.0 |
| 2–5 | 28.5 | 30.0 | 24.1 | 23.0 | 21.3 | 21.3 | 19.8 | 20.0 | 19.5 |
| 6–10 | 12.0 | 12.6 | 14.6 | 13.8 | 12.1 | 13.1 | 14.6 | 13.7 | 11.8 |
| 11–20 | 6.9 | 9.3 | 12.2 | 11.0 | 12.0 | 12.4 | 14.0 | 14.3 | 14.4 |
| 21–30 | 3.5 | 4.4 | 5.8 | 6.2 | 8.7 | 7.3 | 8 1 | 9 4 | 7.7 |
| 30 हून अधिक | 7.2 | 7.1 | 14.1 | 23.4 | 23.0 | 26.0 | 27.9 | 28 3 | 30 6 |
| **एकूण** | **100.0** | **100.0** | **100.0** | **100.0** | **100.0** | **100.0** | **100.0** | **100.0** | **100.0** |

**संदर्भ** : इंडियन लेबर इयर बुकची वार्षिके.

तेव्हा वैयक्तिक देवघेवीला सामूहिक सौद्याचे स्वरूप येते. आधुनिक औद्योगिक संस्थांतून सामूहिक सौदा व वैयक्तिक देवघेव यांचे सहअस्तित्व असते. श्रमिक संघांनी आता नमते घेण्याची वृत्ती टाकून दिली असून आक्रमक वृत्ती धारण केल्याने सामूहिक सौदा पद्धतीत आता दबावतंत्राचा उपयोग केला जात असून त्यातून 'तडजोड व समझोता' असे त्याचे स्वरुप बनले आहे.

श्रमिक संघाला मान्यता देण्याच्या तरतुदी–मुळे सामूहिक सौद्याला बळकटी मिळाली आहे. मालक जेव्हा श्रमिक संघाला मान्यता देतो तेव्हा ती काम-गारांच्यावतीने सौदा करणारी संस्था आहे हे कबूल करतो व त्यामुळे तिच्याशी वाटाघाटी करणे त्याला भाग असते तसेच संघाला मान्यता याचा अर्थ तो कामगारांच्यावतीने सामूहिक आवाज उठवू शकतो व त्यांच्यावतीने सौदा घडवून आणू शकतो.

सामूहिक सौद्यासाठी संघटना करण्याचा हक्क अटळ आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने कामगारांना हा हक्क मिळवून दिला आहे व तो भारतीय राज्य–घटनेच्या कलम 19 (I) (C) मध्ये समाविष्ट केला गेला आहे. त्यामुळे मालकांच्या व कामगारांच्या स्वतंत्र व अव्यच्छिन्न हिताला संरक्षण मिळाले असून सामूहिक सौदा करणे शक्य झाले आहे. परंतु याचमुळे मालक आणि कामगार कोणत्याही संघात समाविष्ट होऊ शकत असल्याने श्रमिक संघही उदंड वाढले आहेत. भारतीय श्रमिक संघ अधिनियम, 1926 नुसार कोणत्याही सात व्यक्तींना संघ स्थापन करावयास मुभा मिळाल्याने या वाढीला हातभारच लागलेला आहे. संघ स्थापण्याविषयीचा विचार जेव्हा कमकुवत होता अशा औद्योगीकरणाच्या सुरु–वातीच्या काळात अशी तरतूद योग्य असेलही. पण तीच आता तिच्या उद्देशाविरुद्ध काम करू लागली आहे.

श्रमिक संघांना मान्यता देऊन सामूहिक सौदा घडवून आणण्यामागे कायद्याचा कोणता हेतू असावा? असा एक प्रश्न येतो. एक तर, त्यामुळे व्यवस्थापनाला वाटेल तसे निर्णय घेण्यापासून परावृत्त करता येते. दुसरे असे की, कामगारांचा सामूहिक

प्रतिनिधी म्हणून व्यवस्थापनाला श्रमिक संघाशी वाटाघाटी करता येतात.

श्रमिक संघांमधील ईर्षा व हिंसाचार यामुळे सौदा करण्यासाठी एकाच संघाला मान्यता देण्याची गरज निर्माण होते. ही गरज भागविण्याचे काम अगदी प्रथम महाराष्ट्र सरकारने "महाराष्ट्र राज्य श्रमिक संघ मान्यता व अनुचित कामगार-आचार प्रतिबंधक कायदा, 1971" असा कायदा करुन केले आहे. या कायद्याखाली व्यवस्थापनाला मान्यताप्राप्त संघाशीच समझोता करार करावयास हवा. व्यावहारिक कारणासाठी व्यवस्थापन सर्व संघांशी सौदा करते पण समझोता करार मात्र मान्यताप्राप्त संघाशीच करते. अन्य संघांशी सौदा करावयास नकार दिल्यामुळे अनेक संप व दीर्घकाळ टाळेबंदी झाल्याचे दिसून आले आहे.

सामान्य परिस्थितीत, वेतन-समझोता करार सर्व मतभेदांना नाहीसे करतो; त्यामुळे तो एक 'शांतता करार' असेच समजायला हवे. परंतु अनेकदा औद्योगिक कलहाचेच तो कारण ठरतो. करार न पाळणे, त्यातील कलमांचा चुकीचा अर्थ लावणे किंवा संघासंघांमधील ईर्षा, यातून असे कलह निर्माण होतात.

## औद्योगिक कलह मिटवणी

कलह मिटविण्यासाठी (तो निर्माण झाल्यावर) भारत सरकारने "औद्योगिक कलह कायदा, 1947" याखाली यंत्रणा उभी केली आहे. यात समेट यंत्रणा ही पहिली पायरी आहे. या कायद्याखाली अस्तित्वातल्या किंवा होऊ घातलेल्या तंट्यात, एका पक्षाने तक्रार केल्याने किंवा स्वतःहून सरकार लक्ष घालू शकते. सार्वजनिक उपयोगिता सेवांमध्ये सर्व कलहात समेट सक्तीचा आहे. रास्त व सलोख्याचा समेट घडवून आणण्याचे समेट अधिकाऱ्यांचे कामच आहे. पण यात समझोता होऊ शकला नाही तर सलोख्याचा समझोता न झाल्याबद्दलचा, अपयश आल्याबद्दलचा सविस्तर अहवाल समेट अधिकाऱ्याने द्यावयास हवा. असा अहवाल आला तरच (योग्य त्या प्रशासन अधिकाऱ्याकडे) हा तंटा अभिनिर्णयासाठी सोपविता येतो. एखादा कलह अभिनिर्णयासाठी सोपवावयाचा की नाही हे ठरविण्याचा अधिकार सरकारच्या अखत्यारीत आहे.

अभिनिर्णयाला समान अशी लवाद यंत्रणाही आहे. योग्य त्या प्रशासन अधिकाऱ्याकडे अभिनिर्णयासाठी सोपविण्यापूर्वी औद्योगिक तंटा लवादाकडे सोपविण्यासाठी कलहग्रस्त पक्ष स्वतःहून अर्ज करू शकतो. प्रत्येक कामगार न्यायालयाकडे लवादांची यादी असते व ते तो तंटा निवडक लवादाकडे सोपवू शकते. तंटा एकदा लवादाकडे सोपविला तर त्याचा निर्णय हा अभिनिर्णय ठरतो. यात फरक एवढाच आहे की, लवादासाठी स्वतःहून अर्ज केला तर, औद्योगिक आणि राष्ट्रीय न्यायाधिकरणे (ट्रायब्युनल्स), कामगार न्यायालयातील पीठासन अधिकारी (प्रिसायडिंग ऑफिसर्स) यापैकी कुणालाही लवाद म्हणून निवडण्याची तंटग्रस्त पक्षाला मुभा मिळते. लवादातर्फे मिळविलेल्या निवाड्याला मात्र काही मर्यादा पडतात. त्यात गुंतलेल्या संघाच्या सभासदांना तेवढा तो लागू पडतो. जो संघ त्यात पक्षकार असत नाही त्याच्या सभासदांना तो निवाडा लागू होत नाही.

## समेट यंत्रणा

अभिनिर्णय मिळविण्याला समेट ही पहिली पायरी, अशीच सर्वांची समजूत असल्याने समेट यंत्रणेकडे फारसे कुणी लक्ष देत नाही; किंवा तिचा गंभीरपणे विचार केला जात नाही. उलट, ठराविक काळात निर्णय द्यावा असे न्यायाधिकरणावर बंधन नसल्याने, त्यासाठी कालमर्यादा नसल्याने, तसेच अभिनिर्णयासाठी एखादा तंटा सोपवावयाचा की नाही हे सरकारच ठरविणार असल्याने औद्योगिक कलह मिटविण्याच्या या यंत्रणेवरचा सर्वसाधारणपणे विश्वास नाहीसा झाला आहे.

कलह मिटविण्याच्या सरकारी यंत्रणेचा उपयोग करावयाला कलहग्रस्त पक्ष का नाराज असतात याची कारणे पाहणे इथे उचित ठरेल. पहिले कारण असे की, ही यंत्रणा अतिशय वेळकाढू आहे. समेट व्यवस्थेत पाच टप्प्यांतून कालापव्यय होतो. (1) समेट अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप, (2) प्राथमिक चौकशी, (3) समेटासाठी मागण्यांची निवड व स्वीकृती, (4) समझोता झाला की त्यात अपयश आले याबद्दलचा अहवाल आणि (5) अभिनिर्णयासाठी सरकारी मान्यता, असे हे पाच टप्पे आहेत.

प्रस्तुत लेखिकेच्या आधीच्या एका पाहणीत असे दिसून आले आहे की, मागणीपत्र सादर झाल्यावर 25 दिवसातच व्यवस्थापनाने समेट अधिकाऱ्याच्या हस्तक्षेपाची मागणी केली होती. म्हणजे व्यवस्थापन श्रमिक संघाला काही किंमत देत नव्हते. त्यांच्या मागण्यांकडे केवळ दुर्लक्ष करीत होते. कामगार आयुक्तांच्या कार्यालयाने प्राथमिक चौकशीसाठी आणखी पंधरवडा घेतला. समेटासाठी एखादा तंटा घ्यावयाचा की नाही आणि कोणत्या मागण्या त्यासाठी निवडावयाच्या हे समेट अधिकाऱ्याच्या इच्छेवर अवलंबून असते. या टप्प्यात समेट अधिकारी बराच वेळ ( सरासरीने 88 दिवस ) खातात असे दिसते.

औद्योगिक कलह कायद्यात कलम 12(6) नुसार आयुक्तांनी हस्तक्षेप करावा असा अर्ज केल्याच्या 14 दिवसात समेट कार्यवाही पुरी करावी असे म्हटले आहे. हे केवळ अशक्य आहे. म्हणून प्रशासकीय आदेशाने तीन महिन्यांची मुदत दिली आहे. यातही एक पळवाट आहे. कलहग्रस्त पक्षांनी जर मान्यता दिली व ती समेट अधिकाऱ्यांनी मान्य केली तर ही मुदतही वाढविता येते.

अशा ठरविलेल्या मुदतीतही कलह मिटत नाही हे आता उघड झाले आहे. वरील पाहणीनुसार अपयश आल्याचा अहवाल द्यायला समेट अधिकारी चार-एक महिने घेतात असे दिसून आले आहे. इतकाच वेळ अभिनिर्णयासाठी कलह पाठवावयाचा की नाही हे ठरविण्यासाठी सरकारी अधिकारी घेतात. एकदरीने पाहिले तर, कामगार आयुक्तांचा हस्तक्षेप मागितल्या तारखेपासून, समेट अधिकाऱ्याला समेटाकरिता मागण्या निवडावयाला 105 दिवस लागले; अपयश आल्याचा अहवाल द्यायला 235 दिवस लागले; आणि अभिनिर्णयासाठी तंटा पात्र आहे की नाही हे कळवावयाला सरकारला एक वर्षावर अवधी लागला. ( सगळ्यांना त्रिपक्षीय समझोता हवा आहे असे गृहीत धरले तर) मागणीपत्रक दिल्या दिवसापासून औद्योगिक कलह सुरू झाला असे समजले तर, तो अभिनिर्णयासाठी सोपवावयाला योग्य आहे हे ठरविण्यात 393 दिवस मोडले.

याहून (औद्योगिक कलह कायद्याच्या 2 ए कलमाखाली) औद्योगिक गाऱ्हाण्यांचा (ग्रीव्हन्स) निकाल लवकर लागतो. समेट अधिकाऱ्यांनी अपयश आल्याचा अहवाल देण्यात 64 दिवस तर तंटा अभिनिर्णयास सोपविण्याला नकार देण्यास सरासरीने 80 दिवस घेतले. नकार देण्यास जास्त दिवस लागले याचे कारण त्यासाठी निर्णय विधीचा ( केस लॉ ) अभ्यास करावा लागतो व भक्कम कारणे द्यावी लागतात. परंतु कामगार आयुक्तांच्या कार्यालयाची पीडित कामगाराने मदत मागितल्या दिवसापासून, अभिनिर्णयात न्याय मिळवा हे कळायला 209 दिवस मोडले. असा दीर्घ काळ मोडत असल्याने दोन्ही पक्षातला वैरभाव किंवा आकस वाढत जातो आणि कलह मिटविण्याच्या यंत्रणेवरचा विश्वासच उडत जातो. ज्या पक्षाची कसूर आहे तो पक्ष 'वेळ काढण्यासाठी' किंवा अभिनिर्णयासाठी जाण्याची पहिली पायरी म्हणूनच या यंत्रणेला उपयोग करीत राहतो.

सर्वसामान्य मागण्यांसंबंधी जे तंटे असतील त्यासंबंधातील समेटासाठी कोणत्या मागण्या स्वीकारावयाच्या व कोणत्या नाही हे ठरविणे समेट अधिकाऱ्याच्या इच्छेवर अवलंबून असते. हा स्वेच्छा-अधिकार कशा रितीने वापरावयाचा यासंबंधी कोणतेही निदेश नसल्याने त्याचा प्रत्यक्षात विपर्यस्त वापर झाल्याचे आढळून आले आहे.

समेट यंत्रणेचा अन्य तऱ्हेनेही उपयोग केला जातो समेट अधिकाऱ्यापुढे समझोता घडवून आणला तर तो कायदेशीरपणे बंधनकारक ठरतो त्यामुळे समझोता करणारे पक्ष आपसात समझोता करुन समेट अधिकाऱ्याकडे जात राहतात. त्यामुळे नोटीसा पाठविणे, समेटासाठी तंटा स्वीकारणे, इत्यादी सोपस्कार समेट अधिकाऱ्यास करावे लागतात. परिणामी, खरोखर तंटा असणाऱ्या प्रकरणाकडे दुर्लक्ष होते.

अभिनिर्णय ( ॲड्जुडिकेशन )

समेट अधिकाऱ्यापुढे तंटा मिटला नाही तर औद्योगिक कलहात न्याय मिळवून देणारी, औद्योगिक कलह कायद्यानुसार, सक्तीच्या अभिनिर्णयाची यंत्रणा ही शेवटची संधी आहे. समेट यंत्रणेत अनौपचारिकता अधिक असते तर अभिनिर्णय यंत्रणेत केवळ कायदे-

चीरपणाच असतो. अभिनिर्णय यंत्रणेत न्यायाधिकरण (ट्रायब्यूनल), कामगार न्यायालय आणि औद्योगिक न्यायालय निर्माण केलेली आहेत. त्यांच्याकडे कशा प्रकारचे तंटे सोपवावयाचे हे औद्योगिक कलह कायद्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या परिशिष्टांतून नमूद केलेले आहे यात वित्तीय तंटे (बोनस, मजुरी, भविष्य निर्वाह निधी इत्यादी), मजुरांचा असंतोष (संप, कामगार कपात, टाळेबंदी इत्यादी) व शिस्तभंग (स्थायी आदेशासंबंधीचे इत्यादी) या गोष्टींचा समावेश आहे. योग्य त्या अधिकाऱ्यांनी सुपूर्त केले तरच न्यायाधिकरण अभिनिर्णय देऊ शकते. न्यायाधिकरणाची अधिकारकक्षा सुपूर्त कलहापुरतीच मर्यादित आहे.

अभिनिर्णय यंत्रणाही विलंबकारी व यात गुंतलेले पक्ष अनेकदा शब्दांचा केवळ कायदेशीर कीस काढण्यात, शब्दच्छल करण्यात, गुंतलेले आढळतात. काही वेळा मूर्खासारखी प्रतिकथने केली जातात आणि अशी प्रकरणे न्यायालये कशी दाखल करुन घेतात याचे आश्चर्य वाटते. उदाहरणार्थ, प्रेमिअर ऑटोमोबाइल्स कामगार संघटना व इतर विरूद्ध प्रेमिअर ऑटोमोबाइल्स कंपनी हे प्रकरण घेऊ यात व्यवस्थापनाने कारखान्यातील दोन विभागातून काम बंद ठेवले व मजुरी दिली नाही. कंपनीने समझोता करार पाळला नाही व अनुचित आचार केला असा श्रमिक संघाने दावा घातला. यावर व्यवस्थापनाचे उत्तर असे की, अनुचित आचार (झाला असल्यास) करार सुरु झाला तेव्हाचा असून तो करार सुरू झाल्यानंतरच्या मध्यंतरातला आहे, म्हणून तो अनुचित आचार होतच नाही तेव्हा न्यायालयाला असा निर्णय द्यावा लागला की, अनुचित आचार मग तो कराराच्या सुरुवातीपासून असो की, नंतर केव्हाही मधल्या काळात, महाराष्ट्र राज्य श्रमिक संघ मान्यता व अनुचित कामगार आचार प्रतिबंधक कायद्याखाली तो अनुचित आचारच ठरतो. काही वेळा व्यवस्थापन आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन नको त्या बदल्या करते व कायम नोकरांना असणाऱ्या सुविधा व दर्जा मिळवून देण्यास कामगारांना प्रतिबंध करते. उदाहरणार्थ, म्हापसेकर व शिंदे विरुद्ध फेमस सिने लॅबॉरेटरीज हे प्रकरण घेऊ कायद्यातला शब्द 'प्रॅक्टिसेस' हा अनेकवचनी आहे, एकवचनी नाही तेव्हा तो विशिष्ट एका कामगाराला लागू पडत नाही, तर एकाहून अधिक कामगारांच्या समुच्चयाला लागू पडतो. असल्या मूर्खासारख्या युक्तिवादाला न्यायालयाने फेटाळून लावले व अनेकवचनी शब्दात एकवचनी शब्दही अनुस्यूत आहे असा निर्णय दिला. अशी अनेक उदाहरणे देता येतील. पण जागेअभावी ती देत नाही. जिज्ञासूंनी माझे 'लेबर–मॅनेजमेंट कोर्ट बॅटल्स' ("मजूर–व्यवस्थापन यांची न्यायालयातील युद्धे") हे पुस्तक पाहावे.

कालौघात औद्योगिक कलहाचे स्वरुप बदलत राहिले आहे. संपाचे नवनवे मार्ग शोधले गेले असून कोणती कृती संप या सदरात मोडते हे न्यायालयांना ठरवावे लागले आहे. निर्णयविधीवर (केस लॉ) वरवर जरी दृष्टिक्षेप टाकला तरी केवळ तांत्रिक बाबींवरुन–संपाची योग्य ती आगाऊ नोटीस दिली आहे की नाही, संप मिटविण्यासाठी सरकारी यंत्रणेचा योग्य उपयोग केला गेला आहे की नाही अशासारख्या बाबींवरुन–संप कायदेशीर होता का नव्हता याचा निर्णय घेतला गेला आहे. खरे तर, संप घाईने पुकारला जाऊ नये व तो टाळण्याचा सर्व तऱ्हेचा प्रयत्न केला गेला जावा एवढ्यासाठी ही कलमे आहेत. तेव्हा कायदेशीर कलमान्वये संप झाला की नाही हे ठरविताना संपाच्या कार्यपद्धतीचा सांगोपांग विचार झाला आहे आणि काम कितीही दिवस ठप्प होऊन राहो, संपाच्या व्याख्येनुसार सर्व कायदेशीर बाजू सांभाळल्या गेल्या तरच कामगारांची कृती संप या सदरात मोडते. (बकिंगहॅम व कर्नाटिक कं. लि. विरुद्ध तिचे कामगार, 1953 **SCR** 219).

संपाचा कायदेशीरपणा व समर्थनीयता

तत्वतः बेकायदेशीर पण तरीही समर्थनीय असा संप असू शकत नाही. पण न्यायालयानी या दोन्ही गोष्टी व्यवच्छेदक मानल्या असून त्यातून काहीशी व्यक्तिसापेक्षता आढळून येते. पहिल्या प्रथम जेव्हा न्यायाधीकरणाकडून अशी चूक घडली तेव्हा अशा बिगर–न्यायिक दृष्टिकोनाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने टीका केली होती आणि कायदेशीर आणि समर्थनीय भिन्न असत नाहीत असे म्हटले होते. (चंद्रमलाई इस्टेटचे व्यवस्थापक वि. तिथले मजूर – 1960 **SCR** 451), परंतु नंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांची व्यवच्छेदकता मान्य केलेली आढळते. 1959 ते 1990

या काळातील विविध लॉ जर्नल्समधून नमूद केलेल्या संपाची समर्थनीयता व कायदेशीरपणा दाखविणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या 36 प्रकरणांचे पुढीलप्रमाणे विवरण करता येते. 1959 पूर्वी असे व्यवच्छेदीकरण केलेले नव्हते.

**तक्ता 4**

**संपाची समर्थनीयता व कायदेशीरपणा**

| | समर्थनीय | असमर्थनीय | एकूण |
|---|---|---|---|
| कायदेशीर | 6 | – | 6 |
| बेकायदेशीर | 8 | 22 | 30 |
| **एकूण** | **14** | **22** | **36** |

संपाचा कायदेशीरपणा सर्व तांत्रिक बाबी काटे–कोरपणे पाळल्या गेल्या आहेत की नाहीत यावरून ठरविला गेला आहे. संपाची पूर्वसूचना द्यावयाची मुदत बरोबर पाळली गेली आहे की नाही व कायद्यात असलेल्या समेट यंत्रणेचा तंटा मिटविण्यासाठी पुरेपूर उपयोग करण्याचा प्रयत्न केला गेला आहे की नाही, या त्या तांत्रिक बाबी होत. समर्थनीयतेची संकल्पना संपकाळात मजुरी द्यावयाची की नाही आणि काढून टाकलेल्या कामगारांना परत घ्यावयाचे की नाही याबाबतीत वापरली गेली आहे. या संकल्पनेचा विचार दोन बाजूंनी केला गेला आहे. एक, संपाची क्रिया समर्थनीय आहे की असमर्थनीय यासाठी पुढील निकष लावले गेले आहेत. उद्योगाचा प्रकार, मागण्यांची निकड, अन्य कायद्यातील यासमान तरतुदी इत्यादी. दुसरी बाजू अशी की, जिथे संप बेकायदेशीर आहे तिथे कामगारांच्याविरुद्ध व्यवस्थापनाने केलेली कारवाई रास्त होती की नाही. या दोन्ही बाजूंनी समर्थनीयतेचा विचार करताना न्यायालयांनी संपाच्या बेकायदेशीर–पणाबद्दल सौम्य दृष्टिकोन ठेवला आहे व कामगारांना क्षमाशीलतेने वागविले आहे. सामान्यपणे संपाची समर्थनीयता ठरविताना पुढील निकष लावले आहेत :

1 मागण्यांचे स्वरूप (यात वेतन इत्यादी संबंधीच्या रास्त मागण्या येतात).

2 संपकाळात मजुरांचे वर्तन.

3 तंटा मिटविण्यासाठी सर्व कायदेशीर तरतुदींचा उपयोग केला आहे की नाही.

4 कामगारांची गाऱ्हाणी निपटण्यासाठी व्यवस्थापनाची पद्धत.

समर्थनीयता ठरविताना न्यायालयाची वस्तुनिष्ठता नाहीशी झालेली दिसते व काही वेळा चुकीचे अर्थ लावले गेले आहेत. उदाहरणार्थ, " संप हा अर्धा समर्थनीय व अर्धा असमर्थनीय असल्याने कामगारांना अर्धीच मजुरी द्यावी " असे जेव्हा न्यायालीकरण सांगते तेव्हा हे स्पष्ट होते.

संपात भाग घेतल्यामुळे बडतर्फ कामगारांचा विचार न्यायालय कामगारांच्या बाजूने सहानुभूतीने करते. पण ' मंदगतीने काम ' यासारख्या गैरवर्तनाची गंभीरपणे दखल घेते (मोतीपूर साखर कारखान्याचे कामगार वि. मोतीपूर साखर कारखाना- AIR, 1965 SC 1803). ' मंदगतीने काम ' ही लबाडी कुटिल–नीतीत मानली गेली असून त्याला चिथावणी देणे हीदेखील शिक्षापात्र कृती ठरविली गेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने 1959 सालीच ' मंदगतीने काम ' हे गैरवर्तन असे ठरविले होते तरी ' भारतीय औद्योगिक कलह कायद्यातील ' कामगारांच्या गैरवर्तनासंबंधीच्या परिशिष्टात दिलेल्या यादीत त्याचा समावेश करावयाला 1982 साल उजाडले. भारतीय कायद्यातील हे परिशिष्ट ' महाराष्ट्र राज्य श्रमिक संघ मान्यता व अनुचित कामगार आचार प्रतिबंधक कायदा 1971' यावरून घेतले आहे. परंतु आश्चर्य असे की, ' भारतीय औद्योगिक कलह कायद्यात ' मंदगती कामाची ' व्याख्या दिलेली नाही. ती ' आवश्यक सेवा परिरक्षा कायदा, 1981 ' यात दिली आहे. पण हा कायदा मर्यादितपणे लागू पडतो. कायदा बदलण्याची प्रक्रिया किती विलंबकारी आहे हेच यावरून सिद्ध होते. कायद्याचा न्यायालय जो अर्थ लावते तो दीर्घकाळ टिकून राहतो पण त्यामुळे कायद्यात तसा बदल घडवून आणावा असे कुणा खासदारांना वाटलेले नाही; त्यासाठी कुठल्या विधिमंडळाने वा लोकसभेने पुढाकार घेतलेला नाही. यामुळेच घातपातासाठी कामगार शिक्षापात्र ठरूनही योग्य त्या तरतुदींच्याअभावी सर्वोच्च न्यायालयाला तसा निर्णय

देता आलेला नाही. (रोहटक इंडस्ट्रीज लिमिटेड विरुद्ध रोहटक इंडस्ट्रीजचे कामगार व इतर, 1975, 3 SCR 12).

अलीकडे कामगार घातपाताकडे व हिंसाचाराकडे वळलेले आहेत. हे गिरणी कामगारांचा संप (1982) व पुण्यातला टेल्कोतला संप (1989) यावरून स्पष्ट होते. गिरणी कामगारांच्या संपात नेत्यांचे राजकारण व संघासंघांमधील वैर उघड होते. वर्गणी कुणी गोळा करावयाची याविषयी दत्ता सामंतप्रणीत श्रमिक संघाला मान्यता मिळविण्यापायी कामगारांवर हल्ले, भोसकाभोसकी व धाकदपटशा यांचा सर्रास अवलंब केला गेला होता. वर्षानंतर हा संप फिसकटला. पण त्यामुळे कित्येक कामगार धुळीला मिळाले. बेकारी, उपासमार व कर्जबाजारीपणा याशिवाय कामगारांच्या पदरात काही पडले नाही. टेल्कोच्या संपात भोसकल्याच्या व मोठाल्या दुखापती केल्याच्या 47, मोठाल्या इजा केल्याच्या 53, सामान्य इजा केल्याच्या 78, व अन्य प्रकारच्या 49 अशा एकूण 227 तक्रारी नमूद होत्या. दहशत एवढी होती की, मिरचीची पूड डोळ्यात टाकणे, नागवे करणे व अंगलटीस येणे असे अनेक क्रूर प्रकार आचरिले गेले. यात टेल्को कामगारांच्या बायकाही मागे नव्हत्या. वाहतूक थोपविण्याबरोबरच बस जाळण्याचाही त्यांनी प्रयत्न केला होता. राजकारण्यांचा हात, पोलिसांची फूस याशिवाय गोष्टी इतक्या थराला जात नाहीत असे वाटते. पण अशा दहशतवादामुळे मुंबईत कापड गिरण्या मोडकळीस आल्या तर पुण्याला टेल्को व त्यावर अवलंबून असणारे 3,300 छोटे कारखाने, 10–12 हजार कामगार कुटुंबे यांना चांगलीच झळ पोचली. या तीन महिन्याच्या संप काळात पिंपरी–चिंचवड नगरपालिकेचे जकात उत्पन्नाचे दोन–अडीच कोटींचे नुकसान झाले.

आपल्या दहशतवादी आणि घातक वर्तनाचे दीर्घकाळ परिणाम किती होतात याची कामगार पुढारी व कामगार यांना कल्पनाच येत नसावी इतके ते स्वार्थांध बनले आहेत. नवीन उद्योगांना त्याचा चांगलाच फटका बसतो. हे उद्योगांना मिळणाऱ्या आर्थिक संस्थांच्या मदतीच्या प्रमाणावरून कळून येईल. उदाहरणार्थ, 1981–82 सालात या मदतीत महाराष्ट्राचा 16.4 टक्के, पश्चिम बंगालचा 5.9 टक्के व गुजरातचा 7.5 टक्के वाटा होता; 1988–89 त महाराष्ट्राचे प्रमाण घटून 11.9 टक्क्यांवर आणि प. बंगालचे 3.2 टक्क्यांवर आले तर गुजरातचे प्रमाण 14.5 टक्के इतके वाढले. नवीन उद्योगांसंबंधीचे निर्णय औद्योगिक संबंधांच्या परिस्थितीवर अवलंबून राहतात. नवे उद्योग न निघाल्याने आपलेच अंतिम नुकसान होते हे कामगारांना कळेल तो सुदिन !

संपाची सर्वोच्च न्यायालयाने आता गंभीर दखल घेतलेली आहे. अलीकडच्या बँक ऑफ इंडिया विरुद्ध केळावाला व अन्य तसेच एस. यू. मोटर्स लि. विरुद्ध त्याचे कामगार या दाव्यांच्या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :

"कामगारांच्या हाती असलेल्या संपाच्या हत्याराच्या कायदेशीरपणाची व संपकाळात होणाऱ्या मजुरीच्या नुकसानीची गल्लत करण्यात आली आहे. मजुरीच्या नुकसानीमुळे संप हत्यार म्हणून बेकायदेशीर ठरत नाही किंवा तो हक्क हिरावलाही जात नाही. कामगार परिणामांची पूर्ण जाणीव ठेऊनच संपावर जातात. संपकाळात नोकरीसंबंधीचा करार चालू असतो पण कामगार आपले श्रम देत नाहीत. म्हणून संपकाळातही वेतन मिळावे अशी त्यांना अपेक्षा करता येत नाही."

बँक ऑफ इंडियाच्या नोकरांच्या वकिलाने असा दावा मांडला होता की, या नोकरांनी चारच तास काम थांबविले होते व म्हणून त्यांचे वेतन चार तासांपुरते कापले जावे. परंतु सर्वोच्च न्यायालयाने कामाचा उद्देश व ते थांबविल्यामुळे होणारे परिणाम यांची दखल घेतलेली आहे. त्यांच्या मते, "या गर्दीच्या चार तासांमुळेच त्यांचे दिवसभराचे काम निर्माण होते. म्हणून या चार तासाचे काम थांबविणे म्हणजे दिवसभर काम न करण्यासारखे होय. नंतरच्या वेळात हजर असण्याला काहीच अर्थ नाही. या चार तासात ज्यांच्यासाठी बँकिंग सेवा अस्तित्वात आली आहे त्या सामान्य लोकांना दीर्घकाळ प्रचंड गैरसोय सोसावी लागते ते वेगळेच."

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाने हे सिद्ध झाले की नेमून दिलेले काम करण्यासाठी कामगारांना वेतन दिले जाते; केवळ हजेरी देण्याकरिता नाही. या

निकालात काम थांबविण्याच्या विविध प्रकारांची दखल घेतलेली आहे. नेहमीचे श्रमोत्पादन धीमेपणाने करण्याचाही त्यात समावेश आहे. कित्येकदा, पूर्ण काम थांबविण्यापेक्षाही धीमे काम हे धोकादायक आहे, कारण त्यामुळे सगळ्या यंत्रणेलाच हानी पोचते.

धीमे काम

आपली गाऱ्हाणी निपटण्याचे धीमे काम हे कामगारांचे हत्यार आहे असे कधीच मान्य झालेले नाही. धीम्या कामामुळे किती आर्थिक नुकसान होते व त्यामुळे त्या प्रमाणात किती वेतन कापावे हे निश्चित करण्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने शंका व्यक्त केली आहे. आधुनिक युगात या शंकेला फारसा अर्थ नाही. औद्योगिक अभियांत्रिकीमुळे (इन्डस्ट्रियल एन्जिनिअरिंगमुळे) व प्रमाणभूत दरडोई तास व दर यंत्र–तास यानुसार उत्पादकता व उत्पादन मोजता येते. यात कामगार व व्यवस्थापन या दोघांच्या चुकांची, कसुरींची वेगवेगळी दखल घेता येते. प्रमाणभूत उत्पादनाचे दरडोई तास व श्रम–खर्च काढता येणे शक्य असल्याने प्रत्यक्ष नुकसानीचा अंदाज बांधणे व त्यानुसार मजुरी कापणे कठीण पडू नये.

आश्चर्य असे की, काम न केल्याने वेतन कापण्याचा व्यवस्थापनाचा हक्क सर्वोच्च न्यायालयाने मान्य करूनही मासिक वेतनाच्या पाच टक्क्यांपेक्षा अधिक वेतन कापले जाऊ नये, असे जेव्हा ते सांगते तेव्हा वेतनकपातीच्या शिक्षेला काहीच अर्थ रहात नाही.

तेव्हा संघटित कामगारांच्या बेजबाबदार वर्तनाचा सौम्यपणे किंवा उदारपणे विचार करावयाचे सर्वोच्च न्यायालयाने व सरकारने सोडले पाहिजे. एकंदर देशाचा विचार करता बेशिस्त, घातपात, हिंसा व काम थांबविणे अशा गैरवर्तनाची गंभीरपणे दखल घेतली गेली पाहिजे व 'ना काम ना वेतन' या धोरणाची कायदेशीर तरतूद करून अमलबजावणी करावयास पाहिजे.

टाळेबंदी

संपामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्याचा मालकांच्या हातात असलेला कायदेशीर उपाय म्हणजे टाळेबंदी होय. तेव्हा संप व टाळेबंदी ही परस्पर विरोधी होत असा विचार रूढ आहे. परंतु व्यवहारतः याला काही आधार नाही. संपाचे हत्यार असंतोषाचा एकदम स्फोट करणारे, घातपाताकडे रेटणारे आक्रमकपणे वापरले जाणारे हत्यार आहे. उलट टाळेबंदी हे स्वतःचे व संप न करणाऱ्या कामगारांचे जीवित व मालमत्तेचे रक्षण व्हावे म्हणून वापरलेले बचावात्मक साधन आहे. कामगारांना धडा शिकवावा म्हणून टाळेबंदी क्वचितच वापरता येते. कारण, यात मालकाचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले असतात. काही वेळा असे म्हटले जाते की, तुंबलेल्या मालसाठ्याचा उठाव व्हावा म्हणून मालक टाळेबंदी करतात. परंतु त्यासंबंधी माहिती मिळत नसल्याने या म्हणण्याला दुजोरा देणे जड जाते. यामुळे टाळेबंदीचा निर्णयविधी सोपा व संपासारखा फारसा खाचाखोचा नसलेला आहे. टाळेबंदीचा कायदेशीरपणा ठरविण्यास मालकाचा हेतू उद्योग बंद करण्याचा व त्याच्या कामगारांना बेकार करण्याचा आहे काय एवढे बघणे पुरेसे होते. याच दृष्टीने न्यायालयांनी मालकाचा हेतू जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. टाळेबंदी कायदेशीर ठरली तर कामावरून काढून न टाकताही मालकाने वेतन दिले नाही तरी चालते. अपरिहार्य कामबंदी (ले ऑफ) व उद्योगसमाप्ती (क्लोजर) यांहून टाळेबंदी भिन्न असल्याने टाळेबंदीचा हेतू उद्योग बंद करावयाचा नाही एवढेच न्यायालयांना पहावे लागते.

धीमे काम किंवा कामगारांच्या जीविताला धोका देणारे व कंपनीचे भलतेच आर्थिक नुकसान करणारे कामगारांचे गैरवर्तन व अपराध यामुळे जर टाळेबंदी केली गेली असेल तर अशी टाळेबंदी करण्याचा मालकाला हक्कच आहे हे न्यायालयांनी मान्य केलेले आहे. (एन्जिनिअरिंग मजदूर सभा वि. एस. टाकी वेलस्वामी व अन्य – AIR, 1970, Bom 402).

संपातल्याप्रमाणेच टाळेबंदीबाबतही कायदेशीर आणि समर्थनीय असा भेद करण्याचा न्यायालयांनी प्रयत्न केला आहे. परंतु त्यांच्या तपशीलात शिरावयाची इथे आवश्यकता नाही.

काही उपाय

येथवर औद्योगिक कलहाचे प्रकार, कारणे व ते

मिटविण्याच्या पद्धतींचा विचार केला. कामगारांची आक्रमकता, काम थांबविण्याची रीत, हिंसा व टाळेबंदी यामुळे केवढी हानी झाली आहे हेही आपण पाहिले. यामुळे औद्योगिक संबंध कसे सुधारतील याचा सर्वांनीच तातडीने विचार करावयास हवा. शिक्षात्मक आणि निवारक असे उपाय तावडतोब अमलात आणणे अपरिहार्य झाले आहे. त्यातील काहींचा विचार पुढे देत आहे.

(1) कामगारांना स्वतःच्या कारखान्यात भाग भांडवल गुंतवू दिले तर मालकी हक्काची जाणीव राहून कामगार मन लावून काम करतील अशी एक कल्पना आहे.

केंद्र सरकारने 1985 साली दोन योजना जाहीर केल्या. त्या ऐच्छिक आणि सक्तीची कर्मचारी कर्जरोखे **पर्याय** योजना होत्या. ऐच्छिक योजनेत कायम कर्मचाऱ्यांनी ( व्यवस्थापकही आले ) दरसाल रु. 500/1,000 / 2,000 या प्रमाणात पाच वर्षे बचत करावयाची. या ठेवी कंपनीच्या 'कर्मचारी परिवर्तनीय कर्जरोख्यात' गुंतवावयाच्या. हे कर्जरोखे विकता येणार नाहीत किंवा त्यांचे हस्तांतरण करता येणार नाही. तीन वर्षानंतर या कर्जरोख्यांचे भाग भांडवलामध्ये रूपांतर करता येईल. ही योजना कंपनी नवीन भाग-भांडवल उभे करते तेव्हा लागू होईल व त्याला कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज यांची संमती लागेल. उभे करावयाच्या एकूण भाग भांडवलाच्या पाच टक्के भाग भांडवल कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवले जाईल, व ते जर कुणी घेतले नाही तर सर्वांना खुले राहील.

(2) वि. म. दांडेकर यांनी 'कर्मचारी रोखे **मालकी** योजना' सुचविलेली आहे. त्यांच्या मते दोन तऱ्हेने या योजनेचा पुरस्कार करता येईल. पहिल्यात, कर्मचाऱ्यांचा भविष्यनिर्वाह निधी त्यांच्या त्यांच्या कंपनीच्या भाग भांडवलात गुंतवावयाचा. दुसऱ्यात, विविध कंपन्यांतील भविष्यनिर्वाह निधी एकत्र करून तो एकत्रितपणे रोख्यांतून गुंतवावयाचा. त्यामुळे कर्मचारी मालक होऊ शकतील. या दुसऱ्या पर्यायात भविष्यनिर्वाह निधीचा कंपनीचा भाग अन्य कंपन्यांतून गुंतविण्यास कंपनीचा विरोध होऊ शकेल. त्यासाठी निधीतील कंपनीचा भाग त्याच कंपनीच्या भाग भांडवलात तर कर्मचाऱ्यांचा भाग अन्य कुठल्याही स्थिर व लाभदायक कंपनीत गुंतविता येईल. युनिट ट्रस्टच्या अशा योजनेत तरी भाग घेता येईल. अशा रितीने 535 मोठाल्या सार्वजनिक मर्यादित कंपन्यांचे कर्मचारी मालक बनू शकतील.

स्वतःचा भविष्यनिर्वाह निधी अशा रितीने गुंतवून जोखीम स्वीकारण्यास कर्मचारी तयार होतील की नाही याची मला शंका वाटते. शिवाय अशा प्रकारच्या मालकीपणात, स्वतःचे काम व मालकीपणाची भावना यांचा प्रत्यक्ष मेळ कसा बसवायचा हा प्रश्न उरतोच. तसेच अशा मालकीपणामुळे त्यांच्यात एकतेची भावना येईल की नाही याबद्दलही शंका वाटते.

या बाबतीतले मूलभूत प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत :

1 स्वतःच्या कंपनीचे भाग घेण्यास कामगारांना कसे प्रवृत्त करावयाचे ?

2 कंपनीत नोकरीला असेपर्यंत स्वतःपाशी ते भाग ठेवतील, बाजारात विकणार नाहीत हे कसे पहावयाचे ?

3 भाग मालकीमुळे कंपनीचे धोरण ठरविण्यात --निर्णयप्रक्रियेत-- त्यांना वाव राहील काय ?

4 भाग भांडवलातील मालकीमुळे ते अधिक निष्ठावान होतील का ?

(3) यावर एक तोडगा असा की, त्या त्या कंपनीतील कर्मचाऱ्यांचा विश्वस्त निधी स्थापावयाचा. कंपनीतील कर्मचाऱ्यांचे भाग भांडवल या निधीच्या नावे पण व्यक्तिशः कर्मचाऱ्यांना दिले जाईल. या निधीचा व श्रमिक संघाचा काही संबंध राहणार नाही. कर्मचारी निवृत्त झाला किंवा कंपनी सोडून गेला तर त्याचे भाग या निधीतून विकत घेतले जातील, म्हणजे ते बाजारात विकले जाणार नाहीत. सुरुवातीला कर्मचाऱ्यांना मिळावयाच्या बोनसमधून असे भाग खरेदी केले जावेत.

कर्मचाऱ्यांची त्या कंपनीत पगार व इतर वित्तीय हित एवढ्यापुरती आस्था राहण्याची शक्यता अधिक.

म्हणजे कंपनीच्या अन्य व्यवस्थापकीय प्रश्नांबाबत त्याना आस्था नसणार, किंवा तितकी त्यांची कुवतही नसणार. म्हणून संचालक मंडळावर कामगारांचा केवळ एक प्रतिनिधी निवडून देण्याने काम भागावयाचे नाही. कंपनीच्या व्यवस्थापन प्रश्नांची जाणीव असणाऱ्या तज्ज्ञास संचालक मंडळावर कामगार नेमू शकतील. त्याने कामगारांचे हित जपावयास हवे व त्यांचे प्रतिनिधित्व करावयास हवे. यासाठी अर्थात कर्मचाऱ्यांचा ऐच्छिक सहभाग हवा. कायद्याने त्याला आधार मिळेल पण केवळ कायदा उपयोगी पडावयाचा नाही.

परंतु कंपनीची मालकी मिळाली तर कामगार निष्ठेने काम करतील असे सांगणे धाष्टर्याचे आहे. त्यासाठी श्रम संस्कृतीचीच जोपासना करावयास हवी. अंशतः, किमान मजुरी व महागाई भत्ता वगळता जास्तीच्या वेतनाचा सरळ उत्पादकतेशी संबंध जोडून हे साध्य करता येईल असे वाटते. औद्योगिक अभियांत्रिकीच्या पद्धती अमलात आणून, कामगाराचा, तंत्रज्ञानाचा व व्यवस्थापनाचा किती किती भाग आहे हे जाणून घेऊन हे साध्य होऊ शकेल असे वाटते.

अर्थात या पद्धतीत व्यवस्थापनावरही काही जबाबदाऱ्या येतात. कार्यक्षमता राखणे, चालढकल, वेळकाढूपणा व उधळपट्टी टाळण्याचा सतत प्रयत्न करणे, कर्मचाऱ्यांशी वागताना एकास एक तर दुसऱ्यास दुसरे मानक व्यवस्थापनाने टाळणे जरुरीचे आहे. विश्वासार्हता व निःपक्षपातीपणा राखण्याची जबाबदारी मुख्यतः व्यवस्थापनाचीच आहे. मालक म्हणून सरकारची प्रतिमादेखील तितकी चांगली नाही सरकारी प्रशासन व न्यायालये यांची ही विश्वासार्हता वाढविली गेली पाहिजे. कामचुकारांना दंड, न्यायालयांच्या निर्णयांची त्वरेने अमलबजावणी आणि राजकीय हेतू डावलून हिंसेला पायबंद इथूनच त्यासाठी सुरुवात व्हावयाला हवी. याला वेळ लागेल हे खरे आहे.

मालक–मजूर संबंध सुधारण्याच्यादृष्टीने पुढील उपाय तातडतोबीने अमलात यायला हवेत.

1 समझोता कराराची मुदत संपावयाच्या आधीपासून नवीन करार करण्याच्यादृष्टीने पावले टाकली पाहिजेत. हल्ली पहिल्या समझोता कराराची मुदत संपल्यावर किती तरी महिने नंतर याबाबतीत वाटाघाटी सुरू केल्या जातात. व्यवस्थापन स्वतःहून या वाटाघाटी सुरू करीत नाही. यामुळे अनिश्चितता व वैरभाव निर्माण होतो.

2 समझोता करारावर सह्या करण्यापूर्वी कामगार प्रतिनिधींनी या कराराच्या अटी व जबाबदाऱ्या कामगाराना समजावून दिल्या पाहिजेत. हल्ली श्रमिक संघांचे पुढारी हुकुमशहासारखे वागतात. या संघांतून लोकशाहीचा अभाव दिसतो

3 संप करण्याआधी सक्तीने त्यासाठी मतदान घेतले जावे. संप महिनाभर चालला तर तो आणखी लांबवावयाचा काय यासाठीही पुन्हा मतदान घेतले जावे धीमे कामावर पूर्ण बंदी असावी.

4 'ना काम, ना वेतन' या धोरणाची सर्वत्र अमलबजावणी व्हावी. त्यासाठी कायद्यात तशी तरतूद केली जावी.

5 हिंसा, मोडतोड याबद्दल कामगारांना सामूहिकपणे जबाबदार धरावे व त्यांच्याकडून नुकसानभरपाई वसूल केली जावी.

6 कामगारांच्या कामाचे वरचेवर मोजमाप व्हावे व चांगल्या कामास प्रोत्साहन मिळावे. त्यांचे कौशल्य वाढेल असे त्याना वरचेवर प्रशिक्षण मिळावे.

सतत विरोधी पवित्रा हा बरोबर नाही. त्यामुळे औद्योगीकरणाचा विस्तार तर राहोच, उलट असलेले उद्योग बंद पडावयाची पाळी येते. हे आता कामगारांनी जाणले आहे श्रम-संस्कृतीची (वर्क-कल्चर) जोपासना, व उद्योगाबद्दल आत्मीयता कशी निर्माण होईल हे समाजानेच आता पाहावयास हवे. उद्योगात माणूस हा महत्त्वाचा घटक आहे, हे ओळखल्यानेच औद्योगिक संबंध संवादी राहू शकतील.

☐ ☐

# दारिद्र्याचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र

**कांता रणदिवे** *

अनुवाद :

**भा. रा. ढेकणे** **

( कलकत्त्यातील 'सेंटर फॉर स्टडीज इन सोशल सायसेन्स' ही संस्था जवळजवळ प्रतिवर्षी 'आर. सी. दत्त व्याख्यानमाला' आयोजित करीत असते. ही व्याख्यानमाला 'धोरणाभिमुख अर्थशास्त्र' ( पोलिटिकल इकनॉमी ) या शाखेतील विविध विषयांवर होत असते. 1987 मध्ये कांता रणदिवे यांनी "दारिद्र्याचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र" ( पोलिटिकल इकनॉमी ऑफ पॉव्हर्टी ) या विषयावर दोन व्याख्याने दिली. ती प्रसिद्धही झाली आहेत. ही व्याख्याने महत्त्वाची वाटल्यामुळे 'अर्थसंवाद' च्या वाचकांना परिचय करून देण्यासाठी मी त्या व्याख्यानांचा स्वैर अनुवाद केला असून त्याला रणदिवे यांनी संमती दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

— अनुवादक )

कांता रणदिवे यांनी आपल्या विषयाचे प्रतिपादन दोन भागात केले आहे. पहिल्या भागाचे शीर्षक 'दारिद्र्याचे आव्हान' असे आहे. लेखिकेने सुरुवातीलाच म्हटले आहे की, सर्वसाधारणपणे जेथे दारिद्र्य आढळते तेथे समाजाच्या काही भागात संपत्ती व समृद्धी नांदत असताना दिसते. परंतु जेव्हा सर्व देशच किंवा सर्व समाजच दरिद्री असतो तेव्हा त्या समाजातील काही लोक कमी दरिद्री व काही लोक जास्त दरिद्री इतकाच फरक आढळून येतो. समाजामध्ये दारिद्र्य दिसणे हा समाजयंत्रणा नीट चालत नाही, सदोष आहे याचाच पुरावा समजला पाहिजे. खरे पाहता दारिद्र्य ही फार प्राचीन समस्या आहे. परंतु प्रत्येक पिढीला असे वाटते की, ही समस्या आताच निर्माण झाली असली पाहिजे. मग प्रत्येक पिढी त्या समस्येचा शोध घेऊ लागते. दारिद्र्य म्हणजे काय, दारिद्र्याची व्याख्या कशी करावयाची, दारिद्र्य का निर्माण होते. दारिद्र्याचे स्वरूप कसे असते, दारिद्र्य घालविण्यासाठी कोणते उपाय योजिले पाहिजे, अशा प्रकारचे विश्लेषण प्रत्येक नवीन पिढी करीत असते. नवीन प्रमेये, नवीन सिद्धान्त बांधले जातात, जुने सिद्धान्त मागे पडतात. असे हे चक्र चालूच असते. आता तर दारिद्र्याची चर्चा आंतर–

* भूतपूर्व प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

** भूतपूर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

राष्ट्रीय पातळीवर होऊ लागली आहे. चर्चासत्रे, परिसंवाद होऊ लागले आहेत. त्यासाठी दरिद्री लोकांना जरी हजर राहता येत नाही तरी त्या विषयातील तज्ज्ञांना आपली एअर बॅग सतत तयार ठेवावी लागते. ज्यांनी स्वतः दारिद्र्य अनुभवले नाही किंवा ज्यांनी दारिद्र्याचे जवळून अवलोकनही केले नाही अशा तज्ज्ञ लोकांना दारिद्र्याचे स्वरूप समजावून घेण्यासाठी शासकीय अहवालांचा आश्रय घ्यावा लागतो.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिका व युरोपातील काही देशात राष्ट्रोद्धाराच्या अनेक सामाजिक व आर्थिक योजना कार्यान्वित झाल्या. त्यामुळे तेथील राष्ट्रीय उत्पन्न वाढले, रोजगार वाढला आणि लोकांच्या राहणीमानात सुधारणा दिसून आली. त्यामुळे या देशात दारिद्र्य जरी संपूर्ण नाहीसे झाले नाही तरी ते बरेच कमी झाले आहे असे वाटू लागले. 1936 मध्ये रॉन्ट्रे या संशोधकाने यार्क या शहराची पाहणी केली होती त्यावेळी दरिद्री लोकांचे प्रमाण शेकडा 18 टक्के झाले होते. 1950 मध्ये याच शहराची जेव्हा पुन्हा पाहणी केली तेव्हा हे प्रमाण केवळ 1.5 टक्के इतकेच होते. 1958 मध्ये जे. के. गॅलब्रेथ यांचे 'दि अॅफ्ल्युअंट सोसायटी' हे पुस्तक प्रसिद्ध झाले त्यांच्या मते अमेरिकेत दारिद्र्य हा फार गंभीर प्रश्न आहे असे वाटत नव्हते. दरिद्री लोक हे जणू अदृश्यच आहेत असे वाटू लागले होते. सामाजिक कार्यकर्त्यांनी दरिद्री कुटुंबांची मोजदाद करावी व त्यांना हवी असेल ती मदत पोहोचवावी म्हणजे त्यांचे दारिद्र्य संपेल असे वाटत होते. एवंच, दारिद्र्य हा सामाजिक प्रश्न नसून तो काही कुटुंबांपुरता मर्यादित आहे असा त्यावेळी सामान्य समज होता.

परंतु दारिद्र्याचा प्रश्न इतक्या सोप्या पद्धतीने सुटण्यासारखा नाही हे लवकरच स्पष्ट होऊ लागले. दरिद्री कुटुंबाला काय लागते व किती लागते यासंबंधी रॉन्ट्रे यांनी जे आडाखे बांधले होते आणि त्या आधारावर 'दारिद्र्य रेषा' ठरविली होती त्याबद्दल तज्ज्ञांमध्ये एकमत होत नव्हते. मायकेल हॅरिंग्टन यांचा 'दि आदर अमेरिका' हा ग्रंथ 1962 मध्ये प्रसिद्ध झाला होता. अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्रातही दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर आहे, हे या ग्रंथाने स्पष्ट केले. अॅबेल स्मिथ व टाऊनसेंड यांच्या 'दि पुअर अॅन्ड दि पुअरेस्ट' (1965) या ग्रंथाने दारिद्र्य हा गंभीर स्वरूप धारण करीत आहे असे दाखवून दिले आणि काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले. याच काळामध्ये अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न चांगले वाढत होते. तथापि त्या वाढत्या उत्पन्नाचा उपयोग दारिद्र्य कमी करण्यासाठी होत नव्हता. या वाढीव उत्पन्नाचा मोठा भाग युद्धतयारी व युद्धावर होत होता. याच काळात 'दि आदर अमेरिका' चा विस्तार होत होता.

आपल्या समाजात दारिद्र्य आहे याची पाश्चिमात्य देशांना एकदम जाण येत असते आणि कालांतराने तो विचार सहजपणे विसरलाही जातो. परंतु याच सुमारास स्वतंत्र झालेल्या आशिया व आफ्रिका खंडांतील काही देशात दारिद्र्य एवढ्या प्रचंड प्रमाणात आहे की, हे देश आपल्या दारिद्र्याचा प्रगत राष्ट्रांना विसर पडू देत नाहीत. एवढेच नव्हे तर, दारिद्र्य हा एक महत्त्वाचा जागतिक प्रश्न होऊन बसला आहे आणि संयुक्त राष्ट्रसंघाला या प्रश्नांची दखल घ्यावी लागते. जगातील काही देश मागासलेले आहेत याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा विकास झाला नाही. त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक प्रकारच्या विकास योजना हाती घेतल्या पाहिजेत. त्यामुळे त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न वाढेल व त्या वाढीव उत्पन्नाचा भाग दरिद्री जनतेपर्यंत पोहोचेल हा विचार या सुमारास बळावला होता, व दारिद्र्यनिर्मूलनाची गुरुकिल्लीच सापडली असा भास झाला. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने 1961 मध्ये विकासाचे पहिले दशक ( 1961–70 ) जाहीर केले. राष्ट्रसंघाच्या सूचनेप्रमाणे अनेक देशांनी विविध योजना राबविल्या. या विकास प्रयत्नांचा अनुभव मात्र अनपेक्षित असा आला. श्रीमंत देशांची श्रीमंती अधिक वेगाने वाढली आणि अप्रगत देशांना त्यांच्या दारिद्र्यातून डोकेही वर काढता आले नाही. एका दृष्टीने हा अनुभव विपरीत असाच म्हटला पाहिजे. विकासाची फळे दरिद्री जनतेपर्यंत पोहोचलीच नाहीत.

याचा अर्थ विकास प्रयत्नांची दिशाच बरोबर नव्हती असा घ्यावयाचा का ? नियोजनाचा, विकासाचा व्यूह (स्ट्रॅटेजी) बदलला पाहिजे हा विचार बळावला. केवळ विकासावर भर देण्यापेक्षा दरिद्री लोकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन विकासाची वाटचाल करावयाचे ठरले. विकासाची ही नवी दिशा दाखवि–

त्यांच्या कामात त्यावेळचे जागतिक बँकेचे अध्यक्ष मॅकनमारा यांचा पुढाकार होता. दरिद्री जनतेला सकस अन्न, आरोग्य, निवारा, रोजगार, शिक्षण या गोष्टींची अधिक गरज असल्यामुळे नियोजनामध्ये या प्राथमिक गरजा भागविण्याला प्राधान्य द्यायचे ठरले, व त्यादृष्टीने प्रयत्न सुरू झाले. परंतु या व्यूहालाही फारसे यश लाभले नाही.

विश्लेषणाच्यादृष्टीने 'दारिद्र्य' ही संकल्पना सुस्पष्ट नाही. कारण दारिद्र्याला अनेक चेहरे, अनेक पैलू (फॅसेट्स) आहेत, अनेक अर्थ आहेत, अनेक संदर्भ आहेत. दारिद्र्य मानसशास्त्रीय असू शकेल. सांस्कृतिक असू शकेल किंवा आर्थिक असू शकेल. माणसाचे व्यक्तिमत्त्व पुरेसे प्रगल्भ होऊ शकले नाही तर तो मनाने खचलेला असतो. दरिद्री माणसाचा दृष्टिकोन, त्याचे आचार विचार, त्याची जीवनमूल्ये यांच्यावर दारिद्र्यामुळे परिणाम झालेला असतो. गरजेच्या मानाने साधनांचा अपुरेपणा यामुळे निर्माण होणारे दारिद्र्य असे काही प्रकार संभवतात. खरे पाहता, दारिद्र्य हे मोजण्यासारखे नसते. जीवनाला अत्यावश्यक अशा गोष्टींची उणीव जेव्हा अनुभवाला येते तेव्हा दारिद्र्य निर्माण होते असे म्हणता येईल. परंतु कोणत्या वस्तू जीवनाला अत्यावश्यक आहेत ते प्रत्येक व्यक्तीवर, प्रत्येक समाजावर व काळावर अवलंबून असते. दारिद्र्य हे सापेक्ष असू शकते. माझ्या शेजाऱ्याकडे सोफा सेट आहे, माझ्याकडे नाही; त्याच्याकडे रंगीत दूरदर्शन संच आहे, माझ्याकडे नाही. याचा अर्थ शेजाऱ्याच्या मानाने मी दरिद्री आहे. दारिद्र्य या संकल्पनेची आपण ज्याप्रमाणे व्याख्या करू त्याप्रमाणे दारिद्र्यनिर्मूलनाचा कार्यक्रम ठरविला जाईल व्याख्येप्रमाणे कार्यक्रमाची आखणी करावी लागणार.

दारिद्र्य रेषा ही संकल्पना दरिद्री लोकांना इतरांपासून वेगळे करण्यासाठी उपयुक्त ठरेल असे काही वेळा वाटते. जगण्यासाठी तसेच किमान कार्यक्षमता टिकविण्यासाठी काही किमान गोष्टींची आवश्यकता असते आणि यासंबंधी एकवाक्यता असावयाला हवी असेही वाटते. परंतु ज्याला आपण 'किमान गरजा' म्हणतो त्या व्यक्तीप्रमाणे, समाजाप्रमाणे व कालाप्रमाणे ठरत असतात व बदलत असतात. एवंच, 'किमान गरजा' व 'दारिद्र्य' या संकल्पना समाजसापेक्ष व कालसापेक्ष असतात. दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रम निश्चित करण्याच्यादृष्टीने मूलभूत दारिद्र्य, सांस्कृतिक दारिद्र्य, निरपेक्ष (अॅबसोल्युट) दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य तसेच प्राथमिक दारिद्र्य व दुय्यम दारिद्र्य असे भेद करणे फारसे फलदायी ठरत नाहीत.

काहींच्या मते माणसांच्या गरजांचे ढोबळपणे दोन भाग करता येतात : (1) **साठा** (स्टॉक) : यामध्ये शिक्षण, निवारा, सुरक्षितता यांचा अंतर्भाव करता येईल; (2) **प्रवाह** (फ्लो) : पोषण (न्युट्रिशन). या दोन्ही प्रकारच्या गरजा जेव्हा पूर्णपणे भागविल्या जात नाहीत तेव्हा दारिद्र्य निर्माण होते असे समजले जाते. दारिद्र्याची रेषा या संकल्पनेचे दोन उपयोग होतात : (1) समाजामध्ये किती लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत हे अजमाविता येते व (2) समाजामध्ये दरिद्री लोक असल्यामुळे सर्व समाजाला किती त्रास (डिसकम्फर्ट) होतो आणि किती किंमत मोजावी लागते याचा अंदाज करता येतो. परंतु दरिद्री लोकांना स्वतःला किती कष्ट सहन करावे लागतात याचा या विचारसरणीत विचारच केला जात नाही.

जेथे दारिद्र्य असते तेथे श्रीमंतीही पहावयास मिळते. याचा स्पष्ट अर्थ असा की, त्या समाजात विषमता आहे, दरिद्री लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही, त्यांचे योग्य पोषण होत नाही आणि याचा त्यांच्या प्रकृतीवर व आयुर्मर्यादेवर विपरीत परिणाम होत असतो युरोपातील समाजवादी राष्ट्रात जेथे केंद्रामार्फत आर्थिक नियोजन होत असते तेथे विषमता कमी झालेली आहे. याचा परिणाम तेथील लोकांची आयुमर्यादा भांडवलशाही राष्ट्रांच्या तुलनेने वाढलेली दिसून आली आहे. समाजामध्ये विषमता आहे याचा अर्थ तेथील गरीब लोकांना पुरेसे अन्न, वस्त्र, निवारा मिळत नाही, एवढाच मर्यादित नसतो. दारिद्र्याचे परिणाम बरेच गंभीर व दूरगामी असतात. दरिद्री लोकांना व त्यांच्या मुलांना समाजात योग्य संधी मिळत नाही; त्यामुळे त्यांची प्रगती होत नाही तसेच सामाजिक प्रतिष्ठाही प्राप्त होत नाही. कारण समाजाच्या वरच्या स्तरावर जाण्याची त्यांना संधी मिळत नाही.

दारिद्र्यनिर्मूलन एकदम किंवा संपूर्णपणे करता येणार नाही हे खरे. परंतु ते कमी तरी करता येणार

नाही काय ? दारिद्र्य कशाला म्हणावयाचे किंवा कोण लोक दरिद्री आहेत असे उथळ किंवा भोंगळ प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा दारिद्र्य पुन्हा पुन्हा परंपरागत चालू का राहते याचे उत्तर द्यावयास पाहिजे. या प्रश्नाचे थोडक्यात उत्तर द्यावयाचे म्हणजे, आपली समाज-यंत्रणा नीट चालत नाही असेच द्यावे लागते. परंतु हे उत्तरही फार मोघम झाले नाही का ? सामाजिक यंत्रणा नीट का चालत नाही याचे उत्तर शोधावेच लागेल. काहींच्या मते दरिद्री लोकच त्यांच्या दारिद्र्याला कारणीभूत असतात. त्यापैकी काही फार वृद्ध असतात व त्यांना मिळविण्याची शक्ती नसते, काहींना शिक्षण नसते, काहींची कुटुंबे मोठी असतात. त्यांना कुटुंबनियोजनाचे महत्त्व समजत नाही वगैरे. दारिद्र्याचे दुसरे स्पष्टीकरण समाजशास्त्रीय आहे, व त्यांचा मुख्य भर दरिद्री लोकांचे आचारविचार, त्यांचा मर्यादित दृष्टिकोन, महत्त्वाकांक्षेचा अभाव, आळस वगैरे. थोडा विचार केला तर असे आढळून येईल की, ही सर्व दारिद्र्याची कारणे नसून दारिद्र्याचे परिणाम आहेत.

दारिद्र्याचा वस्तुनिष्ट अभ्यास करावयाचा असेल तर आपण दारिद्र्याचे मूळ कशात आहे याचा शोध घ्यावयाला पाहिजे. त्यानंतर दारिद्र्याची विविध रूपे कशी असतात याचा विचार करता येईल. दारिद्र्याच्या व विषमतेच्या मुळाशी काही क्लिष्ट, गुंतागुंतीची आणि आर्थिक स्वरूपाची प्रक्रिया असावी असे अनुमान करता येईल. इतिहासाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, दारिद्र्य हे समाजाचे फार प्राचीन आणि गंभीर दुखणे आहे. दारिद्र्य हा तात्पुरता, काही काळ राहणारा व कालांतराने नाहीसा होणारा आजार नव्हे. दारिद्र्याची पाळेमुळे खोल गेलेली असल्यामुळे या प्रश्नाला ऐतिहासिक परिमाण लाभले आहे. दारिद्र्याचे मुख्य कारण म्हणजे आर्थिक विकासाचा अभाव असे सांगितले जाते. परंतु विकास का झाला नाही हे समजण्यासाठी भूतकालाकडे जावे लागते. या प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेतल्याखेरीज दारिद्र्याचे कारण योग्य प्रकारे समजणार नाही.

दारिद्र्य आणि समाजाची रचना हा दुसऱ्या व्याख्यानाचा विषय आहे. समाजातील उपलब्ध श्रम व इतर उत्पादनसाधने यांचा विनियोग व वापर कसा होतो याचा जेव्हा विचार केला जातो तेव्हा दोन प्रश्न उपस्थित होतात : (1) उत्पादनसाधनांचा सर्वात कमी भाग दरिद्री लोकांच्या वाट्याला का येतो ? (2) उत्पादनसाधनांचा वापर करण्यासंबंधी जेव्हा निर्णय घेतले जातात त्यावेळी दरिद्री लोकांच्या मतांचा फारसा विचारच केला जात नाही असे का होते ? यासंबंधी कार्ल मार्क्सनी मालमत्तेच्या मालकीला जेवढे अधिक महत्त्व दिले आहे तेवढे उत्पादनाला दिले नाही, ही गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे. आपली उपभोग-क्षमता आपल्या उत्पन्नावर अवलंबून असते हे जरी खरे असले तरी आपले उत्पन्न मालमत्तेच्या मालकीवर अवलंबून असते. मालमत्तेच्या मालकीची विभागणी समाजात कशी झाली आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे. उत्पादनाच्या क्षेत्रात अंतिम निर्णय घेण्याचे काम ज्यांच्या हातात मालमत्तेची मालकी आहे तेच करतात. हे निर्णय घेण्याच्या बाबतीत प्रत्यक्ष श्रमिकांचा सहभाग नसतो. उत्पादनक्षेत्रात उत्पादनसाधनांचे मालक आणि प्रत्यक्ष श्रमिक उत्पादक यांचे जे संबंध असतात ते महत्त्वाचे म्हणून त्याचा विचार होणे आवश्यक. उत्पादनप्रक्रियेत जे श्रम व्यतीत होतात त्या श्रमाचे दोन भाग मार्क्सनी नमूद केले आहेत : आवश्यक श्रम व अतिरिक्त श्रम. एकूण श्रमाचा जो भाग 'अतिरिक्त' म्हणून गणला जातो त्या 'अतिरिक्त' श्रमाबद्दल प्रत्यक्ष श्रमिकाला काहीही मोबदला मिळत नाही, त्याचा सर्व फायदा मालकाच्या पदरात पडत असतो. प्रत्यक्ष श्रमिकाच्या पोषणाला जेवढे श्रम लागतात तेवढ्याच श्रमाचा मोबदला-वेतन मालक श्रमिकाला देत असतो. अतिरिक्त श्रम जितके वाढतील त्या प्रमाणात मालकाचा नफा वाढत जातो.

अभिजात अर्थशास्त्रज्ञ (क्लासिकल इकनॉमिस्टस्) आणि कार्ल मार्क्स यांच्या विवेचनात मूलभूत व महत्त्वाचा फरक आहे हे जाणवते. अभिजात अर्थशास्त्रज्ञ उत्पादन व वितरण हे वेगळे, स्वतंत्र विभाग आहेत असे मानतात. त्यांचा उत्पन्न आणि उत्पन्नाचे वितरण यावर अधिक भर आहे. उत्पन्नाचे वितरण समाजामध्ये अधिक न्याय्य रीतीने झाले तर दारिद्र्य पुष्कळ कमी होईल असा त्यांना विश्वास वाटतो. समाजातील आर्थिक विषमता कमी करण्याचा तो एक चांगला मार्ग आहे. कार्ल मार्क्स यांच्या मते उत्पादन आणि वितरण हे स्वतंत्र विभाग नसून ते एकमेकांवर अवलंबून असतात. मार्क्स मालमत्तेच्या मालकीवर अधिक भर देतात आणि

उत्पादन क्षेत्रात मालक व श्रमिक यांचे जे संबंध असतात त्याला अधिक महत्त्व देतात. उत्पादनाच्या क्षेत्रात मालक व श्रमिक यांचे जे संबंध असतात त्याचा उत्पन्न वितरणावर परिणाम होत असतो. उत्पादन साधनांच्या मालकीमध्ये जोपर्यंत विषमता आहे तोपर्यंत उत्पन्नाच्या वितरणामध्ये विषमता उत्पन्न होत राहील व काही लोक दारिद्र्यामध्ये राहणारच.

उत्पादनसाधनांची मालकी ज्याच्याजवळ आहे अशा सधन वर्गाचे बाबतीत शासनाचे धोरण काय असते ? सरंजामशाही समाजरचनेत मालमत्तेचे मालक प्रत्यक्ष श्रमिकावर अंमल गाजवू शकत, कारण राजकीय सत्ताही मालकवर्गाच्याच हातात असे. जमिनीवर राबणाऱ्या श्रमिकाला गुलामासारखे राबविले जात असे. उत्पादनाचे जेव्हा व्यापारीकरण झाले त्या काळात मालमत्तेचे व त्याच्या मालकवर्गाचे रक्षण करणे हेच शासनाचे प्रमुख कार्य होते. कारण, एकूण आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण बाजारात्मक पद्धतीने होई भांडवलशाही अर्थव्यवस्थेत श्रमिकाची मालमत्तेच्या मालकीपासून पूर्णपणे फारकत झालेली असते आणि त्याच्याजवळ स्वत:चे श्रम विकण्याखेरीज दुसरे काही देण्यासारखे उरलेले नसते. श्रमापासून अतिरिक्त मूल्य अधिक प्रमाणात काढण्याच्या उद्देशाने अत्याधुनिक, अभिनव यंत्रे वापरण्याकडे मालकाचा अधिक ओढा असतो. कारण, उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर श्रमिकाचे शोषण करून अतिरिक्त मूल्य हरण करण्याची त्यात सोय असते. श्रमिक जेव्हा आपले श्रम विकतो तेव्हा तो स्वत:ला निर्धन करीत असतो.

सरंजामशाहीच्या युगात एकूण समाजावर जमीनमालक वर्गाचे वर्चस्व असे. जमिनीवर काम करायला हुकमी श्रमिक मिळत असत. श्रमिक व त्याच्या कुटुंबाच्या पोषणाला लागणारे उत्पन्न दिल्यानंतर शिल्लक राहणारे अतिरिक्त उत्पादन मालकवर्गाला उपभोगावयाला मिळत असे. त्यावेळचे बाजार स्थानिक स्वरूपाचे असत. मालाला मागणी स्थानिक स्वरूपाची असल्यामुळे श्रमिकांच्या श्रमालाही मागणी स्थानिक होती. श्रमिकाला बहुधा गाव सोडून जावे लागत नसे आणि जमीनमालकाच्या परवानगीशिवाय त्याला जाताही येत नसे. चौदाव्या शतकात श्रमिकवर्गाला आपल्या दास्यत्वाची जाणीव होऊ लागली व तो सरंजामशाहीच्या बंधनातून आपली मुक्तता करून घेण्याचा प्रयत्न करू लागला. प्रबोधन युग ( रिनेसान्स ) व सुधारणा (रेफर्मेशन) या चळवळींमुळे, समुद्राचे नवीन मार्ग सापडून नवीन देशांचा शोध लागल्यामुळे बाजारांची संख्या व व्याप्ती सतत वाढत गेली. त्यामुळे व्यापार बेसुमार वाढू लागला आणि व्यापारी भांडवलाची प्रचंड वाढ होऊ लागली. बाजारपेठा वाढल्यामुळे उद्योगधंदे वाढू लागले आणि या सर्वांचा परिणाम म्हणून श्रमिकाच्या श्रमाला मागणी सतत वाढू लागली. श्रमिक स्थानिक बंधनातून मुक्त होऊन बाहेरच्या जगात येऊ लागले. आर्थिक व्यवहाराचे माध्यम म्हणून पैशाने स्थान पटकाविल्यामुळे श्रमिक आपल्या स्वातंत्र्याची किंमत मालकाला देऊन बंधमुक्त होऊ लागला. परंतु श्रमिकाचा खेड्याशी किंवा शेतीशी संबंध सुटलेला नव्हता. आपद्काळी त्याला आपल्या खेड्याचे व खेड्यातील आपल्या कुटुंबाचे संरक्षण मिळत होते. व्यापारी क्रांतीच्या संक्रमणाच्या काळात समाजाचे हे चित्र हळूहळू बदलत होते.

परंतु खरा बदल झाला तो औद्योगिकक्रांतीच्या काळात. औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ केव्हा झाला यासंबंधी तज्ज्ञांमध्ये एकमत नाही. काहींच्या मते या क्रांतीचा प्रारंभ 1760 च्या सुमारास झाला असावा. रणदिवे यांच्या मते 1850 ते 1875 हा क्रांतीचा काळ समजायला पाहिजे. या काळात वाणिज्य भांडवलाचे रूपांतर औद्योगिक भांडवलात झाले. उत्पादन पद्धतीत, उत्पादन व्यवस्थापनात क्रांतीकारक बदल झाले. उत्पादनाचे केंद्रीकरण झाले व कारखाना पद्धती अस्तित्वात आली. श्रमिकांचा त्यांच्या खेड्याशी व शेती व्यवसायाशी आजपावेतो असलेला संबंध सुटून ते पोट भरण्यासाठी शहराकडे धाव घेऊ लागले. एका प्रकारच्या दास्यातून मुक्त होऊन तो आता नवीन स्वरूपाच्या गुलामगिरीत अडकून पडला. खरे पाहता तो आता स्वतंत्र झाला होता. परंतु त्याच्याकडे स्वत:चे श्रम देण्याखेरीज दुसरे काहीच उरले नव्हते. कारण मालमत्ता आणि श्रम यांची फारकत आता पूर्ण झालेली होती. त्याचप्रमाणे ग्रामीण भाग आणि नागरी भाग यांचीही फारकत झाली होती खेड्यात मिळणाऱ्या संरक्षणाला श्रमिक वंचित झाला होता. त्यावेळच्या समाजामध्ये सामाजिक सुरक्षिततेची पद्धत सुरू झालेली नव्हती, आणि श्रमिकास रोजगाराचा हक्क मिळालेला

नव्हता. सरंजामशाहीमध्ये श्रमिकाला पोसण्याची जबाबदारी थोड्याफार प्रमाणात जमीन मालकावर असे. तशा प्रकारची जबाबदारी कारखानदारावर नव्हती व आजही नाही. कारखानदार देईल ते काम आणि देईल ते वेतन स्वीकारणे एवढेच स्वातंत्र्य श्रमिकाला उरले. औद्योगिकक्रांतीमुळे उत्पादनपद्धतीत प्रचंड बदल घडून आले एवढेच नव्हे तर त्या बदलामुळे सर्व समाजच ढवळून निघाला. सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनात गुणात्मक फरक पडले.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन फायद्यासाठी होत असते, उपभोगासाठी नव्हे. फायदा वाढविण्यासाठी श्रमिकाकडून अतिरिक्त श्रम वाढवावे लागतात. त्यासाठी श्रमिकांची उत्पादकता वाढविणे आवश्यक असते. श्रमाची उत्पादकता वाढविण्यासाठी भांडवलदार अत्याधुनिक तंत्रज्ञान व आयुधे वापरतो. येथे पैशाच्या वापराचा विचार करणे आवश्यक आहे. उत्पादन करण्यासाठी भांडवलदार पैसे खर्च करून मालवस्तू व श्रम विकत घेतो. येथे श्रम ही एक विकण्यासारखी व विकत घेण्यासारखी वस्तूच असते. या वस्तूंच्या मदतीने तो इतर वस्तुंची निर्मिती करीत असतो. अशा रितीने भांडवलशाही व्यवस्थेत मालमत्तेची मालकी व श्रमिक यांचे उत्पादन क्षेत्रातील संबंध अतूट अशा स्वरूपाचे असतात आणि उत्पादनाच्या प्रक्रियेतच अतिरिक्त श्रमाची—मूल्याची—निर्मिती होत असते. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर भांडवलदारवर्ग श्रीमंत होत असतो. त्यामुळे सर्व देशच समृद्ध झाला असा भास होतो. त्याच विकासाचा एक अनिवार्य परिणाम म्हणून दरिद्री लोकांची संख्या व दारिद्र्याची तीव्रता वाढत जाते. भांडवलशाही उत्पादनव्यवस्थेत हे सर्व अंगभूत असते. भांडवलदार व श्रमिक यांच्यामधील विनिमय समान पातळीवर कधीच होत नसतो. कारण, श्रमिकाला नेहमीच पडते घ्यावे लागते. याचा परिणाम श्रमिकाच्या वेतनावर व एकूण आर्थिक स्थितीवर होत असतो.

औद्योगिक क्रांतीचा उदय व भांडवलशाहीचा विकास प्रथम पाश्चिमात्य राष्ट्रात झाला. परंतु त्याचे अनिष्ट परिणाम आंतरराष्ट्रीय संबंधावर झाले. आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंध विकसित राष्ट्रांना अधिक लाभदायक ठरले, परंतु त्याच कारणामुळे आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील अविकसित अशा राष्ट्रांना हानीकारक झाले. विकसित राष्ट्रांच्याबरोबर समानपातळीवर स्पर्धा करणे अशक्य असल्यामुळे भारतासारख्या देशातील पारंपारिक उद्योगधंदे मोडकळीस आले, नष्ट झाले.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अपरिहार्यपणे होणारे संपत्तीचे केंद्रीकरण आणि श्रमिकवर्गाचे सतत वाढत जाणारे शोषण यामुळे समाजामध्ये उत्पात, हिंसाचार होण्याचा धोका असतो. हा संभाव्य धोका टाळण्यासाठी शासनाने वेळोवेळी श्रमिक वर्गाच्या हितासाठी कल्याणासाठी कायदे केलेले आहेत. श्रमिकांच्या कामाच्या वेळा ठरविणे, त्यांचे वेतन विनियमित करणे, त्यांच्या आरोग्याची व्यवस्था करणे वगैरे प्रागतिक स्वरूपाचे कायदे केले आहेत. असे म्हटले जाते की, शासनाच्या या उदार, प्रागतिक दृष्टिकोनाचे मुख्य कारण म्हणजे वाढता मानवतावाद व उदारमतवाद हे होय. या गोष्टीकडे अधिक जागरूकपणे पाहिले तर असे आढळून येते की, हे सर्व प्रागतिक फायदे श्रमिकांच्या हितरक्षणासाठी केले जात नाहीत तर प्रस्थापित भांडवलशाहीच्या सुरक्षिततेसाठी केले होते व केले जात असतात. केन्स यांनी 1936 मध्ये रोजगाराच्या सर्वसाधारण सिद्धांताच्या रूपाने एक नवीन आर्थिक सिद्धांत व कार्यक्रम जगापुढे सादर केला आणि त्यामुळे अर्थशास्त्राच्या विचारविश्वात एक नवीन क्रांती होत आहे असा काही काळ भास निर्माण झाला होता. ढासळत चाललेल्या भांडवलशाहीला सावरून धरण्याचा तो प्रयत्न होता. परंतु त्याची नवलाई फार काळ टिकली नाही. आजही भांडवलशाही अर्थव्यवस्थेमधील अंतर्गत परस्परविरोध अधिकाधिक तीव्र होऊ लागले आहेत, प्रगत राष्ट्रांमध्ये आर्थिक विकासाचा दर मंद होत आहे, बेकारीचे प्रमाण वाढत आहे, चलन अतिवृद्धी चालूच आहे आणि आंतरराष्ट्रीय ताळेबंदातील तूट भरून काढण्यासाठी संरक्षण जकातीचे धोरण स्वीकारले जात आहे. या सर्व घडामोडींचे अनिष्ट परिणाम अविकसित राष्ट्रांना भोगावे लागत आहेत.

एका महत्वाच्या अर्थाने विसावे शतक हे संक्रमणाचे शतक असे म्हणता येईल. आशिया व आफ्रिका खंडातील बरीचशी राष्ट्रे वसाहती गुलामगिरीतून नुकतीच मुक्त झाली आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातही ती

राष्ट्रे राजकीय व आर्थिक संक्रमणावस्थेतून बाहेर पडली नाहीत. त्यांना अद्याप राजकीय व आर्थिक स्थैर्य लाभावयाचे आहे. काही सन्मान्य अपवाद सोडले तर बहुतेक राष्ट्रात बव्हंशी हुकुमशाही राज्यपद्धती नांदत आहे. ही सर्व राष्ट्रे अविकसित आहेत. नियोजन पद्धतीने आर्थिक विकास घडवून आणण्याचे त्यांचे प्रयत्न असून त्यांना अजून वेग यावयाचा आहे. पूर्व युरोप–मधील काही राष्ट्रात भांडवलशाहीचा लोप होऊन तेथे समाजवादी समाजरचना स्थापन करण्याचे प्रयत्न होत आहेत. परंतु तेथेही राजकीय व आर्थिक सत्तेच्या किल्ल्या मध्यवर्ती शासनाचे हातातच आहेत असे दृश्य दिसते. सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन खरी सत्ता अद्याप लोकांच्या हातात आली नाही. खऱ्याखुऱ्या समाजवादा–कडे वाटचाल चालू आहे. एवढे फार तर म्हणता येईल. हे जरी खरे असले तरी भांडवलशाही राष्ट्रात दारिद्र्याचे तसे गंभीर चित्र दिसते तसे या समाजवादी देशात दिसून येत नाही, तेथे दारिद्र्याची व्याप्ती व तीव्रता बरीच कमी झाली आहे.

पारतंत्र्यातून अलीकडेच मुक्त झालेले देश आर्थिकदृष्ट्या बरेच मागासलेले आहेत. वसाहतवादी व विकसित राष्ट्रांबरोबर त्यांचे जे आर्थिक संबंध आले होते त्यामुळे या नवीन मुक्त झालेल्या देशांचा विकास कुंठित झाला व झालेल्या विकासामध्ये अनेक त्रुटी व विसंगती आढळून आल्या आहेत. या देशांनी आता आर्थिक विकासाचे कार्य हाती घेतले आहे आणि त्याद्वारे दारिद्र्य कमी करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. आर्थिक व सामाजिक विकास नियोजन पद्धतीने करण्याचा कल या देशात दिसून येतो. सोव्हिएत रशियाने पंच–वार्षिक योजना करून नियोजन पद्धतीने आपला विकास घडवून आणला याचा या देशावर बराच परिणाम झाला असून त्याच मार्गाने आपला विकास करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. परंतु रशियातील नियोजन सर्वांगीण व सर्वस्पर्शी होते याचा मात्र सोईस्कर विसर पडत असतो. भारतामध्ये आर्थिक विकासाचे प्रयत्न नियोजन पद्धतीने परंतु मिश्र आर्थिक व्यवस्थेच्या चौकटीमध्ये करण्यात येत आहेत. लोकसंख्येची वाढ लक्षात घेता गेल्या चार दशकात झालेला आर्थिक विकास मंद गतीने झाला आहे हे लक्षात येते. याशिवाय झालेल्या विकासाची फळे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलीच नाहीत. देशाच्या नागर भागात भांडवलशाही मक्तेदारांचा वाढता प्रभाव दिसत आहे. ग्रामीण भागात जमीनमालक शेतकरी, विशेषत: श्रीमंत शेतकरी आणि अल्प भूधारक, व शेतमजूर यांच्यामधली आर्थिक दरी सतत रुंदावत आहे. कर्ज माफीचा फायदा सधन शेतकऱ्यांना अधिक होतो आणि बँकाकडून मिळणाऱ्या सवलतींचा लाभही त्यांच्याच पदरात पडत असतो. शेतीमालाच्या आधार किमती शासनाकडून वेळोवेळी वाढविल्या जातात. परंतु त्याचा मुख्य फायदा जे शेतकरी आपला शिलकी माल बाजारात विकू शकतात त्यानाच होत असतो. निर्वाह शेतकरी व शेतमजूर या वर्गाला या वाढीव भावांचा काहीच फायदा होत नाही. शेतमजुरांच्या दारिद्र्यात त्यामुळे भरच पडत असते. अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी आपल्याला परदेशावर अवलंबून राहावे लागते, आणि आयात केलेले तंत्रज्ञान चैनीच्या वस्तू बनविण्यासाठी वापरले जात असते. दारिद्र्य कमी करण्याकडे या तंत्रज्ञानाचा उपयोग होत नाही. श्रीमंत शेतकरी, व्यापारी कारखानदार या सधन वर्गांचे शासनाबरोबर मेतकूट जमले असून दुसऱ्या बाजूला दरिद्रीवर्ग हताश होऊन बसला आहे असे एकंदर भारतातील सध्याचे चित्र दिसत आहे.

उत्पादनाच्या क्षेत्रात श्रमिकाला वेतन घेऊन काम करणे एवढेच स्थान असते. या क्षेत्रात जे महत्वाचे निर्णय घ्यावयाचे असतात त्यामध्ये श्रमिक वर्गाचा सहभाग नसतो, उत्पादन प्रक्रियेत जे अतिरिक्त मूल्य निर्माण होते ते सर्व भांडवलदाराला मिळत असते. प्रत्यक्ष श्रमिकवर्गाला अतिरिक्त मूल्यात सहसा वाटा मिळत नाही. परंतु नागर भागात काही ठिकाणी श्रमि–कांच्या संघटना स्थापन झाल्या असून त्यापैकी काही बलवान व लढाऊ आहेत. मालकाबरोबर विनिमय करण्यात, सौदा करण्यात त्या तरबेज झाल्या आहेत. अशावेळी भांडवलदार मालकाला अतिरिक्त मूल्याचा काही भाग श्रमिकवर्गाला द्यावा लागतो.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतामध्ये शहरीकरण वेगाने होत आहे. याचा अर्थ असा नव्हे की, औद्योगी–करण वेगाने होत आहे ग्रामीण भागात श्रमिकाला काम मिळत नाही म्हणून किंवा शहरांचे आकर्षण वाटत असल्यामुळे ग्रामीण भागातून श्रमिकांचे लोंढे पोट भरण्यासाठी शहराकडे धाव घेत आहेत. या सर्वांना कारखानदारीत किंवा इतर उत्पादनक्षेत्रात काम

मिळेलच असे नाही. याचा अर्थ ग्रामीण भागातून शहराकडे धाव घेणारे सर्व लोक 'श्रमिक' या वर्गात मोडणार नाहीत. शहरात येणाऱ्या लोकांचे दोन वर्ग होतात : (1) श्रमिक वर्ग व (2) अश्रमिक लोक, जे काही किरकोळ कामे करून स्वतःचे पोट भरीत असतात.

समाजवादी राष्ट्रामध्ये भांडवलशाहीचा जरी बीमोड झाला असला तरी त्याचा पूर्ण नाश झालेला नाही. भांडवलशाहीचा तेथे पराभव झाला असला तरी साम्यवाद अजून सुस्थिर नाही. परंतु या समाजवादी राष्ट्रामध्ये आर्थिक विषमता बरीच कमी झालेली आहे आम जनतेच्या मूलभूत गरजा शासनाकडून भागविल्या जात असल्यामुळे या देशात, भांडवलशाही देशांच्या तुलनेने, कमी दारिद्र्य दिसून येते हे जरी सर्व खरे असले तरी मुख्य प्रश्न असा की, उत्पादनाच्या तसेच इतर आर्थिक क्षेत्रात जे महत्त्वाचे निर्णय घेतले जातात त्या प्रक्रियेत प्रत्यक्ष श्रमिकवर्गाचा सहभाग असतो का? या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. उत्पादनसाधनांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतरही प्रत्यक्ष श्रमिकांचा समाजातील दुय्यम दर्जा नाहीसा होत नाही असा अनुभव आहे. समाजवादी देशामध्येही आर्थिक व राजकीय क्षेत्रात एक नवीन सत्ताधारी वर्ग अस्तित्वात येऊ लागला आहे. या नवीन सत्ताधारी वर्गात नोकरशहा, व्यवस्थापक, अर्थशास्त्रज्ञ तंत्रसत्ताधारी वगैरे तज्ज्ञांचा समावेश होत असतो. जे प्रत्यक्ष श्रमिक आहेत त्यांचे स्थान नामधारी मालक या संज्ञेला शोभेल असे असते. प्रत्यक्ष श्रमिकवर्गाचा आर्थिक व राजकीय क्षेत्रात महत्त्वाचे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत ज्या प्रमाणात, सहभाग असेल त्या प्रमाणात, खऱ्या अर्थाने, दारिद्र्य निर्मूलन झाले असे म्हणता येईल. ज्या समाजात प्रत्यक्ष श्रमिकाची अधिसत्ता स्थापन झाली असेल, तोच समाज वर्गहीन समाजवादी समाज समजला पाहिजे.

1987 सालची ही दोन व्याख्याने 1988 मध्ये दिली होती आणि त्यांचे प्रकाशन ओरिएन्ट लाँगमन या प्रकाशन संस्थेने 1990 मधे केले. व्याख्याने दिल्यानंतर दोन वर्षांनी त्यांचे प्रकाशन झाले. प्रकाशनापूर्वी या व्याख्यानावर पुन्हा हात फिरविण्याची संधी रणदिवे यांना मिळाली नाही असेच समजले पाहिजे. कारण ही दोन वर्षे महत्त्वाची होती. याच काळात पूर्व युरोपातील काही देशातील राजकीय व आर्थिक संरचनाच बदलून गेली आहे. तेथे झालेले व होत असलेले बदल गुणात्मक व मूलभूत स्वरूपाचे आहेत. तेथे खुली व बाजारात्मक अर्थव्यवस्था स्थापन होऊ पहात आहे. रणदिवे यांनी पूर्व युरोपातील देशाचा आपल्या व्याख्यानांत उल्लेख केला आहे. हे देश संक्रमणाच्या अवस्थेत आहेत व या संक्रमणाची दिशा पूर्ण साम्यवाद स्थापन करण्याकडे आहे असा त्यांचा अंदाज होता, विश्वास वाटत होता. प्रत्यक्षात मात्र हे संक्रमण अगदी उलट दिशेने होत आहे असे आता स्पष्ट दिसून येते. या महत्त्वपूर्ण राजकीय व आर्थिक बदलांची दखल घेण्यास रणदिवे यांना संधी मिळाली नाही.

समाजामध्ये काही लोक दरिद्री का असतात ? त्यांचे दारिद्र्य पिढ्यान्‌पिढ्या का चालत रहाते ? या प्रश्नांची उकल करण्यास, दारिद्र्य ही समस्या समाजात निर्माण का होते हे समजावून सांगण्याच्या कामी, कार्ल मार्क्सची विचारसरणी, विश्लेषण पद्धती उपयुक्त ठरते असा रणदिवे यांना विश्वास वाटतो व तसे त्यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. दारिद्र्य निर्माण का होते याचे मुख्य कारण उत्पादनसाधनांची व उत्पन्नाची समाजात होणारी विषम वाटणी हे होय. त्यामुळे काही कुटुंबे पिढीजात श्रीमंत रहातात व काही कुटुंबे पिढीजात दारिद्र्यात खितपत पडतात. उत्पादनसाधनांची वाटणी समाजात सम प्रमाणात कशी होणार, कशी करणार ? उत्पादनसाधनांचे सामाजीकरण, राष्ट्रीयीकरण केले म्हणजे या साधनांची समप्रमाणात वाटणी झाली असे समजावयाचे काय ? उत्पादनसाधनांचे राष्ट्रीयीकरण केले म्हणजे समाजवादी समाजाची स्थापना झाली असे समजावयाचे काय ? पूर्व युरोपातील काही देशात उत्पादनसाधनांचे राष्ट्रीयीकरण झाले आहे. तरीही ह्या देशात, कमी प्रमाणात का होईना, दारिद्र्य दिसून येते. असे का व्हावे ?

रणदिवे यांनी या प्रश्नाचे उत्तर आपल्या व्याख्यानात दिले आहे. त्या म्हणतात प्रत्यक्ष श्रमिकाला ज्या प्रमाणात निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सहभाग मिळेल त्या प्रमाणात दारिद्र्य नाहीसे होईल. समाजवादी देशातही प्रत्यक्ष श्रमिकाला निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत

सहभाग दिला जात नाही, म्हणून तेथे दारिद्र्य आढळून येते. जेव्हा प्रत्यक्ष श्रमिकाला निर्णय घेण्याच्या क्षेत्रात सहभाग मिळेल तेव्हाच खऱ्या अर्थाने उत्पादकाचे प्रभुत्व (प्रोड्युसर्स सॉव्हरिनृटी ) स्थापन होईल. प्रत्यक्ष श्रमिकाना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत भाग घेण्यात स्वारस्य वाटते का ? याबाबतीतला आजवरचा अनुभव काय दाखवितो ? निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत श्रमिकाला सहभाग मिळाला म्हणजे त्याचा सामाजिक दर्जा उंचावतो. त्याला हा सहभाग मिळेल का हा केवळ आर्थिक प्रश्न नाही. हा प्रश्न बहुधा सामाजिक अभियांत्रिकीच्या ( सोशल इंजिनिअरिंग ) कक्षेत येतो परंतु आज तरी कालचक्र उलट दिशेने फिरू लागलेले दिसते.

□ □

# मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| नी. वि. सोवनी | : | **अर्थसिद्धांत, आणखी चिकित्सक निबंध** * (1977): पृष्ठे 226, किंमत 20 रुपये. |
| मो. वि. भाटवडेकर | : | **शिक्षणाचे अर्थशास्त्र** (1978), पृष्ठे 157, किंमत 20 रुपये, (वितरण व्यवस्था : व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या, 381 क, शनिवार पेठ, पुणे 411 030.) |
| भ. ग. बापट | : | **आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धांत आणि धोरण** * (1982), पृष्ठे 333, किंमत रु. 50 ( वितरक : कॉंटिनेन्टल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे 411 030 ) |
| नी. वि. सोवनी | : | **स्त्राफा विचारसरणी : चार व्याख्याने**,* पृष्ठे 64, किंमत रु. 10, प्रकाशक : नी. वि. सोवनी, पुणे. |

* ही पुस्तके म. अ. परिषदेच्या धुळे येथील कार्यालयाकडून मिळू शकतील.

# *अर्थसिद्धान्त : चुकीचे आणि / वा चकवे* (10)

# प्रत्ययाचे सिद्धान्त व भांडवलाच्या मूल्यनासंबधीच्या सिद्धान्तनावरील प्रदीर्घ वादविवाद : अर्थशास्त्रज्ञ आपले तर्कशुद्ध निष्कर्ष कधी अंगिकारणार ?

**नी. वि. सोवनी ***

शीर्षकात उल्लेख केलेल्या दोन विषयावर अर्थ–शास्त्रात गेल्या अनेक दशकात तीव्र वादविवाद झालेले आहेत हे अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना ठाऊक आहे. त्यातून निघालेले निष्कर्ष बहुतेक सर्व अर्थशास्त्रज्ञांनी मान्य केलेले आहेत. परंतु त्या निष्कर्षांनुसार अर्थ–शास्त्रीय सिद्धान्तनात आवश्यक ते बदल न करता हे निष्कर्ष विरोधाभासाचे प्रकार आहेत अशी सोईस्कर समजूत करून घेऊन जुनीच चुकीची पठडी कायम ठेवण्याची अशास्त्रीय भूमिका बहुतेक अर्थशास्त्रज्ञांनी घेतलेली दिसते. ही भूमिका निषेधार्ह आहे व या सर्व वादांचा एकदा सोक्षमोक्ष लावणे अत्यंत आवश्यक आहे असे इटलीतील विख्यात अर्थशास्त्रज्ञ सायलॉस लॅबिनी यांचे म्हणणे आहे. त्यांच्या वरील मथळ्याच्या[1] लेखाच्या आधारे त्यांच्या या युक्तिवादाचे येथे कथन केले आहे.

## सरासरी आणि सीमान्त उत्पादकता

उत्पादनात गुंतलेल्या कामगारांची ( श्रम–शक्तीची ) सरासरी उत्पादकता ही एकूण उत्पादनास कामगारांच्या संख्येने भागून काढता येते. स्थितिशील अगर गतिशील अन्वेषणाच्या संदर्भात या सरासरी उत्पादकतेच्या संकल्पनेमुळे कोणत्याही अडचणी येत नाहीत. पण सीमान्त संकल्पना पुढे आली की अडचणी निर्माण होण्यास सुरवात होते. कोणतेही उत्पादन हे उत्पादन घटकांचे फळ (अनुवर्त) म्हणून मांडल्यास सीमान्त उत्पादन (कोणत्याही एका उत्पादन घटकाचे) म्हणजे तो घटक वापरण्यात कमी अगर जास्ती असा सूक्ष्म फरक केल्यास व बाकीचे घटक अगदी स्थिर ठेवल्यास मिळतो तो त्या उत्पादन फलाचा आंशिक विकलज होय. गणितीदृष्टीने सीमान्त उत्पादकतेची ही संकल्पना निःसंशय ग्राह्य आहे. पण अर्थशास्त्राच्या दृष्टीने तसे आहे काय ?

या प्रश्नाचे उत्तर स्वच्छपणे नाही असे नाही. याचे कारण असे की, कोणतेही उत्पादनतंत्र काही

* भूतपूर्व कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.

उत्पादन घटकांचे विशिष्ट मिश्रण शक्य करणाऱ्या स्थिरभांडवलरूपी यंत्रसामुग्रीत अंगीभूत झालेले असते. एखाद्या कापड गिरणीत असलेल्या यंत्रसामुग्रीच्या वापराने एक चौरस इंच जादा कापड काढावयाचे ठरविल्यास आपल्याला त्या यंत्रसामुग्रीचाच वापर थोडा वाढवावा लागतो असे नाही तर एका तरी कामगारला काही अधिक क्षण काम करावे लागते व त्याला हवेतूनच कापड विणण्याचे कसब नसेल तर थोडासा अधिक कापूस ( वा सूत ) वापरावे लागते.

या उदाहरणात उत्पादनप्रक्रियेत फक्त श्रमशक्ती वाढत नाही तर इतर निविष्टीही वाढतात. त्यामुळे जादा झालेले चौरस इंचाचे उत्पादन हे कामगाराची किंवा श्रमशक्तीची सीमान्त उत्पादकता आहे असे म्हणणे चूक आहे. कारण ते जादा उत्पादन ( सीमान्त ) म्हणजे वरील उत्पादनप्रक्रियेच्या फळातील ( अनुवर्तातील ) श्रमशक्तीचा आंशिक विकलज होय. परंतु तो विकलज असावयास श्रमशक्तीच्या वाढीशिवाय इतर कोणत्याही घटकाच्या वापरात वाढ होता उपयोगी नाही. ( परंतु हे अशक्य असते हे वरील उदाहरणावरून लक्षात येईल. वरील प्रकारच्या उत्पादनफलांचा ( अनुवर्तांचा ) आंशिक विकलज निव्वळ श्रमशक्तीचे सीमान्त उत्पादन दर्शवीत नाही, तर इतर घटकात जी वाढ होते त्यांचेही योगदान त्यात समाविष्ट असते. ) ही अडचण लक्षात आल्यामुळेच उत्पादन विभाजनाच्या सीमान्त संकल्पनेवर आधारलेल्या सिद्धान्तास शास्त्रीय बैठक देण्यासाठी मार्शल यांनी घटकाची ' निव्वळ ' उत्पादकता अशी संकल्पना त्यासाठी वापरावी असे सुचविले. त्यांनी या निव्वळ उत्पादकतेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली. एखाद्या उत्पादन घटकाच्या ' वाढीव ' वापरामुळे झालेल्या उत्पादन वाढीतून त्यासाठी लागलेला ' इतर प्रासंगिक खर्च ' वजा जाता उरलेली उत्पादनातील वाढ म्हणजे त्या उत्पादन घटकाची ' निव्वळ उत्पादकता.' (पृ. 432). ही निव्वळ उत्पादकता व सीमान्त उत्पादकता या समरूप नाहीत. हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. आंशिक विकलज हा आंशिक असतो ! आणि तो फक्त तेवढेच असतो पण मार्शल हे दोन्ही समरूप आहेत असे सुचवितात व या समरूपत्वाच्या समीकरणाला पुरावा आहे असा वाचकापेक्षासुद्धा स्वतःसाठीच जणू देखावा करण्यासाठी एक व्यवहारातले उदाहरण देतात. हे उदाहरण एका पाळण्याचा व्यवसाय करीत असलेल्या धनगराचे आहे. आपल्या व्यवसायासाठी आणखी एक मेंढपाळ आपल्या हाताखाली नेमावा की नाही याचा तो विचार करीत आहे. या विचारात तसा जादा मेंढपाळ नेमल्यास त्याला आनुषंगिक असा हत्यारावर वा औजारावर किंवा उत्पादनावर कोणताच जादा खर्च करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे त्याच्या प्रत्ययास येईल. म्हणजे नव्या मेंढपाळाच्या नेमणुकीने लोकरीच्या वगैरे उत्पादनात जी भर पडेल ती त्या मेंढपाळाची सीमान्त उत्पादकता असेल असे म्हणण्यास हरकत नाही. ( येथे एक गोष्ट लक्षात येते की, अशा संदर्भात बहुधा शेतीतील वा मेंढपाळाच्या धंद्यातील उदाहरण देण्यात येते ; आधुनिक उद्योगातील उदाहरण कधीही दिलेले सापडत नाही. ) पण या उदाहरणातही आंशिक विकलजाचाच शोध आहे. आणि या उदाहरणातही नवीन नेमलेल्या मेंढपाळास अन्न व अंथरुण-पांघरुण जादा लागेलच व मेंढया पाळण्याच्या कामासाठी काही तरी औजार-घुंगराची काठी, वगैरे-जादा लागणारच. या उदाहरणातील या बाबी इतर संदर्भात नगण्य वाटल्या तरी त्या विशिष्ट संदर्भात त्या तशा मानता येणार नाहीत. नेहमीच्या उद्योगातील (विशेषतः आधुनिक उद्योगातील) उदाहरणे घेतल्यास या आनुषंगिक गोष्टी नगण्य असण्याची मुळीच शक्यता नाही. जर नवीन कामास लावलेल्या कामगारामुळे होणारी उत्पादनातील ' निव्वळ ' वाढ ही त्या उत्पादनातून त्या जादा उत्पादनाला लागलेला अनुषंगिक खर्च वजा करुन काढावयाची असेल तर ही वाढ आंशिक विकलजाने दर्शविलेल्या सीमान्त उत्पादनापेक्षा निराळी (कमी) असणार हे उघड आहे. उत्पादनघटक हे एकमेकाना संपूरक असतात हे लक्षात घेतल्यास प्रत्येक उत्पादनतंत्र म्हणजे त्याने उत्पादित केल्या जाणाऱ्या उत्पादनासाठी लागणाऱ्या उत्पादनघटकांचे एक विशिष्ट मिश्रण असते, त्यात फेरफार शक्य नसतो हे लक्षात घेतल्यास कोणत्याही उत्पादनात प्रवेश करणाऱ्या उत्पादनघटकांची सीमान्त उत्पादकता प्रत्यक्षात काढता येत नाही हे स्पष्ट आहे. आणि उत्पादनाला (व त्याच्याच अनुषंगाने उत्पादन विभाजनाला ) सीमान्त संकल्पना वापरणारे सिद्धान्त संपूर्णपणे कोसळतात हे निराळे सांगावयास नको.

ते आणखी एका विशिष्ट कारणानेही कोसळतात.

उत्पादनसंबंधीच्या सिद्धान्तमाच्या उभारणीत उत्पादन-घटक व उत्पादन यांच्यातील संबंध दृष्टिगोचर करणाऱ्या उत्पादनफलाची (अनुवर्ताची) संकल्पना वापरली जाते. (तिच्या शास्त्रियत्वाबद्दल जबरदस्त शंका आहेत.) अशा उत्पादनफलाच्या (अनुवर्ताच्या) आलेखात एक घटक बदलता व इतर स्थिर ही परिस्थिती रेखाटताना मिळणारी आकृती ही आदिबिंदूतून जाणारी सरळ रेषा नसते असे मानले जाते त्यामुळे त्या आलेखात बदलत्या घटकांच्या सरासरी व सीमान्त उत्पादकता निरनिराळ्या दाखविता येतात, व त्यांचे वेगवेगळे वक्रही साकार करता येतात. (बहुतेक पाठ्य-पुस्तकातून या आकृती सापडतील). उत्पादनफलाचा आलेख आदिबिंदूतून जाणारी सरळ रेषा असा असेल तर सरासरी व सीमान्त उत्पादने वेगवेगळी दाखविता येत नाहीत. कारण ती सारखीच (समरूप) असतात. (सरळ रेषेने दर्शविला गेलेला उत्पादन अनुवर्त (फळ) हा स्थिर अनुमाप प्रत्यायाची स्थिती दर्शवितो). उत्पादन फलाचे रूप हे सरळ रेषेचे आहे याचा अर्थ त्या उत्पादनात लागणाऱ्या घटकांचे एक विशिष्ट मिश्रण असल्याखेरीज त्या वस्तूंचे उत्पादनच होत नाही असा आहे. एक बदलणारा व इतर स्थिर असे घटक असल्यास अधिक वा कमी उत्पादनच होणार नाही. पूर्वीच्या अर्थशास्त्रीय विवेचनात अशी परिस्थिती फारच क्वचित असते असे मानले जात असे. परंतु वस्तुस्थितीचा नीट अभ्यास केल्यास हीच नेहमीची व सर्वत्र आढळणारी परिस्थिती असते असे दिसून येते, कारण पूर्वीच्या विवेचनात उत्पादन तंत्र म्हणजे नक्की काय याचा खोलवर अभ्यास झालेला नव्हता. आता अशा अभ्यासाने असे प्रत्ययास आले आहे की, प्रत्येक तंत्र म्हणजे उत्पादनघटकांचे एकच एक मिश्रण असते, त्याचा उत्पादन अनुवर्त हा आदि बिंदूतून निघणाऱ्या सरळ रेषेसारखा असतो व त्यात घटकांची सरासरी व सीमान्त उत्पादकता सारखीच (समरूपच) असते. स्थिर अनुमाप प्रत्याय हे कोणत्याही उत्पादनतंत्राचे लक्षणच असते. यावरून असे दिसते की, उतरत्या फलाचा (सीमान्त संकल्पनेत मांडलेला) सिद्धान्त हा एक अमूर्त गोष्टींसंबंधीचा तर्कशुद्ध कप्पा (construct) आहे. त्याला वास्तवात कोणतेच मूर्त स्वरूप नाही. संपूर्ण चढाओढीची परिस्थिती असण्यास व टिकण्यास अशी सिद्धान्ताची नितान्त गरज भासल्यामुळे अर्थशास्त्रज्ञांनी हा अमूर्त काल्पनिक सिद्धान्त उद्घोषिला आहे. रिकार्डो यांनी हा सिद्धान्त दीर्घकालीन प्रवृत्तीसंबंधी व ज्या देशाची लोकसंख्या वाढत आहे अशा देशाविषयी सांगितला आहे. कोणत्याही एका वस्तुच्या उत्पादनासंबंधी सांगितलेला नाही. तो विशेषत: 'शेती' या संज्ञेने दर्शविलेल्या अनंत उत्पादनांच्या संदर्भात वापरल्या जाणाऱ्या मर्यादित पुरवठा असणाऱ्या उत्पादन घटकाविषयी (भूमी) सांगितलेला आहे. तशा विशिष्ट परिस्थितीत, **पण फक्त तशाच विशिष्ट परिस्थितीत,** उतरत्या फळाकडे झुकणारी संभाव्य प्रवृत्ती ग्राह्य व वास्तव मानता येईल. पण त्या परिस्थितीतसुद्धा प्रत्यक्षात रिकार्डो यांच्या अपेक्षेच्याविरुद्ध उत्पादनतंत्रातील सुधारणांमुळे अशा प्रवृत्तीचा निरास झालेला इतिहासात नमूद आहे. त्यामुळे शेतकी उत्पादनातही वाढत्या अनुमाप प्रत्यायांचा आढळ नेहमीचाच झालेला दिसतो.

आता सबंध शेतीधंद्याच्या संदर्भात सांगितलेला हा सिद्धान्त एका आर्थिक व्यवहारी संस्थेच्या किंवा उत्पादनघटकाच्या संदर्भात लावणे व ज्यावेळी कोणताही उत्पादन घटक बदलतो व इतर घटक स्थिर राहतात त्यावेळी हाच सिद्धान्त लागू पडतो असे मानणे हे चूक आहे, असे म्हणणे भाग आहे. व्यवहार-संस्थेच्या बाबतीत अल्पकालखंडात तिचे संयंत्र व यंत्रसामग्री हा स्थिर घटक म्हणता येईल. परंतु प्रत्येक यंत्रावर एका ठराविक संख्येनेच कामगार लागतात. शिवाय सर्वसाधारण पातळीवर असे म्हणता येते की, व्यवहारसंस्थेच्या संयंत्राच्या वापराची इयत्ता कमीजास्त झाली तर त्यामुळे एकूण सरासरी उत्पादन परिव्ययाच्या पातळीवर परिणाम होतो, परंतु बदलत्या घटकाच्या प्रत्यायावर परिणाम होत नाही. सर्वसाधारण नियमाप्रमाणे प्रत्यक्षात काम केलेल्या तासांची दर ताशी उत्पादकता ही यंत्रे व संयंत्रे यांचा वापर कमीजास्त झाला तरी स्थिर राहते. दीर्घकालीन कालखंडातही (जेव्हा यंत्रे व संयंत्रे स्थिर नसतात) घटत्याफळाचा सिद्धान्त लागू पडत नाही. (अधिक तपशिलासाठी पहा, माझे पुस्तक : **ऑलिगॉपॉली अँन्ड टेक्निकल प्रोग्रेस,** पृ. 26–29, 39 एन आणि 162).

उत्पादनघटक हे एकमेकास संपूरक असतात हे कोणीच नाकारीत नाही. परंतु या संपूरकतेच्या मर्यादात या घटकांच्या पर्यायनाला (म्हणजे दुसऱ्या

ऐवजी वापरण्याला) वाव असतो असे अर्थशास्त्राने गृहीत धरलेले आहे. याबाबतीत असे म्हटले जाते की, रसायनशास्त्रात जसे विशिष्ट प्रमाणातच पदार्थ एकत्र आल्याशिवाय रासायनिक क्रिया होत नाही तसे अर्थ–शास्त्राच्या जगात नसते. कारण, विशिष्ट पदार्थ वा वस्तू ही उत्पादनघटकांच्या निरनिराळ्या उत्पादनतंत्रातील निरनिराळ्या घटक मिश्रणातून तयार करता येते असा अनुभव आहे. हे खरे आहे. पण हेही खरे आहे की, प्रत्येक उत्पादनतंत्र म्हणजे घटकांचे एकच एक विशिष्ट मिश्रण असते व घटकांची ही संपूरकता अनम्य (साचेबंद) असते. जेव्हा एकापेक्षा जास्त उत्पादन–तंत्रांच्या संदर्भात आपणास चर्चा करावयाची असेल तेव्हाच घटकांच्या निरनिराळ्या मिश्रणांनी तीच वस्तू निर्माण होते ही शक्यता मानता येईल. पण या शक्यतेतून एका घटकाची सीमान्त उत्पादकता अलग करण्याची शक्यता मात्र सुतराम सफळ होत नाही.

प्रत्येक उत्पादनतंत्रात अनम्य (साचेबंद) असे उत्पादनघटकांचे मिश्रण अनुस्यूत असल्यामुळे त्या घटकांच्या सीमान्त उत्पादकतेवरून त्या घटकांना असणाऱ्या मागणीचा वक्र काढणे हे चुकीचे आहे, या निर्णयास यावे लागते. कारण असे वक्र मुळातच अस्तित्वात नसतात. उत्पादनघटकांच्याबाबतीत असतो तो मुख्य प्रश्न म्हणजे जोड मागणीचा. मार्शल यांनी या विषयाच्या विवेचनास पुष्कळ जागा दिली आहे व त्यात उत्पादनघटकांना असणाऱ्या मागणीचे वक्र हे जोड मागणीच्या सिद्धान्ताच्या निकषावरून काढले पाहिजेत असे म्हटले आहे. हा निष्कर्ष सीमान्त उत्पादकतेच्या निकषापेक्षा वेगळा आहे. हे दोन निकष मुळीच एकविध नाहीत. पहिला हा उत्पादनघटकांच्या संपूरकतेवर आधारलेला आहे तर दुसरा त्यांच्यामधील पर्यायनावर आधारलेला आहे. (घटकांचे पर्यायन एका उत्पादनतंत्रात शक्य नसून अनेक उत्पादनतंत्रांच्या संदर्भातच शक्य आहे, हे मागेच सांगितले आहे). या दोन निकषांमधील एकविधतेचा अभाव मार्शल यांच्या विवेचनात चटकन लक्षात येत नाही. कारण, त्या दोन निकषांची चर्चा वेगवेगळी व एकमेकांपासून बऱ्याच विलग ठिकाणी केलेली आहे पाचव्या भागातील सहाव्या प्रकरणात 'जोड व मिश्र' मागणीचे विवेचन आहे व सहाव्या भागातील पहिल्या प्रकरणात –'उत्पादनाच्या विभजनाचे प्राथमिक आलोचन' – राष्ट्रीय उत्पन्नाच्या विभजनाची चर्चा आहे.

श्रमबचतकारी नवशोध

आतापर्यंतच्या चर्चेवरून सीमान्त उत्पादकता या संकल्पनेच्या वापरामुळे अनेक अडचणी उद्भवतात, परंतु सरासरी उत्पादनाच्या संकल्पनेच्या वापरामुळे अशा अडचणी उद्भवत नाहीत हे स्पष्ट होईल. एकूण उत्पादनाला कोणत्याही घटकाच्या राशीने भागून सरासरी उत्पादकता काढता येते. किंवा घटक व उत्पादन यांच्या गुणोत्तराचा व्यत्यास (म्हणजे उत्पादनाच्या दर एककाला तो विशिष्ट घटक किती लागतो हे) म्हणजेच उत्पादनाचा गुणांक असतो. सर्वसाधारणपणे सीमान्त उत्पादकतेची संकल्पना त्याज्य ठरवून सरासरी उत्पादकतेच्या संकल्पनेचा विचार केला तर उत्पादन–तंत्र हे अविचल वा स्थिर असल्यास, सरासरी उत्पा–दकता ही स्थिर असते असे आढळते. परंतु कालौघात उत्पादनतंत्रे बदलतात असे मानले तर, सरासरी उत्पादकता ही वाढती असते असे आढळते. एखादा उत्पादन घटक महाग झाला तर त्या घटकाच्या कमी वापराने उत्पादकता वाढेल अशा प्रकारचे नवे उत्पादनतंत्र आपण स्वीकारू शकतो. उत्पादनघटकांची संपूरकता लक्षात घेता एखाद्या उद्योजकाला महाग झालेल्या घटकाचा वापर कमी करून उत्पादकता वाढविणे वा स्थिर राखणे शक्य नसेल तर तो इतर घटकांचा वापर कमी करून उत्पादकता टिकविण्याचा प्रयत्न करील. (तशा प्रकारचे नवीन उत्पादनतंत्र स्वीकारील). तथापि, आधुनिक भांडवलशाहीत श्रमशक्ती हीच उत्तरोत्तर महाग होत जाते असा अनुभव आहे. त्यामुळे श्रमबचतकारी नवतंत्रांचाच अवलंब केला जातो असे दिसते. जेव्हा श्रमशक्तीखेरीज इतर घटकांचा वापर (ते महाग झाल्यामुळे) कमी करून उत्पादकता टिक–विण्याचा प्रश्न येतो त्यावेळी तशा प्रकारची नवतंत्र सुलभपणे उपलब्ध असतात असे आढळते.

म्हणून कोणत्याही विशिष्ट वस्तूंच्या संदर्भात ज्या नवतंत्रशोधामुळे श्रमनिर्मिती कमी होतात ते नवशोध म्हणजे श्रमबचतकारी नवशोध असे म्हणता येते. परंतु असे नवशोध हे आर्थिक महत्त्वाचे असल्यामुळे ज्याच्यामुळे कामगारांना द्यावयाच्या एकूण वेतनातील बचत इतर घटकांवर कराव्या लागणाऱ्या खर्चापेक्षा

जास्त असेल असाच नवशोध या तंत्र स्वीकार्य ठरेल. सर्वसाधारणपणे एकूण वेतन व यंत्रसामग्रीची किंमत यांचे गुणोत्तर वाढल्यास श्रमबचतकारी तंत्रशोधांचा प्रवाह वाढेल. वेतनदर वाढल्याने वा यंत्राचा उत्पादन परिव्यय नवशोधामुळे कमी झाल्यास किंवा वेतनदरांच्या वाढीचा दर यंत्रांच्या परिव्ययवाढीच्या दरापेक्षा जास्त असल्यास हे होईल. जर वेतनदर वाढले तर सर्वच प्रकारच्या उत्पादनांचा परिव्यय वाढेल–म्हणजे यंत्रांचाही उत्पादन परिव्यय वाढेल. परंतु याचा अर्थ यंत्रांची किंमत वेतन–दरांच्या वाढीच्या प्रमाणातच वाढेल असा नाही. कारण वेतनदर t या कालखंडात वाढले तर यंत्रे ही त्यापूर्वीच्या ( म्हणजे t-l ) कालखंडात तयार झालेली असतील असे समजणे युक्त होईल. अधिक व्यापक सार्वत्रिक पातळीवर व एका नफ्याच्या दराच्या संदर्भात बोला–वयाचे तर उत्पादनसाधनांच्या (यंत्रांच्या) उत्पादनाला लागणाऱ्या वस्तू निर्माण करणाऱ्या त्याच्या मागच्या अनेक पिढ्या यासंबंधीचा स्राफा यांच्या विवेचनाचा संदर्भ घेतला पाहिजे. तो ध्यावयाचा तर यंत्रे व इतर वस्तू यांच्या किंमतीवर वेतनवाढीचा निरनिराळ्या प्रमाणात परिणाम होईल हे उघड आहे काही झाले तरी आपण या सर्व बदलांचा साकल्याने विचार केला पाहिजे. असे बदल झाल्यावरसुद्धा जर वेतन व यंत्रांची किंमत $W/P_m$ यांचे गुणोत्तर वाढले तर सर्वच उत्पा–दनात श्रमबचतकारी नवतंत्रांचा स्वीकार करण्यास उत्तेजन मिळेल.

गतिशील आणि स्थितिशील पर्यायन

जुन्या स्थितिशील पर्यायन सिद्धान्तनात सम–तोलात उत्पादनघटकांचा सीमान्त पर्यायन दर ( हा नेहमीच ऋण असतो ) आणि घटककिंमतींचे गुणोत्तर हे एकमेकाबरोबर असावे लागतात.

$$-\frac{dK}{dL} = \frac{W}{P_k}$$

म्हणून जर भांडवलाच्या किंमतीच्या मानाने वेतन दर अधिक वाढले तर ज्यात भांडवल व श्रमशक्ती यांचे गुणोत्तर पूर्वीपेक्षा जास्त होते अशा प्रकारचे उत्पादन केले जाते. येथे पूर्वीची परिस्थिती, अंतिम परिस्थिती व वेतनवाढ या संज्ञांना कालसंदर्भ नसतो–काल्पनिक, तत्काळ व परिवर्तनीय असा त्यांचा स्वभाव असतो.

परंतु गतिशील पर्यायनात याउलट कोणत्याही कारणाने एकूण वेतन व यंत्रांची किंमत यांचे गुणोत्तर वाढले की, श्रमशक्तीऐवजी यंत्रे वापरण्यास उत्तेजन मिळते. आपण श्रमशक्ती निविष्टी $l$ अक्षराने, वेतन–खर्च W अक्षराने दर्शविले व $P_{ma}$ याने यंत्रांच्या किंम-तींचा निर्देशांक दाखविला तर

$$l = a' - b' W/P_{ma}$$

हे समीकरण आपल्याला मिळते. आणि $l$ चा व्यत्यास श्रमांची सरासरी उत्पादकता दर्शवीत असल्यामुळे

$$\pi = a'' + b'' W/P_{mc} \quad (\pi = \text{उत्पादकता})$$

हे समीकरण सिद्ध होते. किंवा श्रमशक्ती व यंत्रे या–मधील पर्यायन हे सतत चालू असते हे लक्षात घेतल्यास

$$\hat{\pi} = a'' + b\,\hat{W}/P_{ma}$$

हे समीकरण मिळेल, यातील π व W वरची टोपी त्या अक्षरांनी दर्शविलेल्या गोष्टींचा कालौघातील बदलाचा दर दर्शविते.

स्थितिशील व गतिशील पर्यायनातील (ते दर्श–विणाऱ्या वरील समीकरणातील) औपचारिक साम्य राहतेच. उदाहरणार्थ, श्रमशक्तीच्या वापरातील थोडा बदल (dL) आणि श्रमशक्ती निविष्टी ( $l$ ) यातील बंध स्पष्ट आहे. आणि दोन्ही प्रकारच्या समीकरणात वेतनदर आहेच. तसेच यंत्रांची किंमत ($P_{ma}$) ही भांडवल ($P_k$) यासारखीच दिसते. परंतु गतिशील पर्यायनाच्या समीकरणात भांडवलातील थोडा बदल दाखविणारे कोणतेही पद नाही. तथापि, या दोहोंतील फरक याहून पुष्कळच मूलगामी आहे. मूळ फरक मुळच्या संकल्पनेतच आहे दोन घटकातील पर्यायनाचा सीमान्त दर म्हणजे त्या दोन घटकांच्या सीमान्त उत्पादकतेचे गुणोत्तर असते असे मानले जाते.

$$\frac{\partial X/\partial L}{\partial X/\partial K} = \frac{dK}{dL}$$

परंतु वर सांगितल्याप्रमाणे आपण घटकाच्या सीमान्त उत्पादकतेची संकल्पनाच अस्वीकृत ठरविली आहे. जुन्या सिद्धान्तनात 'भांडवल' या संज्ञेचा अर्थ अस्पष्ट आणि धूसर आहे व 'भांडवलात' स्थिर भांडवला–बरोबर कार्यकारी भांडवलाचाही समावेश आहे. या जुन्या सिद्धान्तनातील संकल्पनेऐवजी आपण फक्त

उत्पादनयंत्रांची किंमतच आपल्या सिद्धान्तनात घेतली आहे. त्याचप्रमाणे जुन्या सिद्धान्तनान्वये भांडवलाची किंमत म्हणजे व्याजाचा दर असे न समजता आपण यंत्राच्या किंमतींचा निर्देशांक घेतला आहे. याशिवाय जुन्या सिद्धान्तनात उत्पादनात होणारे फरक हे प्रत्यावर्ती समजले जातात. आपल्या सिद्धान्तनात होणारे फरक हे कालौघात होणारे आहेत व म्हणूनच ते अप्रत्यावर्ती आहेत. शेवटी, जुन्या सिद्धान्तनात सर्व उत्पादनतंत्रे माहीत व उपलब्ध असून त्यातून निवड करावयाचा प्रश्न असतो. तर आपल्या सिद्धान्तनात तंत्रांची प्रगती कशी होते याचे अन्वेषण अभिप्रेत आहे. ही प्रगती एकूण वेतन व यंत्रांची किंमत यांच्या गुणोत्तरातील फरकाने व इतर आवेगांनी होते हे वर सांगितलेच आहे.


गंमत अशी आहे की, घटकाची सीमान्त उत्पादकता अग्राह्य ठरली तरी सीमान्त पर्यायन दर ही संकल्पना स्वीकार्य आहे. एकाहून अधिक घटक-मिश्रणांच्या (श्रम व भांडवल) साह्याने एका गोष्टीच्या विशिष्ट राशीचे उत्पादन करता येत असेल तर ज्या मिश्रणात भांडवलाचे प्रमाण जास्त असेल त्यात श्रमशक्ती कमी झाली आहे असे म्हणता येईल. एका उत्पादनतंत्राऐवजी दुसऱ्या उत्पादनतंत्राचा स्वीकार करण्याने (किंवा एका घटकमिश्रणापासून दुसऱ्या घटकमिश्रणाकडे जाताना) बदलणाऱ्या घटकाशिवायचे घटक-ऊर्जा, कच्चा माल व अपुऱ्या उत्पादित वस्तू-तसेच (म्हणजे स्थिर) राहतात असे समजणे अयोग्य ठरणार नाही. (सीमान्त उत्पादकतेच्या सिद्धान्तकल्पनेवर आधारलेल्या सिद्धान्तात उलट असे गृहीत धरावे लागते की, बदलत्या घटकाशिवायच्या घटकांच्या राशी अगदी तशाच राहतात. कारण, त्यात सूक्ष्म फरक पडला तरी उत्पादन वाढेल आणि ते तर अस्वीकार्य आहे). सीमान्त पर्यायन-दराचे गणिती रूप स्वीकार्य आहे पण सीमान्त उत्पादकता दराचे गणिती रूप स्वीकार्य नाही. पण पर्यायन-दराच्या गणितात एक साधा विकलज आहे, तर सीमान्त उत्पादकतेच्या दरात आंशिक विकलज आहे.

उत्पादनतंत्राचे श्रमवर्धी, श्रमबचतकारी वगैरे जे वर्गीकरण हिक्स यांनी सुचविलेले आहे ते सीमान्त उत्पादकतेच्या संकल्पनेवर आधारलेले असल्यामुळे अस्वीकार्य आहे. मी वर सुचविलेच आहे की, ज्या नव-तंत्रात श्रमनिविष्टी पूर्वीच्या तंत्रापेक्षा कमी असतील त्याला श्रमबचतकारी असे म्हणावे. इतर घटकांच्या बाबतीतही हेच म्हणता येईल. अविकारी (neutral) नवतंत्र ही संकल्पना अर्थहीन आहे. यासंबंधी काही म्हणावयाचे तर असे म्हणता येईल की, काही नवशोध कोणत्याच उत्पादनघटकाचा वापर कमी करणारे नसतात, पण त्यातून पूर्वी नसलेल्या नवीन वस्तू निर्माण होतात.

### वाढत्या सीमान्त उत्पादनपरिव्ययाचे थोतांड

अविरत होणारी तांत्रिक प्रगती ही आधुनिक युगातील उत्पादनप्रक्रियेस वाढत्या प्रत्यायांची बनविते. हे वाढते प्रत्याय गतिशील वाढते प्रत्याय असतात. स्थितिशील वाढत्या अनुमाप प्रत्यायांचा उगम त्यावेळी ज्ञात असलेल्या तंत्रज्ञानात असतो. या दोन प्रकारच्या वाढत्या प्रत्यायात फरक करणे सोपे नसते. पण आधुनिक अर्थव्यवसायात गतिशील वाढते प्रत्याय महत्त्वाचे व वारंवार होणारे असतात असे खात्रीपूर्वक म्हणता येईल. स्थितिशील वाढते प्रत्याय हे कधीकधी मिळणारे व बहुधा देशादेशातील तंत्रज्ञानाच्या अनुकरणप्रक्रियेतून जन्म घेतात.

आधुनिक अर्थव्यवस्थांतून गतिशील वाढते प्रत्यायन मुख्यत्वे प्रचलित असतात असे वर म्हटले याचा अर्थ अल्पकाळात, उपलब्ध तंत्रज्ञानाच्या संदर्भात, प्रत्याय सर्वसाधारणपणे स्थिर असतात — उत्पादनाच्या संदर्भात स्थिर असतात — ही गोष्ट नाकारणे असा नाही. पुढील आकृतीत X अक्षावर उत्पादनाची राशी दाखविली आहे (X) आणि Y अक्षावर श्रमशक्तीची सरासरी उत्पादकता (X/Y) दर्शविली आहे. मग कोणतेही दिलेले उत्पादन तंत्र X अक्षाला समांतर अशा सरळ रेषेने दाखविता येईल. गतिशील वाढते प्रत्याय हे या रेषेला अनेक समांतर रेषा काढून दाखविता येतील. या समांतर रेषा हळूहळू पण निश्चितपणे वर वर सरकत असतात. प्रत्येक सरळ रेषा म्हणजे एक विशिष्ट तंत्र होय, व प्रत्येक रेषेला कालसंदर्भ असतो. (म्हणजे त्यावर त्याची तारीख लिहिलेली असते).





जर चल (बदलत्या) उत्पादकघटकाची सरासरी उत्पादकता स्थिर असेल तर सीमान्त परिव्यय हा प्रत्यक्ष परिव्यय किंवा चलपरिव्यय यांच्याइतकाच असतो. आणि अल्पकालीन एकूण सरासरी उत्पादन परिव्यय, उत्पादन सयंत्रांच्या क्षमतेच्या उत्पादनमर्यादेपर्यंत जाईतोवर कमी होत जातो. (जर अनुमापी आर्थिक अनुकूलता उपलब्ध होत असल्या तर दीर्घकालीन सरासरी परिव्यय घटणारा असतो. ना पक्षी तोही स्थिर असतो).

बासष्ट वर्षापूर्वी ही परिस्थिती स्राफा यांनी अचूकपणे वर्णिली होती. "दररोजचा अनुभव पाहिला तर असे दिसते की, पुष्कळ उपक्रमी अर्थसंस्थांतून आणि बहुसख्य औद्योगिक बनावटीच्या भोगवस्तू उत्पादन करणाऱ्या प्रत्येक कारखान्यात घटत्या परिव्ययाची परिस्थिती असते. . . . आपण आर्थिक स्पर्धेच्या परिस्थितीत धंदा करतो असे मानणाऱ्या उत्पादकाना जर सुचविले की, 'त्यांच्या उत्पादन संयंत्रांच्या (व्यवहाराच्या) एकूण परिस्थितीत त्यांचा उत्पादनपरिव्यय वाढल्याशिवाय उत्पादन वाढविता येत नसल्याने त्यांच्या अन्तर्गत परिस्थितीमुळेच त्यांच्या उत्पादनवाढीवर मर्यादा पडतात,' तर ही सूचना अवास्तव व हास्यास्पद आहे असेच ते म्हणतील. "[2]


स्राफा यांनी हे जरी परखडपणे सांगितले असले तरी बहुतेक अर्थशास्त्रज्ञांनी त्यांच्या युक्तिवादाकडे काणाडोळाच केला. त्यानंतर काही वर्षांनी कॅलेस्की[3] यांनी तेच मत मांडले. परंतु अर्थशास्त्रज्ञानी त्याला भीक न घालता U–आकाराचे परिव्यय वक्र शिकविण्याचे सोडलेले नाही. जेव्हा पैशातील वेतनदर वाढत जातात त्यावेळी उतरत्या फलाच्या सिद्धान्तामुळे वास्तव वेतनदर त्याच्या विरुद्ध दिशेला झुकतात म्हणजे कमी होतात, हे केन्स यांनी 'जनरल थिअरी 'त मांडलेले मत प्रत्यक्षातील माहिती तपासता बरोबर उलटे आहे, असे जेव्हा डनलॉप[4] यांनी दाखविले तेव्हा त्यांचा निष्कर्ष स्राफा यांच्या पूर्वोक्त निष्कर्षाशी सुसंगतच होता. डनलॉप याना उत्तर देताना केन्स[5] यांनी लिहिले की, वास्तव व पैशातले वेतनदर एकमेकाच्या विरुद्ध दिशेने बदलतात अशी घटत्या फलाच्या सिद्धान्तानुसार इंग्रज अर्थशास्त्रज्ञांची समजूत होती. (इग्रजेतर शास्त्रज्ञांची निराळी नव्हती). 1939 मध्ये हॉल व हिच[6] यांनी केलेल्या पाहणीचा अहवाल प्रसिद्ध झाला. आणि त्याअनुसार अर्थव्यवहारक हे सरासरी प्रत्यक्ष परिव्यय हे स्थिर असतात व म्हणून सीमान्त परिव्ययही तसेच असतात असे मानतात असे आढळले. त्यानंतरच्या काळात झालेल्या अनेक पाहण्यांतून जर उत्पादनतंत्र तेच असेल तर घटते प्रत्याय नव्हे तर स्थिर प्रत्यायच वास्तवात भेटतात व उत्पादनतंत्रे बदलती असतील तर वाढते प्रत्याय भेटतात हे अनेकवार सिद्ध झालेले आहे. पण फार थोड्या अर्थशास्त्रज्ञांचा अपवाद सोडल्यास इतर सर्वांनी आपली भृकुटीमुद्रा वर केलेली नाही. वर उल्लेखिलेल्या संशोधनातील काही निष्कर्ष संकल्पनारूप पावले आहेत, परंतु सर्व नाही. पण त्यातून काढावयाच्या निष्कर्षांत फरक पडलेला नाही.

अनेक उद्योगांच्या सांख्यिकी माहितीच्या अन्वेषणात बहुतेक ठिकाणी अल्प आणि दीर्घ कालखंडात सीमान्त परिव्यय हे स्थिर असतात किंवा घटते तरी असतात असे आढळते.[7] तरीसुद्धा मॅन्सफील्डसारखे जुन्या सिद्धान्तनाच्या पकडीतून मुक्त न झालेले अर्थशास्त्रज्ञ हे 'अंतिमतः सीमान्त परिव्यय हे उत्पादन वाढले असता वाढणार नाहीत हे अशक्य वाटते.' असे बिनदिक्कत म्हणतात. ते बहुधा जुन्या सिद्धान्तावरील श्रद्धेमुळेच असेल! अशी श्रद्धावान मंडळी आपल्या या चुकीच्या सिद्धान्तनाचे समर्थन पुढीलप्रमाणे करतात. अनुभवानुसार निरीक्षणातील माहितीप्रमाणे सीमान्त परिव्यय हे बऱ्याच मोठ्या अवकाशात साधारणपणे स्थिर असतात व तेच या माहितीच्या आलेखातून दिसते. पण जेव्हा उपलब्ध संयंत्रांच्या उत्पादनक्षमतेच्या जवळपास उत्पादनवाढ जाईल तेव्हा परिव्यय

वक्र वर जाऊ लागतील. हे दोन प्रकारचे वक्र आकृतीत दाखविले आहेत; त्यापैकी पहिला (आकृती 1) अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या जुन्या सिद्धान्ताशी इमान राखण्यासाठी कल्पिलेला आहे. व दुसरा (आकृती 2) हा सांख्यिकी माहितीच्या अन्वेषणातून सतत दृष्टिगोचर झालेला आहे.




आकृती 1




आकृती 2

पहिल्या आकृतीत A आणि B या मध्यंतरात अपाटच्याने होणारी परिव्ययाची वाढ ही दुसऱ्या आकृतीत मुळीच नाही, हा त्या दोहोंतला फरक आहे. पण A–B या मध्यंतरातील वक्राचा भाग कोणत्याही सांख्यिकी अन्वेषणात दिसत नाही त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करण्याचा आपल्याला अधिकार आहे. हे सांख्यिकी अन्वेषणाच्या पातळीवर झाले. पण सैद्धान्तिक (म्हणजे तार्किक) पातळीवर त्याकडे दुर्लक्ष करणे हे आपले कर्तव्यच आहे. कारण, हा वक्र अशा प्रकारे वर जातो हे अन्वेषणाच्या निकषास उतरत नाही. अर्थशास्त्रज्ञांनी या सर्व गोष्टींकडे पाठ फिरवली आहे. पण आता या निष्कर्षांना सामोरे जाण्याची वेळ आली आहे असे मला वाटते.

भांडवलगुंतवणुकीवरील अपेक्षित प्रत्याय आणि व्याजाचा दर

माझ्या मते अर्थशास्त्रज्ञांनी आता आपली जुनी धारणा बदलून भांडवलगुंतवणुकीवरील अपेक्षित प्रत्यायांची समस्या उघड्या डोळ्यांनी पुन्हा तपासून पाहणे आवश्यक झाले आहे. सीमान्त उत्पादकतेच्या संकल्पनेतून या प्रश्नाचे पूर्वी चर्चिलेल्या प्रश्नाशी घनिष्ट नाते लागते.

जर एखादे सिद्धान्तन चुकीचे असेल तर त्यावरची टीका विविध व त्याचवेळी सुदृढ अशी असू शकते. आपण असे म्हणतो की, जेव्हा एखादी नाव सर्वांगी गळत असेल तर तिच्यातील छिद्रे एका मागोमाग एक या क्रमाने शोधणे योग्य ठरते. कारण, नाव चालवणारे नावाडी नाव मुळी गळतच नाही असे आग्रहाने ठासून सांगत असतात. वरच्या मूलग्रामी प्रश्नासंबंधी स्राफा यांनी मूलस्पर्शी अशी अन्वेषणा केली आहे. त्यांचा महत्त्वाचा सिद्धान्त हा की, उत्पन्नवितरण आणि किमती यांच्या स्वतंत्र असा भांडवल हा एकराशी सदृश पदार्थ वा गोष्ट आहे असे मानणे चूक आहे.

जिथे मूळ संकल्पनेतच घोटाळा असतो तेथे अर्थाची धूसरता असतेच. भांडवल व भांडवलाची किंमत या संकल्पनांबद्दलचा गोंधळ त्यामुळे सनातनच आहे. भांडवल याचा अर्थ कधी स्थिर भांडवल तर कधी स्थिर भांडवल व चल भांडवल यांची बेरीज असा केला जातो. बहुतेक वेळा तो स्थिर भांडवल असाच केलेला आढळतो. जेव्हा भांडवल म्हणजे एक दिलेली राशी या संकल्पनेतील दुर्लंघ्य अडचणी अर्थशास्त्रज्ञांना जाणवू लागल्या तेव्हा त्यांनी त्यावर मात करण्यासाठी एका चाटुक्तीचा आधार घेतला. भांडवल म्हणजे एक जेलीसारखा पदार्थ आहे. पण चाटुक्ती म्हणजे सैद्धान्तिक अन्वेषणा नव्हे.

नवअभिमत अर्थशास्त्री जेव्हा उत्पन्न वितरणाच्या प्रश्नाची उकल करू पाहतात त्यावेळी या संकल्पनेच्या धूसर अर्थाचे शिखर गाठले जाते. येथे समुच्चयित उत्पादन फलाची ( अनुवर्ताची ) संकल्पना रंगमंचावर येते. तिच्यात मुळातच असलेल्या अनेक दोषामुळे तिच्याआधारे विवेचन करणे अवघड होते. अशा उत्पादन फलात ( अनुवर्तात ) एक राशी श्रमशक्तीची ( L ) – म्हणजे एकजिनसी केलेल्या कामगारांचा जमाव – असते व भांडवल म्हणजे सकृत्दर्शनी अस्तित्वात असलेले स्थिर व चल भांडवल व त्याची किमत म्हणजे व्याजाचा दर. हा व्याजाचा दर आणि नफ्याचा दर हे समतोलाच्या स्थितीत सारखे असतात. यात कोठेही आनुषंगिक परिव्ययाचा विचार आल्यास उत्पन्न वितरणाचा उलगडा समुच्चयित फलाच्या ( अनुवर्ताच्या ) द्वारे करणे अशक्य असते.

अर्थव्यावसायिक भांडवलाचा वित्तीय परिभाषेत विचार करतात. त्यांना भांडवल म्हणजे क्रयशक्ती आणि व्याजाचा दर म्हणजे व्यवसायाच्या नफ्यातून साठलेली क्रयशक्ती अपुरी असल्याने ती पुरेशी करण्यासाठी जे कर्ज घेण्यासाठी जी किमत द्यावी लागते ती या त्यांच्या मताचा आपण विचार केला पाहिजे वरील प्रकारची धारणा असलेल्या परिस्थितीत व्याजाच्या दराची घट होते त्यावेळी श्रमशक्तीऐवजी भौतिक स्वरुपातील जादा भांडवल पर्यायाने वापरले जाते असे नव्हे. उलट, व्याज कमी झाल्यामुळे उत्पादन वाढविण्यासाठी अधिक उत्पादक वस्तू विकत घेण्यास व त्यात अनुषंगाने अधिक श्रमशक्ती कामावर घेण्यास, उत्तेजन मिळते. त्यामुळे व्याजाचा दर हळूहळू पण सतत कमी होत असताना दर कामगारी भांडवलवर्धी व भांडवलछेदी प्रकारच्या उत्पादनतंत्रात पुनःपुन्हा अंतरण होत राहते यात आश्चर्य नाही. स्त्राफा यानी आपल्या पुस्तकात चर्चिलेला तंत्राच्या अंतरणांचा हाच प्रश्न . . . त्या चर्चेत स्त्राफा यांनी असे दाखविले की, उत्पादनतंत्राच्या निवडीत वेतनदर आणि व्याजाचे दर यातील बदल या एकमेकाविरुद्ध वर्तणाऱ्या शक्ती आहेत असे मानण्यात काहीच अर्थ नाही.

मग जर व्याजाचा दर म्हणजे भांडवलगुंतवणुकीचा परिव्यय असे मानावयाचे नाही तर भांडवलगुंतवणुकीचा परिव्यय कोणता समजावयाचा ? अर्थातच उत्पादनसामुग्रीच्या किमती, विशेषत: स्थिर भांडवलाची किमत. पण मग उत्पादन वितरणाचा उलगडा करण्यास समुच्चयित उत्पादन फलाचा ( अनुवर्ताचा ) वापर आपल्याला करता येणार नाही.

सीमान्त सिद्धान्तनानुसार उत्पन्न विभाजन

पूर्वी म्हटल्याप्रमाणे जर उत्पादनघटक एकमेकाना संपूरक असतील पण एकाच उत्पादनतंत्रात अपर्यायी असतील तर सरासरी व सीमान्त उत्पादकतेत फरक करता येत नाही मग जर एक दिलेले उत्पादनतंत्र असेल तर सरासरी उत्पादकता स्थिर असेल आणि ती काल्पनिक सीमान्त उत्पादकतेएवढीच असेल आणि मग त्या परिस्थितीत उत्पन्न विभजनातील उत्पादनघटकांचा प्रत्येकी भाग काढता येणार नाही. समुच्चयित उत्पादनफल (अनुवर्त) $x = f ( L, K )$ असे असेल व जर ते आदिबिंदूतून जाणाऱ्या सरळ रेषेने आलेखिता येत असेल तर $dx/dL$ हे आंशिक विकलन $X/L$ या गुणोत्तराइतकेच असेल. या समुच्चयित उत्पादनफलातून खालील गणिती संबंध आपल्याला मिळतात.

$$\frac{dX}{dL}.L + \frac{dX}{dK}.K = X \qquad (A)$$

पण वर दाखविल्याप्रमाणे $\frac{dX}{dL} = \frac{X}{L}$ आणि

$\frac{dX}{dK} = \frac{X}{K}$ आहे तर $\frac{X}{L}.L + \frac{X}{K}.K = X$

असे प्राप्त होईल. म्हणजे $X + X = X$ हे सर्वस्वी चुकीचे उत्तर त्यातून निघते. एखाद्या उत्पादकघटकाच्या सरासरी उत्पादकतेत इतर घटकांच्याकडून उत्पादनाला होणाऱ्या योगदानांचाही समावेश असतो. एखाद्या घटकाची सरासरी उत्पादकता ही त्या घटकात फरक झाल्यास उत्पादनात किती फरक झाला एवढीच गोष्ट ग्रंथित करते. आपण जेव्हा श्रमाची उत्पादकता म्हणतो तेव्हा त्यात भांडवलाची उत्पादकताही समाविष्ट असते. तशीच भांडवलाच्या सरासरी उत्पादकतेत श्रमाची उत्पादकता समाविष्ट असते.

पारंपरिक सिद्धान्तनात आणखी एक आन्तर विरोध आहे. ज्यावेळी समुच्चयित उत्पादनफलाचा उपयोग उत्पन्न विभजनातील उत्पादनघटकांचे प्रत्येकी वाटे ठरविण्यासाठी केला जातो तेव्हा निदान समतोलात

तरी स्थिर अनुमाप प्रत्याय असले तरच अगदी उघड उघड अवास्तव अशी उत्तरे आपल्याला मिळत नाहीत. पण पारंपरिक सिद्धान्तनान्वये अल्पकालीन व दीर्घ-कालीन उत्पादनपरिव्ययाचे वक्र हे U-आकाराचे असतात. म्हणजे प्रथम वाढते व मग उतरते प्रत्याय असतात. या विरोधाभासाचा निरास करण्यासाठी असे गृहीत धरण्यात येते की, प्रत्येक व्यवसायसंस्था तिच्या परिव्यय वक्राच्या नीचतम बिंदूवर असते आणि एकूण उत्पादनाची वाढ अगर घट ही त्या उत्पादनात गुंतलेल्या व्यवसायसंस्थांची संख्या जास्त कमी होण्यावर अवलंबून असते. अवास्तव व अर्थहीन सिद्धान्तन राखण्यासाठी कशा प्रकारची सर्कस करावी लागते हेच या गृहीतकांच्यावरून दिसून येते.

समुच्चयित फळाचे (अनुवर्तीचे) पितळ उघडे पडल्यावर बऱ्याच अर्थशास्त्रज्ञानी ते (समष्टीय फळ) सोडून व्यष्टीय उत्पादन फलाच्या बालेकिल्ल्यात आश्रय घेतला आहे.[8] परंतु अशा व्यष्टीय फलांची विवेचन-शक्ती फारच अल्प असते. कारण, त्यांच्या संदर्भात एका घटकाचा प्रपंच करताना आपल्याला आंशिक विकलजांचा वापर करता येत नाही, आणि काहीही झाले तरी व्यष्टीय उत्पादनफलाच्या साहाय्याने समष्टीय वितरणावर काहीच प्रकाश पडत नाही.

केन्स यांचा सीमान्तवाद

खरोखर पाहता, नव अभिमत अर्थशास्त्राविरूद्ध बंड उभारणारे अशी केन्स यांची प्रतिमा आहे. पण त्या शास्त्रातील सीमान्त या मूलभूत संकल्पनेच्या संदर्भात ते पुराणमताभिमानी वाटतात. माझ्या मते हा आभास आहे. आपण जे दिसते त्यावरून फसता उपयोगी नाही या लेखाच्या मथळ्यात जे दोन विषय उल्लेखिलेले आहेत त्यांच्या संदर्भात मी हे म्हणत आहे. आपण घटत्या फलाचा सिद्धान्त प्रथम घेऊ.

'जनरल थिअरी' या पुस्तकात केन्स यानी स्पष्टपणे त्याचा स्वीकार केलेला आहे पैशातील वेतन व वास्तव वेतन यामधील परस्पर संबंधाबद्दल प्रत्यक्ष माहितीच्या अन्वेषणाने सिद्धान्तन करण्याचे आवाहन त्यानी केले आहे. घटत्या फळाच्या सिद्धान्तामुळे या दोन प्रकारच्या वेतनदरात पडणारे फरक परस्पर विरूद्ध दिशेने होतात असे त्यांचे प्रतिपादन आहे. केन्स यांचे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर डनलॉप[9] व टारशीस[10] या दोन अमेरिकी अभ्यासकानी केन्स यांचे आवाहन स्वीकारून उपलब्ध माहितीची खोलवर चिकित्सा केली व त्याआधारे केन्स यांच्या अगदी विरूद्ध निष्कर्ष काढले. त्यामुळे उतरत्या (घटत्या) फळाचा सिद्धान्त धोक्यात येत आहे याची केन्स याना जाणीव झाली. परंतु त्या सिद्धान्ताचा त्याग करण्याची त्यांची तयारी नव्हती. म्हणून अशा टोकाला जाण्यापूर्वी आणखी व अधिक शास्त्रशुद्ध अशी या विषयाच्या अन्वेषणाची गरज आहे असे त्यानी सुचविले. परंतु त्याचवेळी त्यानी असा इशारा दिला की, उतरत्या फळाचा सिद्धान्त समजा असिद्ध ठरला तरी त्यांच्या इतर सिद्धान्तनावर काहीच परिणाम होणार नाही. उलट, ज्या अर्थव्यवस्थेच्या विस्तारवादी धोरणांचा स्वीकार करण्याचा ते पुरस्कार करीत होते त्याला अधिक दुजोरा त्याने मिळेल.

परंपरागत सिद्धान्तातला (आणि पूर्वी नोंदलेला) बऱ्याच अवकाशात सीमान्त परिव्यय स्थिर असण्याची परिस्थिती युद्धापूर्वीच्या दशकातील आर्थिक मंदीच्या वातावरणात ठीक वाटण्याजोगी होती. 'जनरल थिअरी'च्या एकविसाव्या प्रकरणातील किंमत सिद्धान्तन हे पूर्णपरिव्यय किंमतीच्या ( make up price ) तत्त्वावर उभारलेले आहे. परंतु हे तत्त्व व्यवसायसंस्थांना उतरत्या प्रत्यायाचा सिद्धान्त लावण्याच्या सर्वस्वी विरोधी आहे. 1964 मध्ये चुटली[11] यानी केन्स यांचे प्रतिमान पूर्णपरिव्यय तत्त्व गृहीत धरल्याशिवाय व अर्थव्यवस्थेतील उत्क्रमी हे त्या तत्त्वाप्रमाणे आपल्या उत्पादनाच्या किंमती ठरवीत असल्याखेरीज सुसंगत होत नाही हे सिद्ध करून दाखविले होते. या प्रश्नाबाबत केन्स यानी कधीच निश्चित अशी भूमिका घेतली नाही. परंतु डनलॉप आणि टारशीस यांच्याशी प्रतिवाद करताना आपण परंपरागत सिद्धान्तापासून दूर आहोत हे त्यानी अधोरेखित केले होते. "अर्थशास्त्रज्ञाव्यतिरिक्त कोणीही सीमान्त परिव्ययावरून मुख्यत: किंमती ठरतात असे समजत नाही. सीमान्त परिव्ययाच्या सूक्ष्म गणिताने त्यांचे किंमतविषयक धोरण ठरते असे अर्थव्यावसायिकानी सांगितल्यास त्याना आश्चर्य वाटते. हा मार्ग निश्चितपणे दिवाळखोरीकडे नेणारा आहे असे त्यांचे ठाम मत

दिसते." खरोखर पाहता, डनलॉप व टारशीस यांचे निष्कर्ष उतरत्या प्रत्यायांच्या सिद्धान्ताला तिरस्त करतात एवढेच नव्हे तर त्याच्या विरोधी (वाढत्या प्रत्यायांच्या) सिद्धान्ताला दुजोरा देतात. परंतु स्थिती-शील परिस्थितीत तंत्रबदल हा वर्ज्य असतो. केन्स याना त्यावेळच्या बहुमान्य सिद्धान्ताप्रमाणे असे खात्रीने वाटत होते की, आपण अल्पकालखंडाबाबत बोलत असल्याकारणाने त्यात तंत्रज्ञान (म्हणजे अस्तित्वात असलेली तंत्रे) स्थिर असते. सिद्धान्तनातील अमूर्त अल्पकालखंडाबद्दल असे गृहितक जरी योग्य असले तरी डनलॉप व टारशीस यांचे प्रत्यक्षाश्रयी निष्कर्ष तपास-ताना ते गैरलागू ठरते. कारण, जेथे प्रत्यक्षातील बद-लती परिस्थिती अन्वेषिली जात असते तेथे अल्पकाळा-तही तंत्र झपाटयाने बदलण्याचा निर्णय करणे जरी शक्य नसले तरी त्या पूर्वीच्याकाळी केलेल्या तंत्रबद-लांच्या योजनांमुळे त्या अल्पकाळातही तंत्रबदल होऊ शकतो.

अगदी साक्षेपानेच बोलावयाचे झाले तर पूर्ण-परिव्यय तत्त्वावर आधारलेल्या किंमत सिद्धान्ताशी नवअभिमत अर्थशास्त्रातील पूर्ण स्पर्धेचे गृहीत सुसंगत नाही. कारण, त्यात सीमान्त परिव्यय हे कोणत्या तरी बिंदूपासून वाढते असावे लागतात. त्याच्या प्रतिमाना-तील अर्थव्यवस्थेत वस्तूंचा बाजार कशा प्रकारचा असतो याबद्दल केन्स यानी विशेष काटेकोर विधाने न करता गोळाबेरीज सर्वसाधारण विधानावर भागविले आहे. 'आर्थिक स्पर्धेचा जोर मनस्वी असतो' असे ते गृहीत धरतात पण तो फार मनस्वी असतो की कमी मनस्वी असतो हे ते सांगत नाहीत. आधुनिक अर्थ-व्यवस्थातून बाजार अपूर्ण स्पर्धेचा असण्याची शक्यता डनलॉप व टारशीस यांना उत्तर देताना ते नाकारत नाहीत. पूर्णपरिव्ययापेक्षा काही टक्के जास्त अशी किंमतींची धारणा (अधिकिंमत तत्त्वाप्रमाणे) असेल तर ती परिस्थिती केन्स यांच्या दृष्टिकोनाशी सुसंगत नाही हे खालील समीकरणाने दर्शविता येईल.

$P = \alpha W/\pi$

$P$ = Price level
$\alpha$ = Mark-up
$W$ = Wage-rate
$\pi$ = labour productivity

या समीकरणात दर्शविलेले आर्थिक संबंध हे जेव्हा अर्थव्यवस्थेत बरीच बेकारी असते व उत्पादन-सामग्रीच्या क्षमतेचा वापर अगदी कमी असतो त्यावेळी कार्यप्रवण असतात. परंतु जेव्हा रोजगारी वाढून बेकारी नाहीशी होते त्यावेळी मजुरीचे दर वाढतात व घटत्या प्रत्यायामुळे श्रमांची उत्पादकता कमी होते, असे केन्स यांचे विवेचन आहे. 'जनरल थिअरी' या ग्रंथाच्या बऱ्याच मोठ्या भागात ज्या अर्थव्यवस्थेत पुष्कळ बेकारी आहे व उत्पादनसाधनांच्या वापराची इयत्ता अगदी कमी आहे अशाच अर्थव्यवस्थेचे वर्णन असल्या-मुळे वर दर्शविलेला साधासरळ संबंध हा प्रमाण मानला जातो. हे सर्व लक्षात घेता आणि केन्स यांच्या सिद्धान्तनाचा व्यष्टीय पाया लक्षात घेता अल्पकाळात उद्योगधंद्यात घटत्या प्रत्यायाचा सिद्धान्त हा केन्स यांच्या एकूण सिद्धान्तनाच्या मर्मस्थानी मुळीच नाही हेच प्रतीत होते.

तीच गोष्ट त्यांच्या भांडवलगुंतवणुकीवरील अपेक्षित प्रत्यायासंबंधीच्या प्रश्नाची आहे. प्रथमदर्शनी केन्स यांची भूमिका नवअभिजात अर्थशास्त्रासारखीच आहे असे वाटते, पण अधिक खोलवर विचार केल्यास ती तशी नाही हे पटते जुन्या सिद्धान्तनात भांडवलाची सीमान्त उत्पादकता या संकल्पनेला फार महत्त्व व मध्यवर्ती भूमिका आहे, परंतु केन्स यांच्या विवेचनात तसे नाही. 'गुंतवणुकीवरील अपेक्षित सीमान्त लाभ' ही केन्स यांची संकल्पना भांडवलाच्या सीमान्त उत्पा-दकतेच्या संकल्पनेपेक्षा अगदी निराळी आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे भांडवलाची सीमान्त उत्पादकता ही भांडवलात थोडा बदल झाल्यास त्यामुळे होणाऱ्या उत्पादनातील बदलाच्या गुणोत्तराने, म्हणजेच त्यांच्या आंशिक विकलजाने, मोजली जाते व त्यावेळी इतर उत्पादनघटकात थोडाही फरक झाला नसणे हे गृहीत आहे. पण केन्स यांच्या संकल्पनेत त्या भांडवलगुंतव-णुकीमुळे उत्पादनात होणाऱ्या भावी वस्तूंच्या विक्रीतून मिळणारी लाभांची श्रेणी ही अभिप्रेत आहे आणि लाभ याचा अर्थ उत्पादनाच्या विक्रीतून त्या उत्पादन वाढीसाठी लागलेला जादा प्रासंगिक परिव्यय वजा करून उरतो तो असा आहे. (मार्शल यांनी अशीच व्याख्या केली आहे याची नोंद आपण पूर्वीच केलेली आहे). अधिक काटेकोरपणाने बोलावयाचे म्हटले तर, अपेक्षित लाभाचा सीमान्त दर म्हणजे ज्या बटणा-वळीच्या दराने गुंतवणूक करावयाच्या उत्पादनसाधनांची

खरेदी किमत व त्या उत्पादनसाधनांच्या आयुर्मर्यादेत त्यापासून मिळणाऱ्या अपेक्षित लाभाच्या श्रेणीचे वर्तमान मूल्य सारखे होते तो वटणावळीचा (discount) दर होय. ही व्याख्या लक्षात घेतली तर जेव्हा बाजारातील व्याजाचे दर कमी होतात त्यावेळी अधिक उत्पादनसाधने विकत घेतली जातात. म्हणजेच गुंतवणुकीची राशी वाढते. व्याजाचे दर कमी झाल्यामुळे होणाऱ्या परिणामांची मीमांसा करतानाच या दोन संकल्पनातील फरक स्पष्टपणे नजरेस येतो. परंपरागत सिद्धान्ताप्रमाणे व्याजाचे दर कमी झाले तर उत्पादनतंत्रातील घटकांची विशिष्ट मिश्रणे बदलतात. त्यातील भांडवलाचे प्रमाण वाढते व श्रमाचे कमी होते. परंतु केन्स मीमांसेप्रमाणे याउलट भांडवल गुंतवणूक वाढते. त्यात भांडवलाचे प्रमाण कमी होईल वा जास्त होईल. व्याजाचे दर कमी झाले तर त्यावरून घटकांची मिश्रणे बदलतील वा एकाऐवजी दुसऱ्या घटकाचे पर्यायन वाढेल असा निष्कर्ष काढता येणार नाही.

डनलॉप व टारशीस यांना दिलेल्या उत्तरात केन्स यांनी कॅलेस्की यांच्या 1938 मध्ये इकनॉमिट्रिका या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या उत्पन्न वितरणासंबंधीच्या लेखाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे व पुढच्या सैद्धान्तिक प्रगतीस त्यातील विचार अत्यंत उपयोगी आहेत असे म्हटले होते. कॅलेस्की यांचे उपरोक्त लेखातील विवेचन पूर्ण परिव्ययाधारे अधिकिमती ठरतात या सिद्धान्तावर आधारलेले आहे. परंतु त्या सिद्धान्ताचा अर्थ कॅलेस्की यांनी परंपरागत सिद्धान्तनाप्रमाणे एकाधिकाराची वा मक्त्याची इयत्ता असा केला होता. (त्यामुळे बरीच भरड आणि वांझ चर्चा त्यासंबंधी झाली) केन्स यांनी त्यासंबंधी लिहिताना अपूर्ण आर्थिक स्पर्धेच्या परिस्थितीत उत्पन्न विभजनाची अन्वेषणा करण्यासाठी कॅलेस्की यांनी अगदी नवीन तंत्राचा अवलंब केला आहे व पुढील प्रगतीसाठी त्याचा उपयोग होईल असे म्हटले आहे.

कॅलेस्की यांचे विवेचन परंपरागत सीमान्तवादी उत्पन्न विभजनाच्या सिद्धान्तापासून पूर्णपणे निराळे आहे हे केन्स यांच्या नीट ध्यानात आले होते की नाही याबद्दल शंका वाटते. पण केन्स यांनी ते प्रतिसाद स्वीकारले होते असे वाटत नाही.

निष्कर्ष

सीमान्त या संज्ञेला अनेक अर्थ आहेत. त्यापैकी काही स्वीकार्य तर काही अस्वीकार्य आहेत. साधारणपणे ज्यावेळी त्या संज्ञेने विकलज दर्शविला जातो त्यावेळी ती योग्य अर्थाने वापरली जाते. हा अर्थ विकलज गणिताच्या निकषाने महत्तमन व लघुतमन ठरवावयाचे या गेले शंभर वर्षे अर्थशास्त्राला गणिती कल्पना लागू करण्याच्या चाललेल्या प्रयत्नांचे फळ आहे. मी ज्या परंपरागत सिद्धान्तनाची चर्चा केली ते सिद्धान्तन, स्थितिशील परिस्थितीसंबंधी आहे व त्यामुळेच त्याच्या अन्वेषणाची भेदक शक्ती फार कमी आहे. परंतु अर्थशास्त्रीय प्रश्नांचा विचार करताना हीच रीत अनिवार्य आहे असे नाही. सीमान्त पद्धतीतून निघणारे विवेचन जर तर्कशुद्ध असेल व ज्या प्रत्यक्षातील प्रश्नाचा विचार करावयाचा आहे त्याच्या वास्तव चित्राशी प्रतारणा करणारे नसेल तर त्याला अर्थशास्त्रात स्थान असावयास हरकत नाही. सीमान्तावरची टीका ही त्यात अनुस्यूत असलेल्या अन्वेषणाच्या रीतीबद्दल नाही तर त्या अन्वेषणाच्या अर्थशास्त्राच्या संदर्भातील गुणवत्तेबद्दल आहे

याचा अर्थ, सीमान्तवादी आणि त्यांचे टीकाकार यातील मतभेद फक्त आकारिक वा औपचारिक बाबतीतच आहेत असा नाही. व्यवसायसंस्थासंबंधीच्या सिद्धान्तनाबद्दलच्या काही मूलभूत गोष्टी व त्यांच्याशी संबंधित असलेल्या किमतसिद्धान्त व भांडवलसिद्धान्त याबद्दल मी येथे लिहिले आहे. अलीकडे सीमान्त विचारसरणीच्या हान आदी अर्थशास्त्रज्ञांनी असा दावा केला आहे की, वावदूक पूर्वग्रह बाजूस ठेवले तर आम्ही व आमचे टीकाकार यांच्यातील मतभेद फार थोडे व नगण्य आहेत. परंतु हेच अर्थशास्त्रज्ञ समुच्चयित उत्पादनफळावर (अनुवर्तावर) घेण्यात येणारे आक्षेप मान्य करतात. हान यांनीच म्हटले आहे : "समुच्चयित उत्पादन अनुवर्त हे ज्ञापक ज्या अर्थव्यवस्थेत एकच अर्थवस्तू आहे त्याबाबतच तर्कशुद्ध ठरते, इतर कोणत्याही प्रकारच्या अर्थव्यवस्थेत नाही, हे स्राफाबाद्यांचे मत बरोबर आहे".[13] याचाच अर्थ, त्यांना सीमान्त उत्पादकतेवर आधारलेला उत्पन्न विभजनाचा सिद्धान्त अग्राह्य आहे, कारण त्याला कोणताच पर्याय त्यांनी सुचविलेला नाही. असे जर असेल तर सीमान्त सिद्धा–

न्तनाच्या आधारशीलापैकी फार महत्त्वाची व मोठीच शिळा निखळून पडली आहे. त्या सिद्धान्तनातील काही सिद्धान्त व प्रतिमाने अजून उभी आहेत, हे त्या सिद्धान्तनाच्या सर्वांगीण ग्रहणक्षमतेच्यादृष्टीने फारसे महत्त्वाचे नाही.

माझे म्हणणे थोडक्यात असे आहे की, या प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती टाकून आपण चिकित्सकपणे या सिद्धान्तनातील दुबळ्या जागा वजा केल्या पाहिजेत. उतरत्या फळाच्या सिद्धान्ताच्या नवअभिजात स्वरूपाला कवटाळून राहण्यासाठी अर्थशास्त्रज्ञांनी काय युक्त्या योजल्या आहेत हे आपण पाहिले. भांडवलाच्याबद्दलची अशीच परिस्थिती आहे, हेही आपण पाहिले आहे. अनेक वर्षांपूर्वी माझ्या लक्षात आले की, शुम्पीटरसारखा साक्षेपी व सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आपल्या 'थिअरी ऑफ इकनॉमिक डेव्हलपमेंट' (1934) या पुस्तकात भांडवल म्हणजे क्रयशक्ती हा अर्थव्यवहारकांचा दृष्टिकोन जोरदार युक्तिवादाने उचलून धरतात, पण आपल्या 'बिझनेस सायकल्स' (1942) या पुस्तकात भांडवलासंबंधीचे परंपरागत सिद्धान्तन खरे आहे असे मानून विवेचन करतात. मला वाटते की, परंपरागत सिद्धान्तनातले हे विरोधाभास आता काढून टाकून नव्या पायावर सिद्धान्तनाची उभारणी करण्याची वेळ आली आहे.

## संदर्भ टीपा


1 लॅबिनी, पी. सायलॉस, क्वार्टर्ली रिव्ह्यू, बॅंका नॅशनेल देल लव्हॅरो, रोम, नं. 166, सप्टेंबर 1988.

2 स्राफा, पी., "लॉज ऑफ रिटर्नस् अंडर कॉम्पिटिटिव्ह कंडिशन्स," इकनॉमिक जर्नल, डिसेंबर 1926, पृ. 543.

3 कॅलेस्की, "डिटरमिनन्टस् ऑफ दि डिस्ट्रिब्युशन ऑफ नॅशनल इन्कम," इकनॉमेट्रिका, ऑक्टोबर 1938.

4 डनलॉप, जे. जी., "दि मूव्हमेंट ऑफ रिअल अॅन्ड मनी वेज रेट्स," इकनॉमिक जर्नल, सप्टेंबर 1938.

5 केन्स, जे. एम., "रिलेटिव्ह मूव्हमेंट्स ऑफ रिअल वेजिस अॅन्ड आउटपुट," इकनॉमिक जर्नल, मार्च 1939.

6 हॉल आणि हिच, "प्राइस थिअरी अॅन्ड इकनॉमिक बिहेव्हिअर," ऑक्सफर्ड इकनॉमिक पेपर्स, मे 1939.

7 मोमिग्लियानो, एफ., इकनॉमिआ इंडस्ट्रिएल ए टॅरिस डेल, इंप्रेसा, बलोना, 1975.

8 उदाहरणार्थ, फिशर, एफ. एम., "दि एक्झिस्टन्स ऑफ अॅग्रिगेट प्रॉडक्शन फंक्शन," इकनॉमिका, ऑक्टोबर 1969.

9 डनलॉप, जे. जी., पूर्वोक्त.

10 टारशीस, एल., "मूव्हमेंट ऑफ रिअल अॅन्ड मनी वेज रेट्स," इकनॉमिक जर्नल, मार्च 1939.

11 चुटली, बी., "प्रिन्सिपेशिओ डेल कॉस्टो पायनोलेरिया केन्शियाना," रिव्हिस्टा डाय पोलिटिका इकनॉमिका, जानेवारी 1964.

12 केन्स, पूर्वोक्त.

13 हान, एफ., "दि न्यू रिकार्डियन्स," केंब्रिज जर्नल ऑफ इकनॉमिक्स, नं. 6, 1982.


□ □


## मराठी अर्थशास्त्र परिषद – स्थायी निधी

### देणगीदारांची नावे

77 प्रा. श्रीमती कुमुद पोरे, पुणे रु. 150

व्यं. सु. पाटणकर
कार्यवाह–खजिनदार

# उत्पादनक्षमतेची संकल्पना*

लक्ष्मण बुरंगे**

अर्थशास्त्रीय विश्लेषणात उत्पादनक्षमतेच्या संकल्पनेला (कन्सेप्ट ऑफ कपॅसिटी) एक विशिष्ट असे महत्त्वाचे स्थान आहे. कोणत्याही आर्थिक/व्यवसायिक संघटनेच्या कार्यक्षमतेचे मोजमाप, तिने उपलब्ध साधन-सामग्रीचा उपयोग करुन आपल्या उत्पादनक्षमतेचा किती वापर केला यावरून करता येते. म्हणजेच उत्पादनक्षमतेच्या संकल्पनेत साधनसामग्रीच्या पूर्ण व कार्यक्षम वापराची संकल्पना ही समाविष्ट होत असल्यामुळे केवळ सैद्धान्तिक दृष्टीनेच नव्हे तर उपयोजित दृष्टीनेदेखील (विशेषत: भारतासारख्या अर्थव्यवस्थेच्या अविकसित-पणाचे विश्लेषण करताना) या संकल्पनेचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजाराच्यासंदर्भात चेंबरलिन यांनी जी वैचारिक भर घातली (1933) त्यामुळे क्षमता (व अतिरिक्त क्षमता) या संकल्पनेने अर्थशास्त्रज्ञांचे लक्ष वेधले. क्षमतेच्या संकल्पनेचा विविध बाजूनी विचार करून अनेक विचारवंतांनी या संकल्पनेचा विकास केलेला आढळतो. क्षमता व क्षमतेचा वापर यांच्या मोजमापाचे महत्त्व व्यष्टीय अर्थशास्त्राच्या दृष्टीनेच नव्हे तर समष्टी अर्थशास्त्राच्या दृष्टीनेसुद्धा आहे. आर्थिक व्यवहारांच्या नियोजनामध्ये व व्यापार-चक्र सिद्धान्तांच्या अभ्यासात क्षमता व क्षमता वापराच्या संकल्पनेला खूप महत्त्वाचे स्थान असूनदेखील 'उत्पादन क्षमता' या संकल्पनेची नेमकी व अचूक व्याख्या बरीच हुलकावणी देणारी ठरली आहे. या पार्श्वभूमीवर 'उत्पादन क्षमता' या संकल्पनेचा विचार विविध विचारवंतांनी कोणकोणत्या दृष्टिकोनातून केला आहे याचा या लेखात आढावा घेतला आहे. त्याच-बरोबर क्षमतेची व्यष्टीय व समष्टी संकल्पना आणि क्षमता या संकल्पनेची व्याख्या करताना स्वीकारलेली विविध गृहितके यांचाही विचार केला आहे.

## व्यष्टीय दृष्टिकोनातून क्षमतेची संकल्पना

या दृष्टिकोनात क्षमतेचा विचार संयंत्र, व्यव-

* "कन्सेप्ट अ‍ॅन्ड मेझरमेंट ऑफ कपॅसिटी : ए रिव्ह्यू" या विषयावर पी. वेंकटरामय्या, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली एम. फिल. पदवीसाठी पुणे विद्यापीठास सादर केलेल्या लघुप्रबंधावर आधारित.

** अधिव्याख्याता, भिकुसा यमासा क्षत्रिय वाणिज्य महाविद्यालय, नाशिक.

व्यवसायसंस्था किंवा उद्योगाच्या पातळीवर केला जातो. व्यष्टीय पातळीवर क्षमतेची व्याख्या दोन दृष्टिकोनां-मधून केली जाते : (अ) क्षमतेची तांत्रिक अथवा अभियांत्रिकी संकल्पना; (ब) क्षमतेची अर्थशास्त्रीय अथवा उत्पादन परिव्ययावर आधारित संकल्पना. हे दोन्ही दृष्टिकोन क्षमतेची व्याख्या करताना वापरण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या चलांच्या संदर्भात एकमेकांपासून भिन्न आहेत.

## (अ) तांत्रिक अथवा अभियांत्रिकी संकल्पना

उत्पादन फलनाच्या विचारावर आधारित अशा या संकल्पनेत क्षमतेची व्याख्या करताना खालील गृहितके मानण्यात येतात.

(1) उपलब्ध संयंत्राच्या सोयी बदलत नाहीत.

(2) बदलत्या निविष्टींचा (श्रम व भांडवल) पुरवठा अबाधित असतो.

(3) उत्पादनाचे संघटन प्रसामान्य असते. [हिकमन, बर्ट. जी., 1957].

श्रम आणि भांडवल ह्या दोनच निविष्टी उत्पादनप्रक्रियेत वापरल्या जात आहेत असे मानल्यास खालील फलनसंबंध मांडता येईल.

$$X = f(n.k)$$

X = उत्पादन

n = श्रम घटक

k = भांडवल घटक

आता प्रत्यक्षात वापरात येणारे श्रमघटक nf व भांडवल घटक d असे मानल्यास, प्रत्यक्षात होणारे उत्पादन हे खालील फलनसंबंधाने दाखविता येईल.

$$X = f(nf, d)$$

म्हणजेच, मानवी साधनसामग्री आणि भांडवली साधने यांचा पूर्ण वापर केल्यास जे परिणामस्वरूप उत्पादन होईल त्यास त्या संयंत्राची पूर्ण क्षमता मानता येईल. उत्पादनक्षमतेच्या या तांत्रिक संकल्पनेत निविष्टी–उद्‌विष्टी संबंधाचा विचार केला जातो; मात्र उत्पादन परिव्यय विचारात घेतले जात नाहीत. क्षमतेची व्याख्या करण्याच्या अभियांत्रिकी दृष्टि–कोनातही दोन विचारधारा आहेत.

### (अ.1) विशुद्ध अभियांत्रिकी दृष्टिकोन

विशुद्ध अभियांत्रिकी दृष्टिकोनाप्रमाणे कोणत्याही संयंत्राची / व्यवसाय संस्थेची क्षमता निव्वळ तांत्रिक दृष्टिकोनातून निश्चित केली जाते. व्यवसाय संस्थेतील स्थापित यंत्रे व संयंत्रे यांची सुप्त तांत्रिक क्षमता, विविध यंत्रांची उत्पादन गती, मंदगतीने काम कर–णाऱ्या यंत्रांची किमान मर्यादा आणि दुरुस्ती व इतर नैमित्तिक कारणांसाठी होणारा उत्पादन प्रक्रियेचा खोळंबा लक्षात घेऊन त्या यंत्र / संयंत्राची जी कमाल उत्पादनमर्यादा असते ती त्या व्यवसाय संस्थेची 'क्षमता' होय.

### (अ.2) सुधारित अभियांत्रिकी दृष्टिकोन

सुधारित अभियांत्रिकी दृष्टिकोनाप्रमाणे निवि–ष्टींच्या तांत्रिक बाबींबरोबरच बिगरतांत्रिक घटकां–चाही विचार केला जातो. बिगरतांत्रिक घटकांमध्ये श्रमशक्तीची संख्या व गुणवत्ता, कच्च्या मालाची गुणवत्ता, उत्पादनसंघटनेची गुणवत्ता इत्यादी घटकांचा समावेश होतो

क्षमतेच्या विशुद्ध अभियांत्रिकी संकल्पनेवर आधारित परंतु फक्त तांत्रिक मर्यादांचा विचार न करता, उत्पादनप्रक्रियेत सहभागी होणाऱ्या इतर निविष्टींच्या गुणवत्तेच्या आधारावर विचार करून 'क्षमता' निश्चित करण्याच्या विचाराला सुधारित अभियांत्रिकी दृष्टिकोन म्हटले जाते.

वरील दोन दृष्टिकोनांमधील महत्त्वाचा भेद म्हणजे सुधारित दृष्टिकोनामध्ये व्यवस्थापकीय कौशल्य व क्षमता, उत्पादनाचा कार्यकाल, श्रमिकांचे कौशल्य व क्षमता इत्यादी घटकांचा प्रभाव विचारात घेतला जातो. या सुधारित अभियांत्रिकी दृष्टिकोनातून क्षम–तेच्या खालील संकल्पना आपल्या समोर येतात.

#### (अ.2.1) स्थापित क्षमता (इन्स्टॉल्ड कपॅसिटी)

क्षमतेच्या या संकल्पनेत यंत्र/संयंत्राची रचना, कामगारांच्या दैनंदिन कामाच्या पाळ्या या बाबी विचारात घेऊन स्थापित क्षमता निश्चित केली जाते. सर्वसाधारणपणे उत्पादनकाल हा कामाची एकच पाळी

असणाऱ्या उद्योगात 300 दिवस, तर प्रक्रियासातत्य असणाऱ्या उद्योगात ( 3 पाळ्या ) 300 ते 365 दिवस मोजला जातो. [ एनसीएइआर, 1966 ]. सर्व उत्पादकसाधनांची पूर्ण उपलब्धता आहे असे गृहीत धरून " उद्योगाशी सुसंगत अशा कामाच्या पाळ्या व उत्पादन कार्यकाल लक्षात घेऊन संयंत्राकडून कमाल उत्पादन मिळण्याची जी पातळी आहे त्यास संयंत्राची स्थापित क्षमता म्हणता येईल. " [ श्रीनिवासमूर्ती, ए. पी., 1979 ].

### (अ.2.2) निर्धारितक्षम (रेटेड कपॅसिटी)

देशातील प्रचलित परिस्थितीत कोणतेही संयंत्र व्यवसाय संस्था जेवढे महत्तम उत्पादन करू शकते त्या कमाल उत्पादनपातळीला निर्धारित क्षमता म्हणतात. [ गुप्ता, मीना आणि थावराज, एम. जे के., 1975 ]. निर्धारित क्षमता ही स्थापित क्षमतेइतकी असू शकते. परंतु हवामानातील बदल, निविष्टींच्या पुरवठ्यातील बदल इत्यादीमुळे ती स्थापित क्षमतेपेक्षा कमीदेखील असू शकते.

### (अ.2.3) साध्य क्षमता (अटेनेबल कपॅसिटी)

उत्पादनप्रक्रियेत होत असलेल्या सततच्या वापरामुळे संयंत्राची झीज होत असते. त्यामुळे संयंत्राच्या स्थापनेनंतर काही काळाने, या झीजेमुळे संयंत्राची क्षमता कमी होत जाते. संयंत्राचा जीवनकाल व सततच्या वापरामुळे होणारी संयंत्राची झीज लक्षात घेऊन प्रत्यक्षात संयंत्रापासून मिळणारी कमाल उत्पादनपातळी म्हणजेच त्या संयंत्राची साध्य क्षमता होय.

### (अ 2.4) उपलब्ध क्षमता (अॅव्हेलेबल कपॅसिटी)

बऱ्याच वेळा बदलत्या परिस्थितीत निविष्टींच्या पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे संयंत्राची / व्यवसाय संस्थेची साध्य क्षमतादेखील प्रत्यक्षात उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत घसारा व इतर घटकांचा ( निविष्टींच्या पुरवठ्यातील अडथळे, उदाहरणार्थ वीजपुरवठा, कच्चा माल इत्यादी ) विचार करून संयंत्राकडून / व्यवसाय संस्थेकडून केले जाणारे कमाल उत्पादन म्हणजेच त्या संयंत्राची / व्यवसाय संस्थेची उपलब्ध क्षमता होय. कालांतराने निविष्टींच्या पुरवठ्यातील हे अडथळे दूर झाल्यास उपलब्ध क्षमता वाढून संयंत्राची साध्य क्षमता प्राप्त होऊ शकते.

### (अ.2.5) अनुज्ञप्ती मिळालेली क्षमता (लायसेन्स्ड कपॅसिटी)

शासनाच्या सर्वंकष आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून, विविध वस्तूंच्या उत्पादनाचे नियंत्रण करण्याच्यादृष्टीने शासनयंत्रणेकडून परवाना पद्धतीचा अवलंब केला जातो. " उद्योगांना परवाना देणाऱ्या अधिकारी यंत्रणेकडून जी उत्पादनमर्यादा व्यवसायसंस्थेला घालून दिली जाते ती त्या संस्थेची अनुज्ञप्ती मिळालेली क्षमता होय. ही क्षमता संयंत्राची तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तपासून निश्चित केली जाते. " [ गुप्ता, मीना व थावराज, एम. जे. के., 1975 ].

### (अ.2.6) संकल्पित क्षमता ( डिझाइन्ड कपॅसिटी )


संयंत्र प्रस्थापित करताना, त्या संयंत्रात वापरल्या जाणाऱ्या तंत्रविज्ञानाची पातळी लक्षात घेऊन, त्या उत्पादनतंत्राशी सुसंगत अशा (त्या संयंत्राच्या) कमाल उत्पादनक्षमतेला संयंत्राची संकल्पित क्षमता समजली जाते. [ गुप्ता, मीना व थावराज, एम. जे के., 1975 ]. कोणत्याही संयंत्राची संकल्पित क्षमता ही त्याच्या स्थापित क्षमतेपेक्षा जास्त असू शकते. कारण संकल्पित क्षमता निश्चित करताना फक्त संयंत्रात वापरावयाच्या तंत्रविज्ञानाचाच विचार केला जातो तर स्थापित क्षमतेची व्याख्या करताना त्या विशिष्ट उद्योगात प्रचलित असणारा उत्पादन कार्यकाल ( वर्किंग पिरियड ) विचारात घेतला जातो.

### (ब) क्षमता : उत्पादन परिव्ययावर आधारित किंवा अर्थशास्त्रीय व्याख्या


क्षमतेची व्याख्या करताना या दृष्टिकोनात तांत्रिक घटकांपेक्षा उत्पादन परिव्ययाला जास्त महत्त्व दिले जाते. या दृष्टिकोनानुसार " पूर्ण स्पर्धेतील दीर्घकालीन समतोलाशी सुसंगत उत्पादनपातळीला त्या संयंत्राची / व्यवसाय संस्थेची क्षमता म्हटले जाते." [ क्लाइन, एल.आर., 1960] व्यवसाय संस्थेची क्षमता

सरासरी उत्पादन परिव्ययाच्या किमान बिंदूला प्राप्त होते.

आकृती 1 मध्ये दाखविल्याप्रमाणे या उद्योगसंस्थेची क्षमता 'अन' होईल. या उत्पादनपातळीला (क्षमता) अतिरिक्त नफा शून्य होतो आणि उत्पादित वस्तूची किमत सरासरी परिव्यय, सीमान्त परिव्यय, सीमान्त प्राप्ती हे सर्व समान असतात.




आकृती 1




आकृती 2

याउलट, आकृती 2 मध्ये दाखविल्याप्रमाणे अपूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत व्यवसायसंस्थेची उत्पादनक्षमता '$अन_1$' असेल व क्षमतेची ही पातळी पूर्ण स्पर्धेच्या व्यवसायातील 'पूर्ण' क्षमतेपेक्षा ('$अन_2$') कमी असेल.

सर्वसाधारणपणे रेमंड टी. बाउमन आणि ए. फिलिप्स (1955) यांच्या विचारांचा संदर्भ घेतल्यास, "व्यवसाय संस्थेची क्षमता म्हणजे अशी उत्पादनपातळी की, ज्यावेळी अल्पकालीन व दीर्घकालीन सरासरी परिव्यय किमान पातळीला असतो, सीमान्त प्राप्ती व व सीमान्त परिव्यय समान असतात, दीर्घकालीन सरासरी परिव्यय वक्र अल्पकालीन सरासरी परिव्यय वक्रास स्पर्श करतो आणि अल्पकालीन सीमान्त परिव्यय अनंत होतो."

क्षमतेच्या अर्थशास्त्रीय दृष्टिकोनात खालील विचारधारा आढळतात.

(1) क्लाइन यांचा दृष्टिकोन
(2) हिकमन यांचा दृष्टिकोन
(3) सीमान्त परिव्यय दृष्टिकोन

**(ब.1) क्लाइन यांचा दृष्टिकोन**

एल. आर. क्लाइन [1960] यांच्या विचाराप्रमाणे क्षमतेच्या सकल्पनेचे विश्लेषण उत्पादन परिव्यय फलनाऐवजी उत्पादनफलनाचा वापर करूनदेखील करता येते. यासाठी आपण पुढील गृहीते मानू : (1) तंत्रविज्ञान स्थिर आहे, म्हणजेच उत्पादनफलन स्थिर आहे; (2) उत्पादनाचा सरासरी परिव्यय किमान पातळीवर आहे आणि (3) अतिरिक्त नफा शून्य आहे.

आता श्रम आणि भांडवल हे दोनच घटक उत्पादनप्रक्रियेत वापरात येतात हे मानल्यास,

$$X = f(n, d) \quad (1)$$
$$fn/fd = w/q \quad (2)$$
$$px = wn + qd \quad (3)$$

| | | | |
|---|---|---|---|
| X = | निव्वळ उत्पादन | n = | श्रमघटक |
| p = | किमत | d = | भांडवल घटक |
| w = | मजूरीचा दर | fn = | श्रमाचे सीमान्त उत्पादन |
| q = | भांडवलाची किमत | fd = | भांडवलाचे सीमान्त उत्पादन |

वरील तीन समीकरणांमध्ये पाच चलांचा उपयोग केलेला आहे. ( x, n, d, w/q आणि p/q). वरील

समीकरणात निविष्टींच्या क्षमतेची मूल्ये घातल्यास (श्रम आणि भांडवल) व्यवसायसंस्थेची क्षमता मोजता येईल. या व्याख्येमधून स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत नफ्याचे प्रमाण शून्य असताना उत्पादनक्षमता प्रचलित किंमत–यंत्रणेवर कशी अवलंबून असते हे दिसून येते. जरी ही स्थिती सरासरी परिव्ययाच्यादृष्टीने स्पर्धात्मक बाजारातील समतोलासमान वाटत असली तरी ती बाजार–यंत्रणेचे क्षमता निर्धारित करण्यातील कार्य स्पष्ट करते.

## (ब.2) हिकमन दृष्टिकोन

बर्ट हिकमन [1963] यांच्या दृष्टिकोनातून विशिष्ट आकारमानाच्या संयंत्रापासून, प्रचलित उत्पादनसंघटन व निविष्टींच्या किंमती गृहीत धरल्यास, किमान सरासरी परिव्ययाशी सुसंगत असणारी उत्पादनपातळी म्हणजे त्या संयंत्राची क्षमता होय. याचाच अर्थ, विशिष्ट वेळी व्यवसाय संस्थेची उत्पादनक्षमता त्या संस्थेचा भांडवलाचा साठा, उपलब्ध उत्पादन तंत्रविज्ञान आणि निविष्टींच्या तौलनिक किंमती यावर अवलंबून राहील.

कोणतीही एक विशिष्ट उत्पादनपातळी गाठण्यासाठी भांडवलाचा अपेक्षित साठा आवश्यक असतो. हे आपल्याला खालील समीकरणावरून दाखविता येईल.

$$K^{*} = a_1 + a_2\overline{Y}_t + a_3\overline{P}_t + a_4T \qquad (1)$$

$\overline{Y}$ = सर्वसाधारण उत्पादन पातळी

$K^{*}$ = भांडवलाचा अपेक्षित साठा

$\overline{P}$ = तौलनिक किंमती [ या ठिकाणी दोन प्रकाराने तौलनिक किंमतींचा विचार करता येईल. (1) भांडवलाच्या किंमतीच्या तुलनेत उत्पादनाची किंमत किंवा (2) भांडवलाच्या किंमतीच्या तुलनेत श्रमाची किंमत म्हणजेच मजुरी ].

T = उत्पादनतंत्र पातळी

t = कालावधी

वरील समीकरणाच्या साहाय्याने उत्पादनक्षमता खालीलप्रमाणे ठरविता येईल.

$$Y_t^c = \frac{K^{*}_{t-1} - a_1 - a_3\overline{P}_t - a_4T}{a_2} \qquad (2)$$

याठिकाणी $Y_t^c$ = उत्पादनक्षमता

प्रचलित उत्पादनतंत्र व निविष्टींच्या किंमती दिल्या असता, श्रमघटकांचा योग्य वापर करून [ श्रमाचा भांडवलाशी किमान परिव्यय संयोग (लीस्ट कॉस्ट कॉम्बिनेशन) साधून ] उपलब्ध भांडवल साठ्याचा ($K_{t-1}$) पूर्ण वापर केल्यास मिळणारी उत्पादनपातळी म्हणजे, व्यवसाय संस्थेची [ उत्पादन ] क्षमता ( $Y_t^c$ ) होय.

थोडक्यात, या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे व्यवसाय संस्थेची (उत्पादन) क्षमता ही तिच्या उपलब्ध भांडवलसाठ्याशी सुसंगत असते. त्याचबरोबर ती प्रचलित तंत्रविज्ञानपातळी व निविष्टींच्या तौलनिक किंमतीवरदेखील अवलंबून असते.

समीकरण (2) मधील $a_4$ हे मूल्य सर्वसाधारणपणे ऋण स्वरूपाचे असते. त्यामुळे ज्यावेळी उत्पादनतंत्र विकास पावते तेव्हा विशिष्ट क्षमता गाठण्यास लागणाऱ्या भांडवलाच्या साठ्याची आवश्यकता कमी होत जाते. वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास, दिलेल्या भांडवलसाठ्यातून समीकरण (2) प्रमाणे मिळणारी क्षमता दीर्घकाळात वाढत जाईल. त्याचप्रमाणे श्रम व भांडवल या निविष्टींच्या तौलनिक किंमतींमध्ये बदल झाल्यास, या निविष्टींच्या पर्याप्त संयोगामध्ये बदल होऊन दिलेल्या भांडवलसाठ्यातून मिळणाऱ्या उत्पादनक्षमतेतदेखील बदल होईल.

या दृष्टिकोनात वाढत्या उत्पादनप्रमाणाच्या फायद्यातोटयांचाही विचार केलेला आहे. उत्पादन वाढत असताना जर वाढत्या प्रमाणाचे फायदे किंवा तोटेही नसतील तर $a_2$ चे मूल्य 1 राहील. याचा अर्थ, जर श्रमघटक व भांडवलाचा साठा दुप्पट केला तर उत्पादनक्षमता दुप्पट होईल. याउलट, जर $a_2 < 1$ असेल तर निविष्टींमधील वाढीच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात क्षमता वाढेल आणि जर $a_2 > 1$ असेल तर घटते प्रमाणफल मिळेल.

## (ब.3) सीमान्त परिव्यय दृष्टिकोन

या दृष्टिकोनाप्रमाणे 'क्षमता' म्हणजे अशी उत्पादनपातळी की, ज्या पातळीला त्या उत्पादनाचा सीमान्त परिव्यय हा अल्पकालीन कमीत कमी सरासरी

परिव्ययापेक्षा 'क्ष' टक्क्यांनी जास्त असेल. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, सर्वात कार्यक्षम पातळीच्या सरासरी परिव्ययापेक्षा सीमान्त परिव्यय 'क्ष' टक्क्यांनी जास्त देणारी उत्पादनपातळी म्हणजे त्या व्यवसाय संस्थेची क्षमता होय. या ठिकाणी समष्टी पातळीवरून सर्व व्यवसाय संस्थांच्या 'क्ष' चे प्रमाण सारखेच असेल. 'क्ष'चे हे प्रमाण निरनिराळ्या चलांवर अवलंबून असते; उदाहरणार्थ, वस्तूची किंमत, गुंतवणूक वगैरे. त्यामुळे निरनिराळ्या चलांच्या संदर्भात 'क्ष'चे प्रमाणदेखील निरनिराळे असेल. म्हणून व्यवसाय संस्थेची उत्पादन–क्षमता ठरविताना निश्चित केलेले 'क्ष'चे प्रमाण, क्षमतेचा वापर आणि उपरोक्त चलांच्या प्रत्यक्षातील संबंधांवर अवलंबून असेल. या दृष्टिकोनाचा फायदा असा की, क्षमतेचा वापर व गुंतवणूक, किंमती इत्यादी चलांच्या परस्पर संबंधामधील भविष्यातील अपेक्षांचा विचार केला जाऊ शकतो. असे असले तरी, क्षमतेची सीमान्त परिव्ययावर आधारित असलेली ही व्याख्या प्रत्यक्षात अडचणीची ठरते. मुख्यतः उत्पादनाचा सर्वात कार्यक्षम सरासरी परिव्यय ठरविणे अवघड जाते. दुसरे म्हणजे, ही संकल्पनाच वास्तवात वापरणे सहजशक्य नाही.

## समष्टी दृष्टिकोनातून उत्पादनक्षमतेची संकल्पना

आधीच्या विश्लेषणात चर्चिलेल्या क्षमतेच्या सर्व व्याख्या एखादे विशिष्ट संयंत्र, व्यवसायसंस्था किंवा विशिष्ट उद्योगाच्या संदर्भात होत्या. परंतु अर्थव्यवस्थेच्या एखाद्या क्षेत्राची क्षमता मोजावयाची झाल्यास ती समष्टी दृष्टिकोनातून मोजावी लागते.

### (अ) उत्पादनक्षेत्राची क्षमता

अर्थव्यवस्थेच्या कोणत्याही क्षेत्राची उत्पादन–क्षमता खालीलप्रमाणे विशद करता येईल. एखाद्या विशिष्ट क्षेत्रात उपलब्ध असलेल्या (वास्तव) भांडवलाचा समूह (कॉंग्लोमरेट) वापरात येत असल्यास त्या भांडवलाच्या साहाय्याने, कोणतीही नवीन गुंतवणूक न करता, त्या क्षेत्राची उत्पादनपातळी त्यामधील उद्योगांना वाढविता येऊ शकते. परंतु शेवटी एक अशी उत्पादनपातळी त्या क्षेत्रातील उद्योगांकडून गाठली जाते की, त्यानंतर उत्पादन वाढविण्यासाठी त्या उद्योगांना भांडवलसाठ्यात भर घालावी लागते. म्हणजेच नवीन गुंतवणुकीला प्रेरणा मिळते. ही नवीन गुंतवणूक ज्या उत्पादनपातळीला आवश्यक होते त्या उत्पादन–पातळीला त्या क्षेत्राची 'क्षमता' म्हणता येईल. [ ए. फिलिप्स व डी. क्रिमर, 1961 ]. वरील व्याख्येप्रमाणे कोणत्याही क्षेत्राची क्षमता म्हणजे, उपलब्ध भांडवली साठ्याच्या साहाय्याने गाठता येण्याजोगी संपूर्ण क्षेत्राची कमाल उत्पादनपातळी होय.

काही विशिष्ट परिस्थितीत, किमान 'सरासरी परिव्यय देणारी उत्पादनपातळी ( क्षमता–अर्थशास्त्रीय दृष्टिकोन ) आणि त्या क्षेत्रातील सर्व उद्योगांच्या उपलब्ध भांडवली साठ्यातून गाठण्याजोगी कमाल उत्पादन पातळी ( क्षमता–तांत्रिक दृष्टिकोन ) एकच असण्याची शक्यता असते. थोडक्यात, या व्याख्येत क्षमता या संकल्पनेच्या तांत्रिक आणि अर्थशास्त्रीय संकल्पनांचे मिश्रण आढळते.

### (आ) अर्थव्यवस्थेची क्षमता

क्षमतेची ही समष्टी संकल्पना एकूण गुंतवणूक, गुणक व प्रवेगतत्त्व आणि व्यापारचक्राच्या विश्लेषणात फारच मोलाची ठरते

"कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये, लोकांच्या आवडी–निवडी आणि उत्पादनतंत्र स्थिर असता, अर्थव्यवस्थेतील सर्व उत्पादक साधने पूर्ण क्षमतेने व परिपूर्ण वापरली गेल्यास मिळणाऱ्या एकूण ( प्रति वर्ष ) उत्पादनास अर्थव्यवस्थेची क्षमता असे संबोधता येईल. [ गॉर्डन सी. विन्स्टन, 1977 ]. अर्थव्यवस्थेतील सर्व व्यष्टी उत्पादन एककांच्या (व्यवसाय संस्थांच्या) उत्पादनक्षमतेचे एकत्रीकरण म्हणजेच अर्थव्यवस्थेची 'क्षमता' होय. म्हणजेच, अर्थव्यवस्थेतील उत्पादन–पातळी वाढवावयाची झाल्यास ज्या उद्योगात / क्षेत्रात संपूर्ण ( 100 टक्के ) क्षमता वापरली जात आहे त्या उद्योग / क्षेत्रामध्ये नवीन गुंतवणूक झाल्याशिवाय एकूण उत्पादनपातळी वाढविता येऊ शकणार नाही. [ एल. आर. क्लाइन, 1960 ].

## संकल्पनेच्या दोन बाजू

या आधीच्या विवेचनात आपण क्षमतेची व्याख्या व्यष्टी आणि समष्टी या दोन्ही दृष्टिकोनांतून कशी केली जाते याचा विचार केला. वरील दोन्ही दृष्टिकोनांनुसार क्षमता या संकल्पनेच्या दोन मुख्य बाजू मांडता येतील.

(1) क्षमतेची तांत्रिक किंवा वास्तव बाजू. यामध्ये क्षमता वास्तव उत्पादनाच्या ( फिजिकल आउटपुट ) स्वरूपात मोजली जाते.

(2) दुसरी बाजू म्हणजे काल संदर्भ ( टाइम रेफरन्स ). काळाच्या संदर्भाशिवाय क्षमतेची व्याख्या व मोजणीही करता येणार नाही. यादृष्टीने कालसंदर्भ ज्या दोन अर्थाने विचारात घेतले जातात ते पुढील–प्रमाणे होत.

(अ) कोणत्याही व्यवसाय संस्थेची / उद्योगाची / अर्थव्यवस्थेची क्षमता ज्या कालावधीचा विचार केला गेलेला आहे त्याच्या सुरुवातीला किंवा कालावधीच्या शेवटी अथवा सरासरी कालावधीच्या संदर्भात मोजली जाते. उदाहरणार्थ, भारतीय उद्योगक्षेत्राची 1951 ते 1981 या कालावधीतील क्षमता विशद करताना 1951 ची क्षमता, 1981 ची क्षमता किंवा 1951 ते 1981 या कालावधीतील सरासरी क्षमता (प्रती वर्ष) विचारात घेतली जाते. अशा प्रकारे कोणत्याही व्यवसाय संस्थेची / उद्योगाची / अर्थव्यवस्थेची क्षमता एखाद्या दीर्घ कालावधीच्या ओघात मोजणे आवश्यक ठरते. कारण, या संपूर्ण कालावधीत यंत्र / सयंत्राची झीज होत असल्यामुळे आधीच्या वर्षी जी क्षमता असते तेवढीच पुढच्या वर्षी मिळू शकत नाही. याकरिता क्षमतेच्या संकल्पनेत काल संदर्भ महत्त्वाचा ठरतो.

(आ) क्षमतेच्या व्याख्येत काळाचा संदर्भ ज्या दुसऱ्या अर्थानेसुद्धा आवश्यक असतो तो म्हणजे 'उत्पादन कार्यकाल ' ( ऑपरेटिंग टाइम ) होय. कोणत्याही संयंत्राचा, व्यवसाय संस्थेचा किंवा उद्योगाचा उत्पादन कार्यकाल हा वर्षातील कामाचे दिवस, दिवसातील कामाच्या पाळ्या व कामाच्या पाळ्यांचे तास या संदर्भात मोजला जातो. जर 'अ' व्यवसाय संस्था आठवड्यातील 6 दिवस 8 तासांच्या 2 पाळ्यात काम करते आणि 'ब ' व्यवसाय संस्था आठवड्यातील 6 दिवस 8 तासांच्या 3 पाळ्यात काम करते तर त्या दोन्ही व्यवसाय संस्थांची क्षमता सारखी असणार नाही. 'ब ' ची क्षमता 'अ' या व्यवसाय संस्थेपेक्षा जास्त असेल. त्यामुळे " संयंत्र किती काळ काम करते यावर त्याची क्षमता अवलंबून असते व ह्या उत्पादनकार्यकालाचा संदर्भ नसल्यास क्षमता निश्चित करता येणार नाही.' [ फ्रेड्रिक मूर, 1957 ].

## क्षमतेच्या व्याख्येची गृहीते

क्षमतेची तांत्रिक किंवा अर्थशास्त्रीय यापैकी कोणत्याही दृष्टिकोनातून व्याख्या करताना काही गृहीते मानली जातात व म्हणून या गृहीतांचा संदर्भ या विश्लेषणात अनिवार्य ठरतो. यातील महत्त्वाची गृहीते खालीलप्रमाणे आहेत.

(1) क्षमतेची व्याख्या करताना उत्पादनासाठी आवश्यक अशा सर्व चल निविष्टींचा पुरवठा पूर्णपणे लवचिक आहे असे मानले जाते. कारण, तसे न मानल्यास (म्हणजेच निविष्टींच्या पुरवठ्यात अडथळे असल्यास) संयंत्रांची वापरात येणारी क्षमता व होणारे उत्पादन पूर्ण क्षमतेपेक्षा कमी असेल. याचा अर्थ असा की, निविष्टींच्या पुरवठ्यात अडथळे असतील तर व्यवसायामध्ये अतिरिक्त क्षमता पडून राहील. ही स्थिती कायम राहात असेल तर, खूप जास्त क्षमता निर्माण करण्याला काहीच अर्थ उरत नाही.

(2) क्षमतेच्या व्याख्येत उत्पादनतंत्र स्थिर असते असे गृहीत धरले जाते. उत्पादनतंत्रात बदल होत गेल्यास संयंत्रांच्या क्षमतेतदेखील बदल होईल, व प्रत्यक्षात क्षमता मोजणे अवघड जाईल.

(3) क्षमतेची मोजणी वास्तव उत्पादनात (फिजिकल आउटपुट) केली जाते, पैशातील मूल्यात नाही. असे करण्याचे कारण म्हणजे, क्षमता पैशात मोजल्यास चलनफुगवटा व चलनक्षय यामुळे किंमत पातळीत होणारे बदल अडचणी निर्माण करतील आणि त्यामुळे दोन वेगळ्या काळातील क्षमतेची तुलना करणे अडचणीचे होईल.

(4) कोणत्याही व्यवसाय संस्थेची / संयंत्राची क्षमता मोजताना संयंत्र वापराचा कालावधी सर्वमान्य पद्धतीने मोजला जातो हे गृहीत धरावे लागते. संयंत्राच्या वापराचे दिवस, कामाचे तास, कामाच्या पाळ्या इत्यादींच्या मोजमापाच्या सर्वमान्य संकल्पना वापरल्या जातात हे गृहीत धरूनच क्षमतेची व्याख्या केली जाते.

## व्याख्या करण्यातील अडचणी

क्षमतेची संकल्पना व व्याख्या निश्चित करताना दोन प्रकारच्या अडचणी निर्माण होतात : (अ) क्षमतेच्या संकल्पनेकडे बघण्याच्या दृष्टिकोनासंदर्भातील अडचणी आणि (आ) अन्य सर्वसाधारण अडचणी.

(1) क्षमतेच्या अर्थशास्त्रीय दृष्टिकोनात उत्पादन परिव्ययाच्या संदर्भात क्षमता स्पष्ट स्पष्ट केली जाते. परंतु बहुवस्तू व्यवसाय संस्थेच्याबाबतीत (जेव्हा एखादी व्यवसाय संस्था एकापेक्षा जास्त उत्पादने निर्माण करीत असते तेव्हा) आणि L आकाराच्या सरासरी परिव्यय वक्राच्या बाबतीत क्षमतेची व्याख्या करणे अवघड असते. पहिल्या प्रकारात काही सामयिक परिव्ययामुळे वस्तूंचा सरासरी परिव्यय निश्चित करण्यात अडचणी येतात तर दुसऱ्या प्रकारात किमान सरासरी परिव्यय बिंदू निश्चित करणे दुरापास्त होते.

त्याचप्रमाणे उत्पादनपरिव्यय मोजताना 'घसारा' सारख्या संकल्पनांमध्ये एकवाक्यता नसल्यामुळे परिव्ययावर आधारित क्षमतेची व्याख्या करताना प्रश्नचिन्ह उभे राहते. घसारा निश्चित करण्याच्या विविध पद्धती असल्यामुळे, त्यावर आधारित सरासरी परिव्यय भिन्न असतो. परिणामी, अशा भिन्न सरासरी परिव्ययाच्या संदर्भात (पूर्ण) क्षमता वेगवेगळी ठरू शकते.

(2) क्षमतेची व्याख्या तांत्रिक अथवा अभियांत्रिकी दृष्टिकोनाप्रमाणे करताना उत्पादन परिव्यय लक्षात न घेता उत्पादन फलनाच्या स्वरूपात क्षमतेचा विचार केला जातो. या दृष्टिकोनाप्रमाणे (पूर्ण) क्षमता वापरल्या जाणाऱ्या निविष्टींचा संयोगित निर्देशांक (कम्बाइन्ड इन्डेक्स) म्हणजेच 'क्षमता' होय. पण या बाबतीतही भांडवलाचा साठा मोजण्यात अडचण निर्माण होते. तरीदेखील अनुभवनिष्ठ अभ्यासाच्यादृष्टीने (एम्पिरिकल स्टडी) अर्थशास्त्रीय दृष्टिकोनापेक्षा क्षमतेचा तांत्रिक दृष्टिकोन जास्त व्यवहार्य ठरतो.

(3) वरील अडचणींव्यतिरिक्त क्षमतेची व्याख्या करताना अथवा कोणत्याही संयंत्राची/व्यवसाय संस्थेची क्षमता ठरविताना अन्य सर्वसाधारण अडचणीही येतात. उत्पादनक्षमता ही उद्‌विष्टींच्या घटकांमध्ये (युनिट्स ऑफ आउटपुट) मोजली जाते. उत्पादित केला जाणारा प्रत्येक नग एकजिनसी असेल तर क्षमता ठरविणे कठीण होणार नाही. परंतु प्रत्यक्षात उत्पादित केलेल्या एकाच उत्पादनाच्या विविध नगांमध्ये गुणवत्तेच्यादृष्टीने, सुबकतेच्यादृष्टीने, सफाईच्यादृष्टीने अल्प फरक राहतातच. म्हणजेच उत्पादित नगांमध्ये एकजिनसीपणा नसल्यास संकल्पनात्मकदृष्ट्या क्षमतेची व्याख्या करणे कठीण बनते. एकापेक्षा जास्त उत्पादने निर्माण करणाऱ्या संयंत्राच्याबाबतीत तर हा प्रश्न अधिकच किचकट बनतो.

## उत्पादनक्षमता संकल्पनेचे उपयोग

संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करावयाचा झाल्यास उत्पादनक्षमता संकल्पनेचे आणि क्षमता मोजणीचे अनेक उपयोग प्रत्यक्षात होऊ शकतात.

अर्थव्यवस्थेच्या क्षमतेच्या वापराची प्रतिशत आकडेवारी उपलब्ध असल्यास, त्या आधारावर अर्थव्यवस्थेच्या एकूण कार्यक्षमतेचे मूल्यमापन करता येणे शक्य होते. त्यामुळे अर्थव्यवस्था किती उत्पादनक्षम आहे हे निश्चित करताना बेकारीची पातळी वगैरेसारख्या चलांपेक्षा क्षमता वापराचे दर (टक्केवारी) अधिक उचित ठरतात. थोडक्यात, अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील, उद्योगातील क्षमता वापराची प्रतिशत दराची आकडेवारी विचारात घेतल्यास उपलब्ध साधनसामग्रीचा प्रत्यक्षातील वापर, पर्याप्त वापर इत्यादी विश्लेषण सुलभ होते.

त्याचप्रमाणे व्यापारचक्र सिद्धान्ताचे स्पष्टीकरण करण्यात क्षमता संकल्पनेचा वापर महत्त्वाचा ठरतो. कारण, व्यापारचक्रातील विविध टप्प्यांमध्ये आर्थिक प्रक्रियात जे बदल होतात त्यांचे विश्लेषण पर्याप्त

क्षमता व प्रत्यक्षातील क्षमता यांच्यातील तुलनेच्या साहाय्याने करता येते.

काही परिस्थितीत, भांडवलाचा साठा मोजण्यातील अडचणींना पर्याय म्हणून उत्पादनक्षमता संकल्पना व आकडेवारीचा उपयोग केला जाऊ शकतो. भांडवली साठ्याची मोजणी करण्याच्या पद्धतीत ज्या त्रुटी आहेत त्याची भरपाई क्षमतेच्या संकल्पनेच्या उपयोगाने करता येऊ शकते. [एल. आर. क्लाइन, 1960].

व्यष्टी पातळीवर व्यवसाय संस्थेला आपल्या उत्पादन नियोजनाच्या संदर्भात (श्रमशक्ती नियोजन, भांडवल नियोजन, कच्च्या मालाचे नियोजन इत्यादी) क्षमतेची व्याख्या व आकडेवारी उपयुक्त ठरते. स्थापित क्षमतेपेक्षा प्रत्यक्षातील क्षमता कमी असल्यास त्याच्या कारणांचा अभ्यास करून पूर्ण क्षमता कशी वापरता येईल यादृष्टीने व्यवस्थापक आपली योजना आखू शकतो. त्याचबरोबर निविष्टींचा पर्याप्त वापर आणि कामगारांच्याबाबतीत वापरली जाणारी संप्रेरके यासंबंधी योग्य निर्णय घेता येऊ शकतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कोणत्याही व्यवसाय संस्थेची क्षमता ही तिच्या व्यवस्थापन व श्रमिकांच्या कार्यक्षमतेची निदर्शक असते.

## समारोप

सारांशाने सांगावयाचे झाल्यास, विकसनशील देशात उत्पादनक्षमतेचा अपुरा वापर हा महत्त्वाचा आर्थिक प्रश्न मानल्यास 'क्षमता' संकल्पनेचे वेगळे महत्त्व सांगावयास नको. व्यष्टी पातळीवर 'क्षमता' संकल्पनेचा उपयोग भांडवल, श्रमशक्ती किंवा व्यवस्थापन यांच्या कार्यक्षमतेचा मापदंड म्हणून करता येतो. त्याचबरोबर समष्टी आर्थिक विश्लेषणात क्षमता संकल्पनेचा उपयोग विविध सिद्धान्तामध्ये केला जातो. असे असूनही प्रत्यक्षात क्षमतेची व्याख्या करणे व विविध पातळ्यांवर क्षमता मोजणे अनेक अडचणींमुळे अवघड ठरते. या अडचणींवर मात करून शास्त्रीय पद्धतीने क्षमता ठरविण्यात व मोजण्यात यश आले तर त्याचा अर्थशास्त्रीय विश्लेषणात फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकेल आणि संयंत्राचे, उद्योगाचे अथवा अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षमतेने करणे भविष्यात शक्य होईल.

[**टीप** : या लेखाच्या मूळ मसुद्यावर चर्चा करून काही उपयुक्त सूचना केल्याबद्दल लेखक पी. वेंकटरामय्या आणि लतिका अरगडे यांचा ऋणी आहे. तथापि लेखातील उणीवांची जबाबदारी सर्वस्वी लेखकाची आहे. मूळ इंग्रजी मसुद्याचे मराठीकरण करण्यात संजय चपळगावकर यांनी मदत केल्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.]

## संदर्भ सूची

1 बाऊमन, आर. अॅन्ड फिलिप्स, अल्मारिन (1955), **दि कपॅसिटी कन्सेप्ट अॅण्ड इंड्युस्ड इन्व्हेस्टमेंट,** दि कनेडियन जर्नल ऑफ इकनॉमिक्स अॅन्ड पोलिटिकल सायन्स, खंड 21, पृ. 190-203.

2 बुदिन, मॉरिस अॅन्ड सॅम्युअल, पॉल (1961), "युटिलायझेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रिअल कपॅसिटी (1949-59)," **इंडियन इकनॉमिक जर्नल,** खंड 9, पृ. 19-47.

3 चेंबरलिन, इ. एच. (1933), **दि थिअरी ऑफ मॉनॉपलिस्टिक कॉम्पिटिशन,** ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

4 फ्रँक, डि ल्यु, (1933), "दि कन्सेप्ट ऑफ कपॅसिटी," **प्रोसिडिंग्ज ऑफ बिझिनेस अॅण्ड इकनॉमिक स्टॅटिस्टिक्स सेक्शन,** अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशन, पृ. 320-29.

5 गुप्ता, मीना व थावराज, एम. जे. के. (1975), "कपॅसिटी युटिलायझेशन अॅन्ड प्रॉफिटॅबिलिटी : ए केस स्टडी ऑफ फर्टिलायझर युनिट्स," **प्रॉडक्टिव्हिटी** 16 : 3, पृ. 882-92.

6 हिकमन, बर्ट जी. (1957), "कपॅसिटी, कपॅसिटी युटिलायझेशन अॅन्ड अॅक्सिलरेशन प्रिन्सिपल : प्रॉब्लेम्स ऑफ कॅपिटल फॉर्मेशन," **स्टडीज इन इन्कम अॅन्ड वेल्थ,** खंड 19, पृ. 419-68.

7 हिकमन, बर्ट जी. ए. (1963), "न्यू मेथड ऑफ कपॅसिटी एस्टिमेशन," **प्रोसिडिंग्ज ऑफ बिझिनेस अॅन्ड इकनॉमिक स्टॅटिस्टिक्स सेक्शन,** अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशन, पृ. 208-30.

8 क्लाइन, एल. आर. (1960), "सम थिऑरिटिकल इश्युज इन दि मेझरमेंट ऑफ कपॅसिटी," इकनॉमेट्रिका, खंड 28, पृ. 208-30.

9 मूर, फ्रेड्रिक टी. (1957), "कॅपिटल कोइफिशन्ट इन मिनरल अॅन्ड मेटल इंडस्ट्रीज – प्रॉब्लेम्स ऑफ कॅपिटल फॉर्मेशन," **स्टडीज इन इन्कम अॅन्ड वेल्थ,** खंड 19, पृ. 311-46.

10 नॅशनल कौन्सिल फॉर अॅप्लाइड इकनॉमिक रिसर्च (1966), **अंडरयुटिलायझेशन ऑफ इंडस्ट्रीयल कपॅसिटी,** एन. सी. ए. इ. आर., नवी दिल्ली.

11 फिलिप्स, अल्मारिन (1963), "अॅन अॅप्रेजल ऑफ मेझर्स ऑफ कपॅसिटी," पेपर्स अॅन्ड प्रोसिडिंग्ज ऑफ सेव्हंटी फिफ्थ अॅन्युअल मिटिंग ऑफ दि अमेरिकन इकनॉमिक असोसिएशन, **अमेरिकन इकनॉमिक रिव्हयू,** पृ. 275-92.

12 श्रीनिवासमूर्ती, ए. पी. (1979), "दि प्रॉब्लेम ऑफ अंडरयुटिलायझेशन ऑफ प्रॉडक्टिव्ह कपॅसिटी इन इंडियन इंडस्ट्री," **इंडियन इकनॉमिक डेव्हलपमेंट अॅन्ड पॉलिसी, एसेज इन ऑनर ऑफ प्रोफेसर व्ही. एल. डिसूझा,** एडिटेड बाय पी. आर. ब्रह्मानंद, पृ. 149-70.

13 विन्स्टन, गार्डन सी. (1977), "कपॅसिटी : अॅन इंटिग्रेटेड मायक्रो अॅन्ड मॅक्रो अॅनॅलिसीस," पेपर्स अॅन्ड प्रोसिडिंग्ज ऑफ दि एटी नाइन्थ अॅन्युअल मिटिंग ऑफ अमेरिकन इकनॉमिक असोसिएशन, **अमेरिकन इकनॉमिक रिव्हयू,** पृ. 418-22.

□ □

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## परिषदेचे सदस्य व हितचिंतक यांना आवाहन

'अर्थसंवाद' या नियतकालिकावरील व कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे व परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र कायम निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सदस्यांकडून व परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या / अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत ठरविण्यात आले आहे. 'अर्थसंवाद'चे वाचक, परिषदेचे साधारण सदस्य व अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील व परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

या निधीसाठी पाठवावयाचे बँक ड्राफ्ट, मनिऑर्डर इत्यादी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावेत व ते धुळे येथील कार्यालयीन पत्त्यावर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी 'अर्थसंवाद' च्या अंकात दिली जातील.

**व्यं. सु. पाटणकर**
कार्यवाह–खजिनदार

# उद्योगीकरणाकडे झेपावणारे चार देश आणि भारत

शि. ना. माने *

## प्रास्ताविक

सर्वसाधारणपणे 1970 पर्यंत आर्थिक वृद्धी (इकनॉमिक ग्रोथ) हा परवलीचा शब्द (अझवर्ड) होता. आर्थिक वृद्धी घडून आली म्हणजे दारिद्र्य व विषमता यांचा स्वतंत्रपणे विचार करण्याचे कारण नव्हते. परंतु 1970 नंतर असे स्पष्ट झाले की, केवळ आर्थिक वृद्धी दारिद्र्य व विषमता कमी करण्यास आवश्यक असली तरी ती पुरेशी ठरत नाही. किंबहुना सांकेतिक आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत बेकारी, दारिद्र्य व विषमता या समस्या अधिक तीव्र बनतात. म्हणून रोजगारात वाढ करणे, उत्पन्न व संपत्तीतील विषमता कमी करणे, गरिबांच्या उत्पादकतेत सुधारणा करणे व मूलभूत गरजा[1] (अन्न, वस्त्र, निवारा यांच्याबरोबरच शिक्षण, आरोग्य, नागरी स्वातंत्र्ये इत्यादी) तृप्त करणे असे परस्परपूरक विकासतंत्र विकसित झाले. त्यासाठी महाव्यवस्थापक (मॅक्रो–मॅनेजर) सरकारची गरज निर्माण झाली. आर्थिक विकास (इकनॉमिक डेव्हलपमेंट) हे जसे त्या सरकारच्या निर्मितीचे मूलभूत तत्त्व (रॅशनेल) होते. तसेच त्या सरकारच्या अस्तित्वाचे ते समर्थनही (रेझांडेटर) ठरले.

पूर्वी काही देश सरकारच्या पाठिंब्याशिवाय विकास पावले. त्यांच्याशी बरोबरी करायची असेल तर, सरकारी हस्तक्षेपाशिवाय मागास देशांपुढे दुसरा मार्ग उपलब्ध नव्हता. उद्योगप्रधान देशांना गाठण्याची परिकल्पना (कॅचिंग–अप हायपॉथेसिस) म्हणून ती विकासप्रक्रिया सुपरिचित आहे. मागास देश ऐतिहासिकदृष्टीने मागे राहिले होते. विकसित देशांना गाठण्याच्या चढाओढीत त्या देशांच्या सरकारांना उत्पादन, किंमत व बाजार या क्षेत्रांच्या बाबतीत काही प्रोत्साहने व प्रलोभने देणे भाग होते. स्वाभाविकपणेच हळूहळू या गाठण्याच्या प्रक्रियेची जागा लोकानुरंजनवादी (पॉप्युलिस्ट) धोरणांनी घेतली. परिणामी, वृद्धी / विकासाकडे 'मोफत वस्तू' (फ्री गुड) म्हणून पाहण्याची

* धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.

सवय जडलेल्या लोकतांत्रिक सरकारने विकासफलाचे संविभाजन (अपोर्शनमेंट) करताना त्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या परिव्ययाचे वितरण करण्याचे हेतुतः टाळले, अशी सार्थ मल्लिनाथी मॅसॅच्युसेट्स इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीतील प्राध्यापक लीस्टर थुरो[2] यांनी केली. त्या गाठण्याच्या प्रक्रियेचा नक्त परिणाम असा झाला की, राष्ट्रीय उत्पन्नातील वृद्धीचे विकासात रूपांतरण करण्यात काही सरकारे अयशस्वी ठरली. त्याचे एक प्रमुख स्पष्टीकरण म्हणजे अनावश्यक वा कमी आवश्यक बाबींवर होणाऱ्या सरकारी खर्चाचा हिस्सा वाढत गेला. उदाहरणार्थ, एखाद्या देशातील परिस्थितीनुसार आरोग्य व शिक्षणावर अधिक खर्च होण्याची गरज असताना सार्वजनिक उद्याने व तुरूंग यांच्या बांधकामावर तो जास्त होऊ लागला. विशेषतः किंमत धोरण व बाजार या क्षेत्रातील सरकारच्या अनाठायी व वारंवार वाढत जाणाऱ्या अतिरिक्त हस्तक्षेपामुळे आर्थिक विकासाच्या प्रमुख उद्दिष्टालाच बाधा आली. सरकारी हस्तक्षेप विकासाचे इंजिन ठरण्याऐवजी तो विकासाची कोंडी करणारा ठरू लागला. परंतु हाँगकाँग, कोरिया, सिंगापूर व तैवान (फोर्मोसा) हे जलद गतीने उद्योगीकरणाकडे झेपावणारे नव्यानेच प्रकाशझोतात आलेले देश याला अपवाद ठरले.

## काही मूलभूत आर्थिक निर्देशक

अलीकडे उपरिनिर्दिष्ट चार देशांनी विख्यात विकास अर्थशास्त्रज्ञांचे लक्ष वेधले आहे. जवळजवळ चार दशकांपूर्वी नैसर्गिक साधनसामग्री, हवामान, शेती, उद्योग व शासनव्यवस्था यांच्या बाबतीत भारताच्या तुलनेने अधिक प्रतिकूल परिस्थितीत असणाऱ्या या देशांनी पाठीमागील दोन दशकांत आर्थिक विकासात विस्मयकारक आघाडी मिळविली आहे. काही महत्त्वाचे आर्थिक निर्देशक त्याची साक्ष देतात. हे निर्देशक तक्ता 1 ते 5 मध्ये दिले आहेत.

**तक्ता 1**

**लोकसंख्या दशलक्ष**

| देश | 1983 | 1984 | 1985 | 1986 | 1987 | 1988 |
|---|---|---|---|---|---|---|
| हाँगकाँग | 5.3 | – | 5.4 | 5.4 | 5.6 | 5.7 |
| कोरिया | 40.0 | – | 41.1 | 41.5 | 42.1 | 42.0 |
| सिंगापूर | 2.5 | – | 2.6 | 2.6 | 2.6 | 2.6 |
| तैवान | – | – | – | 19.4 | 19.6 | – |
| भारत | 733.2 | – | 765.1 | 781.4 | 797.5 | 815.6 |

**संदर्भ** : वर्ल्ड डेव्हलपमेन्ट रिपोर्टस्, 1985, 1987 ते 1990.

**तक्ता 2**

**दरडोई राष्ट्रीय उत्पन्न (डॉलर)**

| देश | 1983 | 1984 | 1985 | 1986 | 1987 | 1988 |
|---|---|---|---|---|---|---|
| हाँगकाँग | 6,000 | – | 6,230 | 6,910 | 8,087 | 9,220 |
| कोरिया | 2,010 | – | 2,150 | 2,370 | 2,690 | 3,600 |
| सिंगापूर | 6,620 | – | 7,410 | 7,420 | 7,940 | 9,070 |
| तैवान | – | 3,050* | – | – | 5,080* | – |
| भारत | 260 | – | 270 | 290 | 300 | 340 |

**संदर्भ** : (1) वर्ल्ड डेव्हलपमेन्ट रिपोर्टस्, 1985, 1987 ते 1990.

* (2) एन्साइक्लोपीडिआ ब्रिटानिका, बुक ऑफ दि इयर, 1987 आणि 1990.

**तक्ता 3**

**वार्षिक भावफुगवटा दर (शेकडा)**

| देश | 1965–80 | 1980–85 | 1980–86 | 1980–87 | 1980–88 |
|---|---|---|---|---|---|
| हाँगकाँग | 8.1 | 7.9 | 6.9 | 6.7 | – |
| कोरिया | 18.8 | 6.0 | 5.4 | 5.0 | – |
| सिंगापूर | 4.9 | 3.1 | 1.9 | 1.3 | – |
| तैवान | – | 3.9* | 4.0* | – | – |
| भारत | 7.6 | 7.8 | 7.6 | 7.9 | – |

**संदर्भ :** (1) वर्ल्ड डेव्हलपमेन्ट रिपोर्टस्, 1985, 1987 ते 1990.

* (2) एन्साइक्लोपीडिआ ब्रिटानिका, बुक ऑफ दि इयर 1987 आणि 1988 (ग्राहक किंमत निर्देशांक)

**तक्ता 4**

**(अपेक्षित) आयुर्मर्यादा (वर्षे)**

| देश | 1983 | 1984 | 1985 | 1986 | 1987 | 1988 |
|---|---|---|---|---|---|---|
| हाँगकाँग | 76 | 76 | 76 | 76 | 76 | 77 |
| कोरिया | 67 | 68 | 69 | 69 | 70 | 70 |
| सिंगापूर | 72 | 73 | 73 | 73 | 73 | 74 |
| तैवान | – | 73* | – | – | 73* | – |
| भारत | 55 | 55 | 56 | 57 | 58 | 58 |

**संदर्भ :** (1) वर्ल्ड डेव्हलपमेन्ट रिपोर्टस्, 1985, 1987 ते 1990.

(2) एन्साइक्लोपीडिआ ब्रिटानिका, बुक ऑफ दि इयर, 1987 आणि 1990.

**तक्ता 5**

**साक्षरता दर (शेकडा)**

| देश | 1960 | 1970 | 1980 |
|---|---|---|---|
| हाँगकाँग | 71 | 77 | 90 |
| कोरिया | 71 | 88 | 96 |
| सिंगापूर | 50 | 72 | 84 |
| तैवान | 54 | 85 | 90 |
| भारत | 24 | 34 | 36 |

**संदर्भ :** जेम्स, विल्यम इ., नाया, सिजी आणि मीर, जेराल्ड एम. (संपा.), **एशियन डेव्हलपमेंट : इकनॉमिक सक्सेस अँन्ड पॉलिसी,** इंटरनॅशनल सेंटर फॉर इकनॉमिक ग्रोथ, 1987, पृ. 219, तक्ता 6.8 वरुन योग्य त्या फेरफारासह.

या तक्त्यांतील निर्देशकांचा विचार करण्यापूर्वी आणखी दोन गोष्टींचा खुलासा करायला हवा.

**(अ) निर्यातभिमुख विकास :** 1960–85 मध्ये या चार देशांच्या वार्षिक वास्तव दरडोई उत्पन्नातील वाढ 6.5 टक्के होती. ही वाढ 'एशियन' (असोसिएशन ऑफ साऊथ ईस्ट एशियन नेशन्स – इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपिन्स व थायलंड) तसेच आशियाई (बांगला देश, ब्रह्मदेश, भारत, नेपाळ, पाकिस्तान व श्रीलंका) देशांच्या तुलनेने चांगलीच जास्त आहे. 1960 पर्यंत हे चार देश शेतीप्रधान व मागास होते. विशेषत: कोरिया व तैवान यांच्या निर्यातीत प्राथमिक वस्तूंचे हिस्से अनुक्रमे 86 टक्के व 73 टक्के होते. मर्यादित स्वदेशी बाजार व अपुरी तसेच अविकसित नैसर्गिक साधने या इष्टापत्तीमुळे त्या देशांना निर्यात–

भिमुख उद्योगीकरणावर विसंबून राहावे लागले. आणि येथून पुढील काळातही तसे राहावे लागणार आहे. 1960 नंतर त्यांचे उद्योगीकरण जसे वाढत गेले तसा श्रमसघन यंत्रमालांचा एकूण निर्यातीतील हिस्सा घटत गेला, हे येथे ध्यानात घ्यायला हवे.

**(आ) एकसारखेपणाचा अभाव** : या चार देशांच्या जलद उद्योगीकरणासाठी एकसारखे धोरण कारणीभूत ठरल्याचे आढळत नाही. उदाहरणार्थ, सुलभ पैसा (चीप मनी) धोरण उत्पादकांना पोषक ठरते ही सर्वसाधारण व रूढ उपपत्ती झाली. 1961-79 मध्ये कोरिया सरकारने त्या धोरणाचा अवलंब केला. सरकारला निर्यातभिमुख उत्पादनसंस्थांना झुकते माप द्यायचे होते. आणि अपेक्षेप्रमाणे कोरियाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील निर्यातीचा हिस्सा वाढला देखील. निर्यातीचा हिस्सा वाढूनदेखील किंवा तो वाढल्यामुळे विदेशी व्यवसायसंस्थांचा कोरियात पसारा व प्रभाव वाढून सुरुवातीच्या काळात भावफुगवटागर्भित दबावही वाढले. तक्ता 3 मध्ये त्याची साक्ष पटते. परंतु तैवानचा अनुभव याच्या उलट आहे. 1964–88 मध्ये तेथील सरकारने दुर्लभ पैसा (डिअर मनी) धोरणाचा पाठपुरावा केला. तुलनेने व्याज दर जास्त होते त्याचा परिणाम म्हणजे बचतीची पातळी वाढली. आणि विशेष म्हणजे भांडवलाच्या वापरात काटकसर व कार्यदक्षता निर्माण होऊन निर्यात वाढविणे सुलभ झाले.[3]

दुसरे, आणि या विषयाच्या संदर्भातील अधिक महत्त्वाचे, उदाहरण म्हणून सिंगापूर व कोरिया या देशांच्या वास्तव दरडोई उत्पन्नांचा व तेथील मानवी विकास निर्देशांकाचा[4] (ह्यूमन डेव्हलपमेंट इन्डेक्स) उल्लेख करता येईल. 1987 मध्ये कोरियातील वास्तव दरडोई उत्पन्न 4,832 डॉलर होते, तर सिंगापूरमध्ये ते 12,790 डॉलर, म्हणजे जवळजवळ अडीच पटीने जास्त, होते. परंतु मानवी विकास निर्देशांकाच्या–बाबतीत कोरियाने सिंगापूरला मागे टाकल्याचे आढळते. कोरियाचा तो निर्देशांक 97 होता, तर सिंगापूरचा 96 होता. (जपानचा तो निर्देशांक सर्वाधिक म्हणजे 130 होता, तर भारताचा फक्त 37 होता). तात्पर्य, अलीकडे आर्थिक विकासाची गमके व विस्तार (डायमेन्शन्स) बदलत आहेत. राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा मानवी विकास निर्देशांक अधिक महत्त्वाचा व विश्वसनीय ठरला आहे. तो सरकारी खर्चापेक्षा सरकारी खर्चाच्या प्राधान्यक्रमावर व त्या खर्चाच्या कार्यदक्ष वापरावर अधिक अवलंबून असतो. म्हणजे येथून पुढील काळात आर्थिक विकासातील सरकारचा कार्यभाग अधिक व्यापक व निर्णायक ठरणार आहे. म्हणून मूलभूत आर्थिक निर्देशकांविषयीचे येथून पुढील विवेचन भारतासह त्या चार देशांच्या सरकारांच्या कार्यभागाच्या अनुषंगानेच करायचे आहे. ते करण्यापूर्वी सरकारच्या कार्यभागाच्या संबंधातील एका वाद–प्रवादाचा निर्देश करणे जरूर आहे

**सरकार शून्यावस्था ?** : आपण पाठीमागे पाहिले की, आर्थिक वृद्धीकडून आर्थिक विकासाकडील संक्रमण सरकारी हस्तक्षेपाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. अशा–प्रकारे सरकारी हस्तक्षेप अटळ ठरला असला तरी त्यामुळे अनेक आर्थिक आघाड्यांवर सरकारला अपयश येते. असमर्थ सरकार, अलवचिक अधिकारी वर्ग व निःसार विनिमयने यांची युती होऊन देशाला भारी किंमत मोजावी लागते. म्हणूनच सरकारशून्य अवस्थेचा पुरस्कार करणारी एक उपपत्ती मांडण्यात येते. परंतु ती अवस्था आज व्यवहार्य ठरेल काय ? सरकार व सरकारी खर्चातील अपव्यय या दोन स्वतंत्र बाबी आहेत. सरकारी खर्चात उधळमाधळ होते म्हणून सरकारलाच नाकारणे चूक आहे. सरकार ही संस्थाच संपुष्टात आणून मूळ प्रश्न सुटत नाही. उलट तो अधिक बिकट बनतो. अकार्यदक्ष व महागड्या सर–कारचा पर्याय म्हणून सरकारशून्य अवस्थेचा स्वीकार ही एक प्रकारची मानसिकता किंवा मायाजाल ठरेल. याउलट, अधिक चांगल्या गुणवत्तेच्या सरकारचा पर्याय ही वास्तवता आहे. विकासाच्या गुणवत्तेसाठी चांगल्या गुणवत्तेचे सरकार अनिवार्य आहे. विकासाच्या परि–माणाऐवजी त्याच्या गुणवत्तेवर जोर देताना सेन म्हणतात, " वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात विस्तार करणे नव्हे, तर लोकांच्या क्षमतांची प्रथमतः पातळी उंचावणे ही विकासाची प्रक्रिया आहे."[5] विकासाचे हे नवीन अंग ध्यानात घेऊन आता मूलभूत आर्थिक निर्देशकांचा विचार करू.

## सरकार व भावफुगवटा

1970 नंतरचा भावफुगवटा ही एक लक्षण

समुच्चयावस्था (सिन्ड्रोम) आहे. अनेकविध कारणांमुळे तो जसा उद्भवतो तसाच तो अनेक लक्षणांनी युक्त असतो. पैशाच्या पुरवठ्यातील वाढ हे एकमेव कारण पुरेसे ठरत नाही. उलटपक्षी भारतासारख्या विकसनशील देशातील भावफुगवटा प्रामुख्याने संरचनात्मक स्वरूपाचा आढळतो करयोग्यक्षमता मर्यादित असल्यामुळे कर्जाच्या माध्यमातून जास्त गुंतवणूक खर्च करावा लागतो. वाढत जाणाऱ्या तुटीच्या अर्थभरण्याला व गुंतवणूक खर्चाला उत्पादनातील वाढीचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. त्याची दोन प्रमुख कारणे आहेत : (अ) अल्प मागणी-लवचिकता आणि (आ) मोठ्या प्रमाणावरील पुरवठा संरोध (सप्लाय कन्स्ट्रेन्ट). परिणामी 'भावफुगवटा कर' (इन्फ्लेशन टॅक्स) अपरिहार्य ठरतो. भावफुगवटा कर हे राजकोषीय धोरणाचे एक अमोघ शस्त्र म्हणून वापरले जाऊ लागले, तसेच तो त्या धोरणाचा एक अविभाज्य घटकगुणही असतो. भावफुगवटा कराविषयी अधिक स्पष्टीकरण करताना जागतिक बँक अहवाल (1989) म्हणतो, " अर्थव्यवस्थेच्या पैसा धारण करण्याच्या इच्छाशक्तीतील वाढीपेक्षा पैशाचा पुरवठा जास्त झाला, तर त्याचा परिणाम म्हणून कराप्रमाणे वर्तन करणारा भावफुगवटा निर्माण होतो. . . जर भावफुगवट्याची पातळी उंच असेल व स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या टक्केवारीत कराचा आधार ठरणारा पैशाचा साठा घटला असेल, तर ठराविक महसूल प्राप्त करण्यासाठी मध्यवर्ती बँकेला जास्त प्रमाणात पैशाचा पुरवठा करणे व अधिक वरच्या पातळीवरील भावफुगवटा निर्माण करणे भागच पडते."[6] म्हणजे आज भावफुगवट्याचे जनकत्व सरकारकडे जाते.

विकसनशील देशांच्या बाबतीत राजकोषीय-पैसाविषयक धोरणात एक अतूट दुवा निर्माण होतो या संदर्भात ऑलिवेरा ( 1967 ) यांच्या निष्कर्षाचा आधार घेऊन नरेंद्र जाधव व बलवंत सिंग म्हणतात, "पैशाचा पुरवठा स्वतः भावफुगवट्यापासून स्वतंत्र असू शकत नाही. किंमतपातळीतील ठराविक बदलाशी सरकारी महसुलापेक्षा सरकारी खर्च जास्त जलद गतीने जुळवून घेतो आणि म्हणून भावफुगवटा राजकोषीय तुटीचा विस्तार करतो, मध्यवर्ती बँकेच्या वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून पैशाचा पुरवठा वाढवितो व अखेरीस आणखी स्वतःलाच चेतवितो".[7] अशा प्रकारे भावफुगवटा म्हणजे सरकारच्या राजकोषीय धोरणाची सत्त्वपरीक्षा होय. विशेषतः असमर्थ प्रशासक, निःसार विनियमने व अलवचिक अधिकारी वर्ग यांची युती झालेला देश भावफुगवट्याला अटकाव करण्यात क्वचितच यशस्वी ठरतो. तात्पर्य, पैसावादी प्रतिमान स्पष्ट करते त्याप्रमाणे पैशाचा पुरवठा व किंमतपातळीतील परस्परसंबंध एकदिशा स्वरूपाचा राहात नाही. सरकारी खर्च, आर्थिक वृद्धी, अर्थसंकल्पीय तूट, पैशाचा पुरवठा व भावफुगवटा यांच्यासंबंधीच्या धोरणात कृती व अकृती दोषांस (एरर्स ऑफ कमिशन अँन्ड ओमिशन) कारणीभूत ठरणारे सरकार राजकोषीय तसेच आर्थिक असमतोलांसही जबाबदार असते. आणि म्हणून विशिष्ट मर्यादेच्यापलीकडील भावफुगवट्याचे नियंत्रण करण्याची प्राथमिक जबाबदारी सरकारवर पडते. ती जबाबदारी भारत आणि विचाराधीन चार देशांच्या सरकारांनी कितपत पार पाडली असा येथे प्रश्न निर्माण होतो.

विषयांतराचा दोष कबूल करूनही आधुनिक काळातील व विकसनशील देशांतील भावफुगवट्याच्या उत्पत्तीची वरीलप्रमाणे संक्षेपात मीमांसा केली. हेतु हा की, भावफुगवट्यास प्रारंभिक अर्थाने जबाबदार असणाऱ्या सरकारला त्याची स्वतःची जबाबदारी 'देशद्रोही' साठेबाज व 'लुटारू' व्यापारी यांच्यावर टाकून स्वतःची सुटका करता येत नाही, हे स्पष्ट व्हावे. आधुनिक काळातील भावफुगवटानिर्मितीची प्रक्रिया ध्यानात घेऊन तक्ता 3 कडे वळू.

1965-87 या काळात भारतातील वार्षिक सरासरी भावफुगवटा 7 टक्क्यांच्या आसपास घोटाळत राहिला. सिंगापूरमधील भावफुगवटा दर कमीत कमी होता. मात्र 1965-80 या काळातील कोरियातील भावफुगवटा दर 18.8 टक्के, म्हणजे सर्वाधिक, होता. परंतु त्यानंतर तो सतत घटत जाऊन 1980-87 मध्ये तो 5 टक्क्यांवर स्थिरावला. त्याचे श्रेय 1980-85 मधील सरकारच्या स्थैर्य व खाजगीकरण या कार्यक्रमांकडे जाते 1960-80 या काळात कोरियातील वित्तीय संस्थांचे चिरेबंदी नियंत्रण करण्यात आले. त्याचा अनपेक्षित परिणाम असा झाला की, त्या संस्थांची ती नियंत्रणे धाब्यावर बसविण्याची प्रवृत्ती उफाळून वर आली. वित्तीय व्यवस्था काहीशी

विस्कळीत झाली. या घटनेचा योग्य बोध घेऊन 1980–85 मधील वित्तीय स्थैर्य व बँकांचे खाजगीकरण या धोरणांची घोषणा व कार्यवाही करण्यात आली. बँकांचे खाजगीकरण केल्यामुळे व्याजदराविषयी त्यांच्यामध्ये निकोप स्पर्धा सुरू झाली. ती वाढीस लागेल असेच सरकारचे धोरण होते. तसेच आश्चर्याची गोष्ट अशी की, त्या काळात चालू महसुली खात्यातील तूट संपुष्टात येऊन 1980–82 मध्ये फुगवटा 2 टक्क्यांपर्यंत घसरला. 1965–80 या काळातील कोरियातील 18.8 टक्के भाव फुगवट्याचा अपवाद सोडला तर हे चार देश भाव फुगवट्याला अटकाव करण्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरले आहेत.

## उत्पन्न–पोषण सममूल्यन (ट्रेड–ऑफ)

(अपेक्षित) आयुमर्यादा हा दुसरा मूलभूत आर्थिक निर्देशक आहे. आता त्याच्या अनुषंगाने चर्चा करू. पाठीमागे आपण असे म्हणालो की, उत्पन्नापेक्षा मानवी विकास निर्देशांक अधिक महत्त्वाचा व विश्वसनीय ठरला आहे. (अपेक्षित) आयुर्मर्यादेच्या संदर्भात आता त्या निर्देशांकाचा विचार करायचा आहे. झेपावणाऱ्या चार देशांनी याबाबतीतदेखील भारताला फार मागे टाकले आहे. दुसऱ्या एका उपलब्ध माहितीनुसार ब्राझिल, ओमान व द. आफ्रिका या देशातील 1987 मधील वास्तव दर डोई उत्पन्न अनुक्रमे 4,307 7,750, व 4981 डॉलर होते. या देशांच्या तुलनेने चीन, कोस्टारिका व श्रीलंका या देशांतील वास्तव दरडोई उत्पन्न त्या वर्षात अनुक्रमे 2,124, 3,760, व 2,053, डॉलर होते. परंतु दुसऱ्या गटातील देशांतील दरडोई उत्पन्न अल्प असूनही तेथील लोकांची पोषण पातळी (न्युट्रिशन लेव्हल) बरीच जास्त होती. हाच निष्कर्ष भारतीय संघराज्यातील पंजाब व केरळ या दोन घटक राज्यांना तंतोतंत लागू पडतो. केरळच्या तुलनेत पंजाबमधील दरडोई उत्पन्न जास्त असूनही तेथील लोकांची पोषण पातळी अल्प होती. उलटपक्षी पंजाबच्या तुलनेने केरळमधील दरडोई उत्पन्न अल्प असूनही तेथील लोकांची पोषण पातळी जास्त होती. सेन व ड्रेझ (1990) तसेच मेहबूब–उल्–हक् (1990) या विख्यात विकास अर्थशास्त्रज्ञांचा असा निष्कर्ष आहे की, उत्पन्न किंवा उष्मांकांपेक्षा सरकारी खर्चविषयक धोरण मानवी विकास निर्देशांकाचा (आयुर्मर्यादेचा) अधिक विश्वसनीय निकष ठरतो. याचा अर्थ असा नव्हे की, उत्पन्न–सधनता (इन्कम रिचनेस) व पोषण–सधनता (न्युट्रिशन रिचनेस) यांच्यात नेहमीच विसंवाद असतो. या संदर्भात जपानचे उदाहरण बोलके आहे. दरडोई उत्पन्न व (अपेक्षित) आयुर्मर्यादा यांच्या बाबतीत जपान आज (1989) पहिल्या क्रमांकाचा देश आहे. तात्पर्य, तो विसंवाद असणे वा नसणे हा बव्हंशी सरकारच्या गुणवत्तेचा प्रश्न आहे. उत्पन्नापेक्षा सरकारची गुणवत्ता जास्त महत्त्वाची ठरते. त्या गुणवत्तेच्या आधारे उल्लेखित चार देशांनी तेथील लोकांची (अपेक्षित) आयुर्मर्यादा निरंतरपणे वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.

आधुनिक आर्थिक विकासाच्या गुणवत्तेच्या संदर्भात सरकारची गुणवत्ता जितकी महत्त्वाची ठरते तितकीच तिची रेखीव व्याख्या करणे कठीण काम आहे. परंतु पुढील उदाहरणाच्या साहाय्याने त्या गुणवत्तेचे स्थूल स्वरूपात स्पष्टीकरण करू. विल्यम बी. जॉन्स्टन[8] यानी काही निवडक विकसित व विकसनशील देशांतील 1987 मधील प्रत्येक श्रमिकाने स्थूल राष्ट्रीय उत्पादनात दिलेल्या योगदानाचे डॉलर–मध्ये मूल्य मांडले आहे. त्यापैकी काही मोजक्या देशांच्या बाबतीत ते मूल्य पुढीलप्रमाणे होते. (कंसातील आकडे डॉलरमध्ये आहेत) : जपान (39,143), प. जर्मनी (38,066), अमेरिका (37,821), द. कोरिया (6,927), पाकिस्तान (780), भारत (724) व चीन (457). जपानचा क्रमांक पहिला, तर भारताचा क्रमांक खालून दुसरा आहे. विकसनशील देशांच्या गटात द. कोरिया क्रमांक एकवर आहे. प्रत्येक श्रमिकाच्या उत्पादकतेचे रहस्य 'श्रमाच्या वैश्वीकरणाकडून प्रमाणीकरणाकडे' (फ्रॉम ग्लोबलायझेशन टू स्टॅन्डर्डायझेशन) होत असलेल्या संक्रमणात सापडते. याउलट, भारतातील परिस्थिती खेदजनक आहे. आजही श्रम 'विपुल' म्हणून सुलभ/स्वस्त या विरोधाभासाचा त्याग करण्याची आमची तयारी नाही.

आज जागतिक व्यापारात गणना होते अशा प्रमुख यंत्रनिर्मित वस्तूंच्या उत्पादनातील श्रमाचा हिस्सा घसरत आहे. म्हणजे निदान अशा वस्तूंच्याबाबतीत श्रम हा उत्पादनघटक पूर्वीसारखा महत्त्वाचा राहिला

नाही. विपुल व सुलभ श्रमाच्या साठ्यापेक्षा त्याचा वापर कितपत उत्पादक होतो हा खरा प्रश्न आहे भारतासारखे श्रम व नैसर्गिक साधनांचा दाननिधी (इन्डाउमेन्ट) उपलब्ध नसलेले संदर्भातील चार देश आर्थिक विकासाच्या लाटेच्या शिखरावर आरूढ झाले आहेत. त्याचे रहस्य कशात आहे ? नैसर्गिक परिस्थिती विशेष अनुकूल नसतानाही पियानोच्या उत्पादनात ' राष्ट्रीय स्पर्धात्मक लाभ ' हस्तगत करुन कोरियाने जागतिक बाजारात आपले नेतृत्व प्रस्थापित केले. भारताप्रमाणेच तैवानमध्ये केळी, सप्ताळू व नारिंग या फळांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. परंतु हवाबंद डब्यातून त्या फलान्नांची निर्यात करुन विदेश विनिमय मिळविण्यात तैवानने आघाडी मिळविली. प्रश्न केवळ उत्पादनाचा नाही. तो उत्पादकतेचाही आहे. हार्वर्ड बिझनेस स्कूलचे मायकेल इ. पोर्टर[9] यांच्या शब्दात राष्ट्रीय स्पर्धात्मक लाभाचे रहस्य उत्पादकतेत (वापरलेल्या भांडवल व श्रमाच्या ठराविक एककाने उत्पादित वस्तूच्या मूल्यात दिलेले योगदान) आहे. तेथे श्रमाचे वैश्वीकरणाकडून प्रमाणीकरणाकडे संक्रमण होत आहे. आणि येथे श्रमाच्या तथाकथित व आज कालबाह्य ठरणाऱ्या सुलभीकरणाला आम्ही घट्ट चिकटून आहोत. नवीन काही शिकायचे नाही व जुने काही विसरायाचे नाही, अशी बूर्बाँ ( Bourbon) सारखी आमची अवस्था झाली आहे.

रोजगारक्षमता सुरक्षा (एम्प्लॉएबिलिटी सेक्युरिटी) ही सरकारच्या गुणवत्तेची एक प्रारंभिक अट आहे. आपल्या विचाराधीन चार देशात त्या सुरक्षेचा जास्तीत जास्त वापर होत असताना आम्ही मात्र लोकानुरंजन म्हणून रोजगार हमीच्या पलीकडे फार दूरवर जात नाही. याचा अर्थ असा नव्हे की, रोजगारक्षमता सुरक्षेच्या दिशेने योग्य पाऊले टाकली म्हणजे सर्व काही सिद्ध झाले. त्यासाठी अवध्या जनसत्तेची अपेक्षित साथ हवी. म्हणून सरकारने सर्व आर्थिक आघाड्यांवर (महसुली खर्चात कपात करून राजकोषीय समतोल सिद्ध करणे, साधनसंपत्ती संघटित करून ती कामी लावणे, राजकोषीय तूट कमी करत असतानाच वारंवार व मनमानी प्रबंधित किमतींचा आसरा करण्याचे टाळणे, कामगार कायदे, औद्योगिक विनियमने, नैसर्गिक अर्थाने रिकार्डो यांच्या तौलनिक परिव्यय सिद्धान्ताच्या जागी आवश्यकतेनुसार मायकेल इ. पोर्टर यांच्या राष्ट्रीय स्पर्धात्मक लाभ सिद्धान्ताचा औद्योगिक क्षेत्रात वापर करणे, इत्यादी) अग्रभागी राहून लोकांचे नेतृत्व करायचे असते. त्याने केवळ व्यापार व प्रशुल्क (ट्रेड अँन्ड टॅरिफ) यांच्याबाबतीत कधी उदार तर कधी निर्बंधक धोरणापुरते जुजबी बदल करणारा मुनीम राहून चालणार नाही.

उत्पन्न–पोषण समसूल्यनाविषयीच्या विश्लेषणाच्या आधारे तक्ता 4 चा संक्षेपात विचार करू. त्यापूर्वी ( अपेक्षित ) आयुर्मर्यादा या संकल्पनेचा नेमका अर्थ पाहणे जरुर आहे. (अपेक्षित) आयुर्मर्यादेची जागतिक बँकेच्या अहवालात ( 1990 ) दिलेली व्याख्या पुढीलप्रमाणे आहे : " नवीन बालकाच्या जन्माच्या वेळची मृत्यू दराची सर्वसाधारण परिस्थिती त्या बालकाच्या संपूर्ण आयुष्यात टिकून राहील असे गृहीत धरून त्या बालकाची आयुष्याची वर्षे.' ही व्याख्या बँकेच्या पूर्वीच्या अहवालातही, एक–दोन किरकोळ बदल करून, देण्यात आली आहे.

कोरियाचा 1983–86 काळाचा अपवाद सोडला तर तीन उद्योगीकरणाकडे झेपावणाऱ्या देशातील ही ( अपेक्षित ) आयुर्मर्यादा 1983–88 या काळात नेहमीच 70 किंवा त्याच्या वर राहिली आहे. परंतु भारतातील आयुर्मर्यादा फार मंद गतीने वाढली. ती जलद गतीने वाढविण्यासाठी सध्याचा सरकारी खर्चाचा आकृतिबंध बदलून नवीन प्राधान्यक्रमाची मांडणी करावी लागेल. शिक्षण, आरोग्यरक्षण व प्रशिक्षण यांच्यात सुधारणा होईल अशा हेतूने उपरोक्त देशांनी वारंवार सुधारणा केली. आज उत्पन्न हा आयुर्मर्यादा उंचावण्यातील महत्त्वाचा अडसर असू शकत नाही. जपान व जर्मनीच्या तुलनेने दर डोई वास्तव उत्पन्न अत्यल्प असूनही उपरोक्त देशांतील आयुर्मर्यादा जपान व जर्मनीशी जवळजवळ बरोबरी करण्याइतपत वाढली आहे.

## साक्षरता, संख्यांकन व आर्थिक वृद्धी

साक्षरता हा तिसरा व अखेरचा मूलभूत आर्थिक निर्देशक आहे. अलीकडील काळात शिक्षणाच्या आर्थिक वृद्धीच्या संबंधातील परताव्यांविषयी काही अभ्यास झाले आहेत. विशेषत: उत्पादन व उत्पादकता यांच्याशी

असणारा शिक्षणाचा धन सहसंबंध हा संशोधनाचा एक खास विषय आहे. या संदर्भात आफ्रिका, आशिया व लॅटिन अमेरिकेतील 58 देशांचा नुकताच अभ्यास करण्यात आला. अभ्यासासाठी 1960–85 हा कालखंड निवडण्यात आला होता. त्यात असे आढळून आले की, शिक्षणाची सरासरी वर्षे व स्थूल राष्ट्रीय उत्पन्न यांच्यातील सहसंबंध नेहमीच धन होता. विशेषतः काही देशांच्या बाबतीत असे आढळले की, शिक्षणाच्या सरासरी वर्षात 1 वर्षाने वाढ केल्यामुळे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात 3 टक्क्यांनी वाढ झाली.[10] या वाढीस कारणीभूत ठरणाऱ्या शिक्षणाच्या स्वरूपाविषयी एक–दोन गोष्टींचा खुलासा करणे जरूर आहे. एक, आर्थिक वृद्धीस कारणीभूत ठरणारे शिक्षण हे प्रामुख्याने व्यक्तीच्या ठिकाणी व्यवसायकौशल्ये निर्माण करणारे शिक्षण आहे. दोन, व्यवसायकौशल्य सिद्ध करण्यासाठी प्रयोजनलक्षी ( फंक्शनल ) साक्षरता व संख्यांकन (न्युमरसी) अनिवार्य ठरतात. विशेषतः ही साक्षरता सिद्ध करण्यासाठी किमान चार वर्षांचा कालावधी आवश्यक असतो. याविषयी अधिक स्पष्टीकरण करण्यासाठी हार्वर्ड बिझनेस रिव्ह्यूच्या संपादिका नान स्टोन यांच्या नुकताच प्रसिद्ध झालेल्या विचारप्रवर्तक लेखाचा संदर्भ देण्याचा मोह अनावर होतो. त्यांच्या लेखाचा सार असा :

> सध्याच्या स्पर्धात्मक जगात अमेरिकेतील उद्योगव्यवसायांची संपन्नता टिकायची व वाढायची असेल तर शाळा–महाविद्यालयांनी सुशिक्षित, स्वयंअनुशासित व कार्यप्रेरित तरूण पदवीधर निरंतरपणे तयार केले पाहिजेत. केवळ वाचन, गणित व संज्ञापन ( कम्युनिकेशन ) ही मूलभूत कौशल्ये प्राप्त झालेली व्यक्ती तिचा कार्यभाग परिणामकारकपणे पार पाडू शकत नाही. आज अमेरिकेत जवळजवळ 20 ते 30 टक्के कामगार मूलभूत कौशल्यात कमी पडतात. त्यामुळे कौशल्य तफावत ( स्किल गॅप ) निर्माण होते. याचा नक्त परिणाम म्हणजे, मालक व कामगार यांच्यात तुष्टीकरणाचा करार ( कॉन्ट्रॅक्ट ऑफ कॉम्प्लासन्सी ) अटळ ठरतो. कामगार व्यवसायकौशल्याचे प्रशिक्षण घेण्याची टाळाटाळ करतात. शाळा एके शाळा व काम एके काम अशी शाळा व उद्योगव्यवसाय यांची फारकत होते. हे योग्य नव्हे. म्हणून शिक्षण ही व्यवसायाची समस्या व व्यवसाय ही शिक्षणाची समस्या असायला हवी. आणि ते अटळ ठरत आहे. सांकेतिक अर्थाने शिक्षणाने तथ्ये (फॅक्टस) व आधारसामग्री (डाटा) यांचे पाठांतरपूर्वक स्मरण करणे शक्य होते. परंतु त्या तथ्यांचे व आधारसामग्रीचे माहितीत रूपांतरण करण्यासाठी व्यवसायकौशल्य अनिवार्य असते. आतापर्यंत व्यक्तीची पारख तिच्या बुध्यांकानुसार (इन्टेलिजन्स कोशंट) होत होती. येथून पुढील स्पर्धात्मक जगात व्यक्तीच्या कामाचे निर्धारण तिच्या ज्ञानार्जन गुणांकानुसार (लर्निंग कोशंट) करावे लागणार आहे.[11]

तक्ता 5 स्पष्ट करतो त्याप्रमाणे उद्योगीकरणाकडे झेपावणाऱ्या देशांतील साक्षरतेत लक्षणीय वाढ झाली. विशेषतः 1970 नंतर तैवान, कोरिया व हाँगकाँग या देशांच्या सरकारांनी प्राथमिक शिक्षणावर तुलनेने अधिकांश खर्च केला. त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नातील त्या खर्चाचे प्रमाण त्यांनी प्रागतिकपणे वाढविले. आणि विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे त्यावेळीच तेथील गळतीचे गुणोत्तर कमीत कमी म्हणजे 1 ते 9 टक्क्यांत मर्यादित ठेवले. भारतात 1969 मध्ये ते 69 होते. 1970 नंतर सिंगापूरने साक्षरतेत मोठी मुसंडी मारली. भारतात ते जमले नाही.

प्रयोजनलक्ष्य साक्षरता, संख्यांकन व आर्थिक वृद्धी यांच्यातील सहसंबंधाचा विचार करताना आणखी एका गोष्टीचा निर्देश करणे जरूर आहे. त्याशिवाय त्या सहसंबंधाचे विवेचन परिपूर्ण होत नाही. साक्षरता व संख्यांकन यांच्या माध्यमातून व्यक्ती तिच्या कामात कुशल व समर्थ बनते. ती जागरूक व जाणकार बनते. परंतु त्याला एक अपवाद आहे. 'साक्षरतेच्या पलीकडे' (बियॉन्ड लिटरसी) या संपादकीयात इकनॉमिक अॅन्ड पोलिटिकल विकलीचे संपादक प. बंगालमधील राष्ट्रीय साक्षरता प्रसारकार्याचा दाखला देऊन साक्षरतेच्या पलीकडील अक्षर विशद करताना म्हणतात ( मुक्त अनुवाद ) :

मार्गारेट थॅचर यांच्या ब्रिटिश सरकारने केला आहे. थॅचर सरकारच्यादृष्टीने खाजगीकरणाचे दोन फायदे आहेत त्यामुळे एक तर उत्पादनक्षमतेत वाढ होईल आणि दुसरे म्हणजे उपभोक्त्यांना अधिक लाभ होईल. इटलीच्या सरकारने आपल्या आय. आर. आय. ह्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाला येणाऱ्या कोटयवधी डॉलरचा तोटा भरून काढण्याकरिता त्या उपक्रमाचे भांडवल जनतेला विकले. फ्रान्स सरकार नोव्हेंबर 1986 मध्ये खाजगीकरणाकडे झुकले. तुर्कस्तान व कॅनडा ह्या देशांनीसुद्धा आपल्या परीने खाजगीकरणाचा अनुनय केला.

साधारणतः 1985 पासून न्यून विकसित आशियाई देशांमध्येसुद्धा विचारमंथन होऊन आर्थिक साहाय्य घेऊन खाजगीकरण वाढविण्याच्याबाबतीत उत्साह दिसून आला आहे. काही अपवाद वगळता, बहुतेक विकसनशील देशात भांडवलाची कमतरता हा खाजगीकरणाच्या मार्गातील मोठा अडसर असल्याचे आढळते. दक्षिण-पूर्व आशियातील देशांमध्ये आधुनिक वित्तीय संस्थांचा विकास करून अर्थपुरवठा केल्यामुळे खाजगीकरणाला उत्तम प्रतिसाद मिळाला. मलेशियाला खाजगीकरणामध्ये विशेष रुची आहे. मलेशिया सरकारने आपल्या ताब्यात असलेले मूलभूत उद्योग ( संबंधित उपक्रमांचे 50 टक्के भांडवल ) खाजगी कंपन्यांच्या ताब्यात दिले विशेष म्हणजे सरकारने आपल्या राष्ट्रीय वायुदलाच्या देखभालीची (मेन्टेनन्स) व्यवस्था खाजगी क्षेत्राकडे सोपविली आहे. थायलंडने दूरध्वनी व्यवस्था, रस्ते, रेल्वे इत्यादी क्षेत्रांमध्ये खाजगीकरण केले खरे पण त्यात या देशाला अपेक्षेप्रमाणे लाभ झाला नाही. दक्षिण-पूर्व आशियातील इतर देशांच्या तुलनेत थायलन्डचे दरडोई उत्पन्न कमी आहे आणि उत्पन्नातील विषमता शहरी व ग्रामीण दोन्ही क्षेत्रात प्रकर्षाने आढळते.

बांगला देश सरकारने 1980 पासून ताग गिरण्या चालविण्याचा अधिकार खाजगी उद्योजकांना दिला आहे. बांगला देशाने ज्या 400 सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण केले आहे त्यात वृत्तपत्र, मत्स्य, रसायने व खाद्यपदार्थ प्रक्रिया, अभियांत्रिकी इत्यादी उद्योगांचा समावेश आहे. सहा राष्ट्रियीकृत अधिकोषांना खाजगी क्षेत्रात आणण्यात आले. 1970 सालापासून हे सर्व उपक्रम तोटयात चालत राहिल्याने बांगला देश सरकारला मोठ्या प्रमाणावर आर्थिक तोशिस सहन करावी लागत होती. निर्वाणीचा उपाय म्हणून ते सरकार खाजगीकरणाकडे वळले.

चिली व लॅटिन अमेरिकेतील इतर देशांनी संरक्षण विभागसुद्धा खाजगी क्षेत्रात आणला आहे. या क्षेत्रात त्यांना यश मिळाले आहे. मेक्सिको, अर्जेंटिना व जमेका या देशांनी खाजगीकरण यशस्वी केले आहे. मेक्सिकोचे राष्ट्रपती डे. ला. मेहुरिड (1987) यांनी 118 सरकारी कंपन्यांचे खाजगीकरण केले. त्यात प्रमुख हॉटेले आणि स्वयंचलित उद्योगांचा समावेश होता. 1986 पर्यंत मेक्सिको सरकारवर सार्वजनिक कर्जाचा बोजा बराच वाढलेला होता, म्हणून खाजगीकरणाचे पाऊल उचलले गेले. अर्जेंटिनामध्ये खाजगीकरणाची सुरुवात अलीकडेच झाली आहे. संयुक्त भांडवली उपक्रम वगळता इतर उपक्रमांचा विकास खाजगी क्षेत्रातच करण्याचा सरकारचा मानस आहे. होन्डुरास व जमेका या राष्ट्रांनी जुने उद्योग व सेवा क्षेत्रात खाजगीकरण केले आहे. या देशांनी ' डाइव्हेस्टिचर अॅन्ड लीजिंग अरेंजमेंट ' ही पद्धत वापरली आहे.

आफ्रिकी देशांमध्ये खाजगीकरणाची प्रक्रिया अतिशय मंद गतीने सुरू आहे. भांडवलाची कमतरता हे त्याचे प्रमुख कारण आहे. या देशांतील सरकारांना खाजगीकरणाच्या प्रक्रियेची पुरेशी जाण नाही तसेच ही प्रक्रिया अनुसरण्याला अजून त्यांना संकोच वाटतो. सहारा, नैरोबी आणि हरारे वगळता इतर कोणत्याही आफ्रिकी देशात खाजगीकरणाचा विचार परिणामकारकपणे रुजलेला दिसत नाही. त्या ठिकाणी वीज पुरवठा व पाणी पुरवठा अशा उपक्रमांचे खाजगीकरण करण्यात आले. लोकांची या सेवांची वाढती मागणी वेगाने पूर्ण करण्याकरिता हे प्रयोग केले गेले. पश्चिम आफ्रिकेतील टोगो या देशाने खाजगीकरणाच्या दिशेने काही पाऊले टाकली आहेत. सैन्याचे प्रशासन असलेला हा देश अतिशय गरीब आहे. जगात सर्वात गरीब म्हटला तरी चालेल. या देशात शेअर बाजार नाही. सरकारी उपक्रमांचे व्यवहार सरकारी सूत्रांद्वारे चालतात. सरकारने 58 सार्वजनिक उद्योग विकायला काढले असून लोखंड-पोलाद उद्योगाचे खाजगीकरण करण्याचा प्रयत्न चालू आहे.

संघटित श्रमिकांच्या संदर्भात खाजगीकरणाचा अर्थ रोजगारामध्ये आणि एकदर गुंतवणुकीत घट होणे असा मानला जातो. ( एल. ग्रे. कोवान, पृ. 7, परिच्छेद 1,16 ) या संबंधातील निबंधात युरोप, लॅटिन अमेरिका, आशिया व आफ्रिका खंडातील काही देशांची चर्चा केली आहे. या देशांमध्ये खाजगीकरणाने बरीच प्रगती केली आहे. तथापि, काही अनुभव त्यांच्यादृष्टीने निराशाजनक ठरले. कारण, खाजगी क्षेत्रात आणलेल्या कंपन्यांना ( उदाहरणार्थ, गृहनिर्माण उद्योग, दुग्ध व्यवसाय, लोखंड व पोलाद उद्योग इत्यादी ) समाधानकारक वाटचाल करता आली नाही. भांडवलाची कमतरता, श्रमिकांची अकार्यकुशलता, खाजगीकरणाच्या प्रक्रियेबद्दल अज्ञान इत्यादी कारणांमुळे या कंपन्या ठेचकाळत राहिल्या इथे खाजगीकरण अयशस्वी ठरले. वस्तुतः जर सरकारी उद्योगांना आधुनिक पद्धतीने विकसित केले तर उपभोक्त्यांच्या दृष्टीने ते अधिक उपयोगी ठरेल व सरकारवर वित्तीय दबाव पडणार नाही. देशाचा सर्वांगीण विकास होण्यास यातून मदत होईल.

जपान आणि दक्षिण-पूर्व आशियातील चार प्रमुख देशांनी ( हाँगकाँग, सिंगापूर, दक्षिण कोरिया व तैवान ) आश्चर्यजनक पद्धतीने औद्योगिक प्रगती साधली व त्यातून आर्थिक विकास तीव्र वेगाने झाला. अशी प्रगती इतर देशांमध्ये आतापर्यंत झालेली नाही. या देशांची प्रगती बघून इतर न्यून विकसित देशांनी आपापल्या देशात आमूलाग्र बदल करण्याचे प्रयत्न नव्याने सुरू केले.[7] चीन व रशियातसुद्धा पुनर्निर्माणाची (पेरेस्त्रोइका) लाट आली. पूर्णपणे समाजवादी पद्धतीने चालणाऱ्या या देशांमध्येही शेती, व्यापार, उद्योग, दळणवळण, संरचनात्मक सोई इत्यादी बाबी खाजगी उद्योजकांकडे सोपविण्यात आल्या. खाद्य पदार्थांचे उत्पादन व वितरणसुद्धा खाजगी क्षेत्राच्या अखत्यारीत आले. कारण, या वस्तूंचा मोठ्या प्रमाणात तुटवडा वरील दोन्ही देशात होता. गुंतवणूक अधिकाधिक वाढवून विकास करण्याची पद्धती उपरोल्लेखित सर्वच देशांनी अमलात आणली. त्यात कोरिया व तैवान आघाडीवर होते. दक्षिण आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील देशांमध्ये रस्ते बांधणी, गृहनिर्माण, दूरध्वनी व्यवस्था, लहान-मोठे उद्योग इत्यादी क्षेत्रात खाजगीकरणामुळे समाधानकारक परिवर्तन झालेले दिसून येते.

भविष्यातदेखील खाजगी उद्योगांना भरपूर वाव देण्याचे या राष्ट्रांचे धोरण आहे. या देशांमध्ये खाजगीकरणाचा अनुभव चांगला येतो आहे याची दोन प्रमुख कारणे सांगता येतील. (1) खाजगीकरणाला जास्तीत जास्त वाव देणे आणि (2) अर्थव्यवस्थेत स्पर्धा वाढविणे व विदेशी गुंतवणुकीकरिता बाजार खुला करणे, असा आर्थिक धोरणाचा ढाचा या देशांनी स्वीकारला आहे.

खाजगीकरणाचा अनुनय करण्यासाठी प्रमुख चार तत्त्वे महत्त्वाची आहेत. पहिली गोष्ट म्हणजे, अविकसित देशांमध्ये खाजगीकरणाला जेव्हा प्रतिसाद मिळतो तेव्हा तेथील राजकीय व आर्थिक विकासाची प्रक्रिया पुनर्स्थापित केली जाते. दुसरे तत्त्व म्हणजे, खाजगीकरण सुरू करणे ही सोपी प्रक्रिया नाही. कारण, काही संयोजकांची आर्थिक व वित्तीय बाजू बळकट नसल्यास ते गुंतवणूकदारांना आकर्षित करू शकत नाहीत. शिवाय, विदेशी गुंतवणूकदारांच्या वर्चस्वाची भीती सरकारला असते. तिसरे, खाजगीकरण करताना सर्व परिस्थितीत लागू पडणारे आदर्श मांडता येत नाहीत. चौथे, ज्या देशांचा वित्तीय आधार बळकट आहे (म्हणजे, मॅक्फरसनच्या मते प्राथमिक गुंतवणूक अधिक प्रमाणावर करता येते) तिथेच खाजगीकरण शक्य होऊ शकते (एम. पीटर मॅक्फरसन, पृ. 19, परिच्छेद 2.31). सरकारद्वारे सरकारी उद्योगांचे समभाग खाजगी उपक्रमांना विकण्याची प्रक्रिया हीच खाजगीकरणाची वैश्विक व्याख्या आहे ही व्याख्या अधिक उपयुक्त ठरते. कारण, मालकी हक्क पूर्णपणे खाजगी उपक्रमांना मिळणे म्हणजे अराष्ट्रीयीकरण होय. असे पाऊल उचलण्याला देशातील प्रतिकूल परिस्थिती कारणीभूत ठरते. केंद्र किंवा राज्य सरकारांना त्यांचे अंगीकृत आर्थिक उपक्रम चालविणे अशक्य होऊन निर्धारित उद्दिष्टे गाठणे दुरापास्त होते. उदाहरणार्थ, कच्चा माल वेळेवर न पोहोचणे, कर्मचारी वर्गाची उदासीनता, वस्तूंचा दर्जा न सुधारणे इत्यादी प्रतिकूलता सरकारला बेजार करतात. त्यामुळे शेवटचा उपाय म्हणून त्या देशातील सरकार अशा न चालणाऱ्या, नफा न देणाऱ्या व आजारी सार्वजनिक उपक्रमांना पूर्णतया खाजगी क्षेत्राकडे सोपविते. हेच अराष्ट्रीयीकरण (डिनॅशनलायझेशन) होय. उपक्रम किफायतशीरपणे चालविण्यास सरकार असमर्थ ठरल्यामुळेच असा निर्णय केला जातो. याउलट, खाजगीकरणामागे सरकारच्या असमर्थते-

बरोबरच देशातील आर्थिक विकास तीव्र करणे, गुंतवणूक वाढविणे, न्यून विकसित क्षेत्रांचा विकास साधणे ही उद्दिष्टेही एकत्र आलेली असतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, खाजगीकरण आणि अराष्ट्रीयीकरण या दोन संज्ञांमध्ये फारसा फरक आहे असे समजले जात नाही. अनेक लेखकांनी (उदाहरणार्थ, मोहम्मद कासीम अहमद, "खाजगीकरणाची शक्यता", **इंडियन जर्नल ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन,** जानेवारी 1990, खंड 36, अंक 1, पृ. 66 आणि जी. स्टोन, **डेव्हलपमेंट इकनॉमिक्स,** आय. एम. एफ सर्व्हे, एप्रिल 1991, पृ. 2). या दोन्ही संज्ञांना समानार्थी समजले आहे. ही चर्चा प्रस्तुत पुस्तकात कुठेही मांडली गेलेली नाही.

सरकारला खाजगीकरणाच्या आधारावर मुक्त व्यापार नीती अनुसरणे शक्य आहे. अनेकदा राजनैतिक स्तरावर सरकार असे आश्वासनसुद्धा देते की, खाजगी उपक्रम वाढल्यास अर्थव्यवस्थेची परिस्थिती निश्चित सुधारेल, पण प्रत्यक्षात मात्र तसे घडत नसते; प्रत्येक क्षेत्रात तर नाहीच नाही. ह्या दृष्टिकोनातून कोणत्याही निबंधात स्पष्टीकरण केले गेलेले नाही.

सार्वजनिक उपक्रमांनी हाती घेतलेले मोठे कार्यक्रम आणि स्पर्धायुक्त बाजारातील पूर्वी स्थापित झालेल्या परिस्थितीमुळे भांडवलशाही व काही मिश्र अर्थव्यवस्था ( मेक्सिको, ब्राझिल, अर्जेंटिना, चिली, पेरू ) सरकारी उद्योगांच्या चौकटीतून मुक्त झाल्या, तर काही देशांना उदार आर्थिक नीतीवर ( दक्षिण–पूर्व आशियाई देश : सिंगापूर, मलेशिया, फिलिपिन्स ) अवलंबून राहावे लागेल. दक्षिण आशियाई देशांना ( 'सार्क' देश ) आर्थिक व राजकीय क्षेत्रात जे काही अनुभव आलेले आहेत त्यामुळे ते देश स्वतःची आर्थिक नीती खाजगीकरणाच्या दिशेने बदलण्याच्या मनःस्थितीत आहेत. एल. कोवान आणि एम पी. मॅकफरसन यांनी वरील मुद्यांचा त्यांच्या लेखात मुळीच विचार केलेला नाही.

खाजगीकरणाच्या काही समस्या औलाट ब्रेग ( पृ. 26 ) यांनी आपल्या निबंधात मांडल्या आहेत. औद्योगिक देशांमध्ये खाजगीकरण गतिशील व्यवस्थापनाच्या शोधात आहे, तर न्यून विकसित देशांमध्ये खाजगीकरणाला महत्त्व दिले जात नाही. अनेकदा खाजगी उपक्रमामुळे एका बाजूने एकाधिकार निर्माण होण्याची शक्यता असते तर दुसऱ्या बाजूने नफा न मिळण्याची भीतीही असते. शिवाय राजनैतिक ( डिप्लोमॅटिक ) जोखिमही असते. खाजगीकरणाच्या खऱ्या समस्या बेकारीत वाढ, भ्रष्टाचार, भांडवलाची कमतरता, तोटा इत्यादी आहेत. खाजगीकरण करताना अनेक राजनैतिक अडथळे येतात. त्यामुळे खाजगीकरणाबद्दल गैरसमजुती निर्माण होतात ( रॉबर्ट पोले, पृ. 33, परिच्छेद, 2.31 ). औद्योगिक देशांनी व्यापार, कृषी, संरचनात्मक सोई इत्यादी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण केले आहे. राजनैतिक अस्थिरतेमुळे ( औद्योगिक नीतीमध्ये परिवर्तन, सरकार अस्थिर असणे, नियोजनाचा निश्चित आराखडा नसणे, विदेशी व्यापार नीतीमध्ये बदल वगैरे ) देशात अनेक अडथळे निर्माण होतात. साधारणपणे सरकार ( राज्य किंवा केंद्र ) एखादा उपक्रम पूर्णतया आपल्या ताब्यात घेते किंवा आजारी व्यवसायसंस्थांना संरक्षण देत असते. परंतु जेव्हा सरकारी उपक्रम खाजगी क्षेत्राकडे काही काळाकरिता ( सुमारे 1 ते 5 वर्षे ) पट्ट्याने (लीज) सोपविले जातात तेव्हा अशी कृती खाजगीकरणाची मानली जाते. तरीदेखील त्या खाजगीकृत उपक्रमांच्या एकूण रचनेत काही विशेष सुधारणा होत नाही असा अनुभव आहे. पट्टा पद्धतीने केलेले हस्तांतरण म्हणजे एका दृष्टीने मागच्या दाराने केलेले खाजगीकरणच असते. ( बॅक डोअर प्रायव्हेटायझेशन ). हा प्रकार हॉटेल, रुग्णालय वगैरे क्षेत्रांमध्ये बघायला मिळतो, (मादागास्कर, पृ. 28).

दक्षिण–पूर्व आशियातील ( विशेषतः सिंगापूर) देशांचा विकास स्थिर आणि प्रगतीशील सरकारद्वारे झाला. त्यामुळे ते देश आर्थिक व सामाजिकदृष्टया मजबूत बनले. असे असूनही त्यांच्या पुनर्निर्माणाच्या योजनेत ( सिंगापूर, 1979 ) अनेक त्रुटी राहिल्या. उदाहरणार्थ, फक्त भांडवली क्षेत्रामध्ये उत्पन्न वाढले. एकूण उत्पन्नाचे वाटप विषम होते. महत्त्वाचे म्हणजे, या देशांनी हळूहळू विदेशी कंपन्यांच्या साहाय्याने त्यांच्या इतर क्षेत्रांचासुद्धा विकास घडवून आणला. याउलट; स्थिर सरकारच्या अभावी दक्षिण आशियातील देश पुनर्निर्माणाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात कार्यान्वित करू शकले नाही.

खाजगी संपत्तीच्या अधिकाराच्या दृष्टिकोनातून सैद्धांतिकदृष्टचा पाहिले तर जे खाजगी उपक्रम खाजगी संपत्तीच्या अधिकारावर आधारलेले आहेत ते सार्वजनिक उपक्रमापेक्षा अधिक क्षमतेचे असतात. ( स्टेव. एच. हॅंके, पृ. 48, परिच्छेद 2.16). मॅन्युअर टर्नेरियो यानी इंग्लंड, अमेरिका व युरोपमधील देशांच्या संदर्भात खाजगीकरण आणि राजकीय तत्त्वे (पोलिटिकल एलिमेन्टस्) यांचा संबंध दाखविला आहे. खाजगीकरणाच्या विकासाची प्रत्येक देशात वेगवेगळी परिस्थिती आहे. खाजगीकरण यशस्वी करण्यासाठी भविष्याचा विचार ( दीर्घकाळात निर्माण होणाऱ्या अडचणींची दखल व त्याचे निराकरण करण्यासाठीच्या योजना ) करणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक परिस्थितीमध्ये आणि प्रत्येक देशामध्ये खाजगीकरण नेहमीच यशस्वी ठरेल असे नाही. ते यशस्वी होण्यासाठी देशातील लोकांचा सहभाग, प्रामाणिकपणा आणि उत्साह या गोष्टीही महत्त्वाच्या आहेत. (टर्नेरियो, पृ. 55, परिच्छेद 2.35).

भांडवलशाही अर्थव्यवस्थांमध्ये खाजगीकरण रुजलें खरे. परंतु कालांतराने तिथेही काही समस्या उद्‌भवल्याच. चलनफुगवटा, उत्पादनातील चढउतार, भांडवलगुंतवणुकीतील अविवेकीपणा, कर्जभारात वाढ, मंदीयुक्त भावफुगवटा अशा अनेक अडचणी उभ्या राहिल्या. प्रस्तुत ग्रंथात या अडचणींचा स्पष्ट उल्लेख कुठेच नाही.

खाजगीकरणाकरिता विशेष नियोजनाची आवश्यकता प्रतिपादन केलेली आहे. हे नियोजन संस्थानिहाय विकास, उद्दिष्टांची निवड, नीती निर्धारण, हस्तांतरणाची प्रक्रिया आणि अंतिम निष्कर्ष काढणे यांच्याशी निगडीत असून त्यासंबंधीची 14 तत्त्वे सांगितलेली आहेत. त्यामध्ये नीती निर्धारण, खाजगीकरण करण्याच्या पद्धती, त्या पद्धतींमध्ये होणारे बदल, पुनर्तपासणी क्रिया, उद्‌भवणाऱ्या अडचणी व त्यावर उपाय ही प्रमुख तत्त्वे आहेत ( के. मरस्टोन, पृ. 68–69). खाजगीकरणासंबंधी निर्णय कसे घ्यायचे याची चर्चा या अनुषंगाने केलेली आहे ( पृ. 75 ). खाजगी उद्योगांमध्ये स्पर्धा राहील का ? जर उत्तर होकारार्थी असेल तर, कमीतकमी खर्चात अधिक कार्यदक्षतेने ते कार्य करु शकतील का ? याचे उत्तरही होकारार्थी असल्यास खाजगीकरणासंबंधी निर्णय निश्चित करायला हरकत नाही. अनेक उपक्रमांनी [ वायू, वाहतूक व अधिकोषण व्यवस्था (ऑस्ट्रेलिया), प्रशासकीय संस्था, वीजव्यवस्था, अग्निशामक व्यवस्था, वनसंरक्षण ( अमेरिका ), महामार्ग व रस्ते निर्माण ( ब्राझिल ) ] सिद्ध केले आहे की, खाजगीकरण केल्याने त्यांची क्षमता वाढू शकली. लेखकाच्या मते, कमीत कमी संसाधने वापरून जर अधिक गुणवत्ता व संख्या मिळविता येत असेल तरच खाजगी कंपन्या सुरु करण्यात अर्थ आहे. अमेरिकेच्या उदाहरणावरून असे लक्षात येते की, तिथे अनिश्चितता ( उद्योगात येणारे धोके–तोटा, नफा, व्यापारचक्र वगैरे ) हा एक खाजगीकरणाचा महत्त्वा घटक आहे ( स्टेव एच. हॅंके, पृ. 81, परिच्छेद 4.16 ).

खाजगीकरणाची कायद्यातील तत्त्वे व्यापक आहेत, आणि बऱ्याच विधिसिद्ध संस्थांशी त्यांचा संबंध आहे ( पीटर थॉमस, पृ. 88, परिच्छेद 4.2 ) एकाधिकार स्थापित होऊ नये याकरितासुद्धा सरकारने उपाय शोधायला हवा. शिवाय खाजगीकरणाची प्रक्रिया तीव्र करताना दोन तत्त्वे महत्त्वाची आहेत : (1) संपत्तीचे समान वाटप व्हायला हवे आणि (2) श्रमिकांची कार्यक्षमता वाढविता आली पाहिजे. बाजारव्यवस्था व खाजगीकरण यांचे अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. (टेड एम.ओहोशी,पृ.105, परिच्छेद 3.17). बाजारव्यवस्था जर खालावलेली असेल तर उत्कृष्ट उपक्रमांचेदेखील खाजगीकरण करता येत नाही. याउलट, बाजारव्यवस्था चांगली असतानाही मागासलेल्या व निकृष्ट उपक्रमांचा काहीच उपयोग होणार नाही. यास्तव लेखकांनी काही निकष सुचविले आहेत. अर्धविकसित देशांच्या बाजारव्यवस्थेबद्दल त्यात उल्लेख आहे.

मूल्यांकन, बाजारव्यवस्था व विक्री व्यवस्था या विकसनशील देशांच्या विकासाकरिता महत्त्वपूर्ण बाबी आहेत. (पी. पी. कुझेंस्की, पृ. 112, परिच्छेद 6.2). या तीन समस्या खाजगीकरणाच्या प्रक्रियेत उद्‌भवतात. या उपक्रमांसाठीची कर्जव्यवस्था, कर्ज–भागभांडवल गुणोत्तर ( डेट–एक्विटी रेशो ) आणि अर्थसंकल्पीय अडचणी यांच्या बाबतीत विकसनशील देशांना विशेष दक्षता घ्यावी लागते. (आर. के. कास्टिलो, पृ. 123, परिच्छेद 1.22 ). न्यूनविकसित देशांमध्ये शेअर

कोणताही उद्योजक जोखीम पत्करून खाजगी उपक्रम सुरू करतो. त्यात अनिश्चिततेला तोंड द्यावेच लागते. (स्टेव. एच. हँके, पृ. 127, परिच्छेद 3.19). अनिश्चितता निर्माण होण्याची कारणे वेगवेगळी आहेत. त्यापैकी गतिशील अर्थव्यवस्था हे एक प्रमुख कारण आहे. याची चर्चा हँकेनी करायला हवी होती. तसेच टेड. एम. ओहोशी यांनी मांडलेल्या विचारांच्या पुष्टयर्थ असे म्हणता येईल की, जर कमकुवत उपक्रमांचा विकास चांगल्या बाजारव्यवस्थेकरिता करायचा असेल तर रोझेन्स्टिन रोदान यांनी सांगितलेल्या मोठ्या धक्क्याचा ( बिग पुश ) सिद्धान्त त्यासाठी उपयोगी पडेल.

सार्वजनिक क्षेत्राला खाजगीकरण वेगवेगळ्या प्रकारे उपयोगी आहे (जी. रोथा, पृ. 131, परिच्छेद 1.21). शिक्षण, आरोग्य व पाणीपुरवठा या क्षेत्रात अनेक अडचणी येतात. कारण, सरकारला कर्जाची परतफेड करावी लागते. दूरसंचार, वीज, वाहतूक या क्षेत्रांमध्ये खाजगीकरण उपयुक्त ठरेल. हा प्रकार दक्षिण–पूर्व आशियाई देश, चीन, घानामध्ये काही प्रमाणात घडून आलेला दिसतो. ज्या देशांमध्ये कृषी व कृषीवर आधारलेल्या उद्योगांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा लक्षणीय असतो तिथे खाजगी क्षेत्रावर अधिक भर देणे उपयुक्त ठरते. बांगला देश व सहारा या देशातील काही कृषीवर आधारित उद्योग खाजगी क्षेत्रातच अधिक प्रगत झालेले आहेत. अवाजवी सरकारी हस्तक्षेप जर कृषी व्यवस्थेतून काढला तर कृषी उत्पादकता अधिक वाढू शकेल. तरीही शेतकरी वर्गाला प्रोत्साहन देणे तेवढेच आवश्यक आहे ( आन मरक्यु, पृ. 146 परिच्छेद 3.21).

न्यून विकसित देशांमधील अप्रगत अधिकोषण व्यवस्था तेथील वित्तीय क्षेत्राच्या विकासाच्या आड येत असते (लॉरेन्स एच. व्हाईट, पृ. 153, परिच्छेद 2.13). अधिकोषणाचे खाजगीकरण केल्यास या न्यून विकसित देशांमध्ये व्याज दरावर नियंत्रण ठेवता येत नाही, अधिकोषण व्यवस्थेत मुक्त प्रवेश होत राहतो आणि सरकारला काही उत्पन्न गमवावे लागते. गमविलेल्या उत्पन्नाची भरपाई करण्यासाठी चलननिर्मितीकडे सरकारला वळावे लागते. लॅटिन अमेरिकेत असा प्रयोग झाला आहे. लॅटिन अमेरिकेतील प्रामुख्याने चिली देशाच्या कर्जाची परतफेडीबद्दल बरीच चर्चा झाली चिलीने कर्जाच्या परतफेडीची जबाबदारी समाधानकारक रीतीने पार पाडली (स्टेव एच. हँके, पृ. 165, परिच्छेद 2.31). लॅटिन अमेरिकेतील देशांनी खाजगीकरणाकरिता वित्त पुरवठ्याचे स्त्रोत मिळवून आपला विकास साधला आहे. पाश्चात्य देशांमध्ये खाजगीकरणाच्या प्रक्रियेत सरकार दुय्यम स्तरावर कार्य करते. परंतु न्यून विकसित देशांमध्ये सरकारला महत्त्वाची जबाबदारी स्वीकारून खाजगी क्षेत्राला मार्गदर्शन करावे लागते. आफ्रिकन व दक्षिण आशियातील न्यून विकसित देशांना हे विशेष लागू पडते. अर्थातच, प्रत्येक अर्थव्यवस्थेची खाजगी क्षेत्राकडे लक्ष देण्याची पद्धत वेगवेगळी आहे याचीही नोंद घ्यावी लागेल.

सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण करणे ही आधुनिक काळात प्रत्येक देशाची आर्थिक गरज झाली आहे. प्रथम काही देश हा प्रयोग करण्यास पुढे येतात. मात्र त्यावेळी हा मार्ग किती मर्यादेपर्यंत अनुसरायचा याबद्दल निश्चित धोरण ठरविलेले नसते. कालांतराने त्या त्या देशाने अवलंबिलेल्या विकासाच्या आकृतिबंधानुसार खाजगीकरणाच्या नेमक्या सीमारेषा ठरविल्या जातात. एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे की, केवळ फॅड म्हणून खाजगीकरण करणे अधिकांश देशांना परवडणार नाही. काही दशकांपूर्वी खाजगी उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याची लाट होती. अलीकडे हा प्रवाह उलट दिशेने वाहात आहे. इंग्लंडमध्ये मार्गारेट थॅचर यांनी सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करण्याचे धोरण राबविले. अशा बदलत्या परिस्थितीत इतर देशांचे अंधानुकरण केल्यास न्यून विकसित देशांवर काय परिणाम होतील याचा ऊहापोह यंग आणि मॅडसेन यांनी या विभागात करायला हवा होता. कारण, आफ्रिका आणि दक्षिण आशियाई देशांनी खाजगीकरण आणताना देशातील आर्थिक परिस्थितीचा (विदेशी गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद इत्यादी ) फारसा विचार केला नाही. भारताच्या संदर्भात थोडे विश्लेषण करू. खाजगीकरण केल्यामुळे देशाची प्रगती कितपत होईल ? कमी उत्पादकता व अधिक खर्च ह्या सार्वजनिक उद्योगांच्या समस्या आहेत. ह्या समस्यांना आळा बसू शकेल काय ? वास्तवात सार्वजनिक उद्योगांचे व्यवस्थापन खाजगी उद्योगांच्या व्यवस्थापनापेक्षा खालावलेले आहे. खाजगी-

करणाने व्यवस्थापनाचा दर्जा सुधारला जाईल तसेच मुक्त स्पर्धेला वाव मिळेल. अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या अंगाची कामगिरी सुधारण्यासाठी खाजगीकरणाचा मार्ग स्वीकारताना भारताने देशोदेशींचा अनुभव ध्यानात घ्यायला हवा. कोणत्या पद्धती भारतीय परिस्थितीत सोईच्या ठरतील हे जाणून घ्यायला हवे. उपक्रमनिहाय पद्धती ठरवाव्या लागतील भूतकाळात मान्य केलेल्या आर्थिक धोरणानुसार भारतीय अर्थव्यवस्थेत काही क्षेत्रात खाजगी क्षेत्राला स्वातंत्र्य दिलेले आहे. प्रश्न आहे तो याच काळात सरकारी क्षेत्रासाठी राखून ठेवलेल्या उपक्रमांचा. हे उपक्रम खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरित करायचे काय याबाबतीत निर्णय करायचा आहे. इथेही सरसकट खाजगीकरणाचा उपाय योजता येणार नाही हे स्पष्ट आहे. कोणत्या उपक्रमांचे व कोणत्या पद्धतीने हस्तांतरण करावयाचे हा महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय ठरणार आहे.

ब्रिटन, ब्रिटिश कोलंबिया, तुर्कस्तान, ग्रेनाडा इत्यादी देशांचा विशेष अभ्यास या ग्रंथात वेगवेगळ्या लेखकांनी केला आहे. या देशांमध्ये खाजगीकरणाने बरीच मजल मारली आहे. त्यांनी संरचनात्मक बदल, वित्तीय बदल, निवारा व्यवस्था, अधिकोषण व्यवस्था इत्यादी बाबतीतला विकास खाजगी क्षेत्रातून केलेला आहे. या देशांच्या या संदर्भातील समस्या व अनुभव लेखकांनी मांडलेले आहेत. त्या ध्यानात घेऊन न्यून विकसित देशही खाजगीकरणाचा अवलंब करू शकतात. फार पूर्वीपासून ब्रिटनमध्ये खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. 1970 पूर्वी त्याला अराष्ट्रीयीकरण असे नाव होते. 1970 नंतर खाजगीकरणाची प्रक्रिया जोरात सुरू झाली. अनेक जुने उद्योग, डाक-तार विभाग, वाहतूक व्यवस्था, अधिकोषण इत्यादी उपक्रम खाजगीक्षेत्राकडे सोपविण्यात आले. 1965 नंतर ब्रिटिश कोलंबियाने ही प्रक्रिया सुरू केली. ब्रिटिश कोलंबिया रिसोर्स इन्व्हेस्टमेन्ट कॉर्पोरेशन या संस्थेने सर्वेक्षण करून केलेल्या शिफारशीनुसार सरकारने मध्यम व मोठ्या उद्योगांचे खाजगीकरण केले. तुर्कस्तानात 1980 पासून ही प्रकिया सुरू झाली आणि जाणीवपूर्वक सरकारचे आर्थिक क्षेत्र कमी करण्यात आले. अधिकोषांना आणि शेअर बाजारातील मध्यस्थांना (ब्रोकर्स) मुख्य शेअर बाजारात मध्यस्थ म्हणून कार्य करण्याची सूट दिली. त्यामुळे त्यांच्या 'इस्तांबूल' नावाच्या शेअर बाजाराचे स्वरूप बदलून गेले. ग्रेनाडामध्ये 1986 नंतर खाजगीकरणाने जोर पकडला. प्रथम काही अधिकोषांचे खाजगीकरण केले. आणि नंतर हळूहळू या प्रक्रियेची व्याप्ती वाढविली.

फ्रान्स, अंगोला, कांगो हे सर्व देश आता खाजगीकरणाकडे जात आहेत. ब्रिटनच्या नवीन खाजगीकरणाच्या रचनेत वेगळाच राजनैतिक दृष्टिकोन आहे. लोकांना व्यवसायसंस्थेची विक्री वैकल्पिक हिस्सेधारक म्हणून होईल. त्यामुळे भविष्यात खाजगीकरणाला अधिक चांगला प्रतिसाद मिळून पुनर्राष्ट्रीयीकरणाला विरोध होईल. या तत्त्वांच्या आधारावर संपूर्ण जगात खाजगीकरणाला अधिक प्रतिसाद मिळू शकेल, असे प्रतिपादन केले आहे. खरे तर प्रस्तुत लेखिकेच्या मते आजतागायत कुठल्याही स्वरूपात संपूर्ण खाजगीकरण हे कोणत्याच देशाच्या आर्थिक समस्यांचे निराकरण करू शकले नाही. काही वर्षापूर्वी खाजगीकरण हा शब्द कुठेच वापरला जात नव्हता. परंतु आता मात्र हा शब्द अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांतील शब्दकोशात सर्रास वापरला जातो आहे. जेव्हा काही क्षेत्रांमध्ये विकास खुंटतो, उद्योग आजारी पडतात किंवा सरकार त्या क्षेत्रांना विकसित करू शकत नाही तेव्हा त्यांचे व्यवस्थापन खाजगी क्षेत्राकडे दिले जाते असा सर्वसामान्य अनुभव आहे.

ब्रिटनच्या अनुभवावरून दिसून येते की, खाजगीकरणामुळे आर्थिक व राजकीय फायदे मिळालेले आहेत. प्रत्यक्षात, खाजगीकरणामुळे सामान्य जनतेला भांडवल आपल्या मालकीचे करता येईल असे फार कमी आढळून येते. ब्रिटनमध्ये तर राष्ट्रीयीकरण व अराष्ट्रीयीकरणाच्या चक्राचे बरेवाईट अनुभव आलेले आहेत. मार्गारेट थॅचर यांनी खाजगीकरणाचा पाठपुरावा करताना हे चक्र मोडून जनतेचा मालकी हक्क वाढविण्यावर अधिक भर दिला मालकी हक्काचे अमूर्त रूप कमी करणे हाही त्यामागील एक उद्देश आहे.

या ग्रंथात खाजगीकरण कितपत उपयुक्त आहे याची चर्चा जशी केलेली आहे तशीच शेवटच्या विभागात ते यशस्वी करण्याचे मार्ग सुचविले आहेत. खाजगीकरणामुळे एकाधिकार फोफावत असला तरी सार्वजनिक एकाधिकारापेक्षा खाजगी एकाधिकार कमी प्रमाणात असतो असा दावा करण्यात आला आहे. (पृ. 126).

खाजगीकरणाविषयी बरीच उलटसुलट चर्चा घेऊन गेली आहे. तथापि, क्षेत्रीय असमतोलाची चर्चा मात्र कुठेच आलेली नाही. खाजगीकरणामुळे क्षेत्रीय समतोल साधता येईल का ? या प्रश्नाचे उत्तर या ग्रंथात कुठेही मिळत नाही. आर्थिक प्रगतीच्यादृष्टीने हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण, जिथे कच्चा माल व नैसर्गिक साधनसंपत्तीची विपुलता आहे तिथे खाजगी उपक्रम विकसित होणार. बऱ्याच न्यून विकसित देशांमध्ये, प्रामुख्याने जिथे क्षेत्रफळ मोठे आहे तिथे, काही ठिकाणी उद्योगांचे केन्द्रीकरण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे क्षेत्रीय असमतोल व शहरीकरण वाढेल. खाजगीकरणाच्या प्रक्रियेमध्ये हे टाळण्याची कितपत शक्यता आहे ? खाजगीकरण कोणत्याच देशाच्या सर्व आर्थिक समस्यांचे निराकरण करू शकणार नाही, असे सामान्यपणे दिसून येते. खाजगीकरणाचे दोष लक्षात घेता न्यून विकसित देशांना या पद्धतीचा पूर्णपणे वापर करणे शक्य नाही. ज्या ज्या उपक्रमांच्या माध्यमातून सरकारला जनकल्याण साधायचे आहे त्या त्या उपक्रमांत नफा कमविणे हा भाग दुय्यम असतो. लोकांना कमीत कमी खर्चात वस्तू व सेवा उपलब्ध होतील याकडे अधिक लक्ष द्यावे लागते.

वर्तमानकाळात खाजगीकरण विविध पद्धतीने केले गेले आहे. न्यून विकसित देशांमध्ये खाजगीकरणाची वाटचाल मंद आहे. सरकारची आर्थिक स्थिती सुधारण्याचा एक मार्ग म्हणून अधिकांश देश या मार्गाचा अवलंब करीत आहेत. ब्रिटिश सरकारने 1980–87 दरम्यान 40 टक्के कंपन्यांचे खाजगीकरण किंवा अर्धखाजगीकरण केले. असेच पाकिस्तान व बांगला देशामध्ये झाले. आता अशी जाणीव व्हायला लागली आहे की, खाजगी क्षेत्रामध्ये उत्पादन अधिक कौशल्याने व तीव्रतेने आणि कमी खर्चात होते; तसेच साधनसंपत्तीचा कमीत कमी अपव्यय होतो आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याची अधिक चांगल्या रीतीने जोपासना करता येते. दक्षिण-पूर्व आशियाई देशांनी तर सिद्ध करून दाखविले आहे की, खाजगीकरणामुळे नवीन तंत्रविज्ञानाचा वापर, बेकारी घटविणे व भांडवलनिर्मिती वाढविणे या गोष्टी शक्य होतात.

खाजगीकरणाची उपाययोजना ही सामाजिकीकरण किंवा राष्ट्रीयीकरणाच्या विरुद्ध दिशेने टाकलेले पाऊल होय. याचे परिणाम पाश्चिमात्य देशांमध्ये चांगले दिसून आले. या प्रक्रियेमुळे नवीन औद्योगिक देशांची (सिंगापूर, मलेशिया, फिलिपिन्स, तैवान) तर कायापालटच झालेला आहे. आपल्यासारख्या विशाल आणि विविध प्रकारच्या आर्थिक समस्या असलेल्या आणि क्षेत्रीय विषमतेने ग्रासलेल्या देशाने ही उपाययोजना आवश्यक त्या क्षेत्रात जरूर करावी. जे जे उपक्रम सांभाळणे सरकारला कठीण जाते किंवा खाजगी क्षेत्रात राहून ज्या ज्या उपक्रमांचे व्यवस्थापन व वस्तूंच्या दर्जात सुधारणा होऊ शकेल त्यांच्या बाबतीत ही प्रक्रिया जरूर अमलात आणावी. प्रत्येक देशाने आपापल्या आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीचा विचार करून कोणत्या व्यवसायसंस्थांचे खाजगीकरण करणे आवश्यक आहे हे ठरवायला पाहिजे. या प्रक्रियेचा नक्कीच चांगला परिणाम दिसून येईल.

(**टीप** : ह्या ग्रंथ परीक्षणाच्या लेखनात रवीन्द्र दोशी व श्रीनिवास खांदेवाले यांचे मार्गदर्शन लाभले, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.)

□ □

**मे. लालचंद मनसुखलाल शाह आणि कंपनी**

**'प्रशांत', एफ – 5, एम. आय. डी. सी., सातारा –** 415 004

(**दूरध्वनी : 4335, 4435**)

**उत्पादने :** ✻ 'पेंग्विन' शुद्ध व विश्वसनीय शेंगदाणा तेल

✻ 'नटराज' शुद्ध सूर्यफूल तेल

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची विज्ञानावरील प्रकाशने

| अनु. | पुस्तकाचे नांव | लेखक/अनुवादक | किंमत |
|---|---|---|---|
| (1) | रेडिओ दुरुस्ती | श्री. श्री. वि. सोहोनी | 52–00 |
| (2) | रेकॉर्ड प्लेअर | — ,, — | 11–50 |
| (3) | डिझेल इंजिन | प्रा. सुभाष सावरकर | 15–00 |
| (4) | अणुयुग | श्री. वि. त्र्यं. आठवले | 12–00 |
| (5) | पुस्तक बांधणी | श्री. वि. ना. लिमये | 18–00 |
| (6) | खनिज तेल व तज्जन्य रसायने | श्री. प. म. बर्वे | 16–00 |
| (7) | ध्वनिवर्धन आणि वितरण व्यवस्था | श्री. श्री. वि. सोहोनी | 22–00 |
| (8) | तेले व मेदे भाग–1 | डॉ. न. गं. मगर | 19–00 |
| (9) | वनश्रीसृष्टी भाग 1 व 2 | डॉ. म. वि. आपटे | 10–00 (प्रत्येक भागास) |
| (10) | भौतिकी मानवशास्त्र | श्री. वि. श्री. कुलकर्णी | 33–00 |
| (11) | कापडावरील रासायनिक प्रक्रिया | डॉ. रा. शं. भागवत | 18–00 |
| (12) | बहुरूपी बहुगुणी कार्बन | डॉ. रा. चं. जोशी | 14–00 |
| (13) | सैद्धान्तिक मृत्तिका बलविज्ञान (श्री. तेरेगाझी लिखित "Theoretical Soil Mechanics" या पुस्तकाचा अनुवाद) | श्री. श. म. भालेराव | 42–00 |

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केंद्रावर मिळतील.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग,
चर्नी रोड, मुंबई–400 004.

व्यवस्थापक,
शासन लेखनसामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद–431 001.

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार,
वडवे बिल्डिंग, पी. वाय. सी. जिमखाना,
पुणे–411 004.

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाइन्स,
नागपूर–440 001.

# सांख्यिकी पुरवणी - 12

# भारतातील बँक व्यवसाय (4)

संकलन : रवीन्द्र दोशी *

## विदेशी बँका

### भारतातील विदेशी बँकांची प्रगती

| वर्ष (डिसेंबर) | बँकांची संख्या | कार्यालयांची संख्या | वर्ष (डिसेंबर) | बँकांची संख्या | कार्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1947 | 15 | 80 | 1977 | 14 | 131 |
| 1957 | 17 | 67 | 1987 | 21 | 136 |
| 1967 | 15 | 111 | 1989 | 21 | 137 |
| 1969 | 15 | 130 | 1990(जून) | 22 | 138 |

### विदेशी बँका : 31 डिसेंबर, 1969

| | बँकेचे नाव | कार्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | अल्गेमेन बँक नेदरलँड एन. व्ही. (जनरल बँक ऑफ दि नेदरलँड्स) | 3 |
| 2 | अमेरिकन एक्सप्रेस इंटरनॅशनल बँकिंग कॉर्पोरेशन | 3 |
| 3 | बँक ऑफ अमेरिका नॅशनल ट्रस्ट ॲन्ड सेव्हिंग्ज असोसिएशन | 3 |
| 4 | बँक ऑफ टोकियो | 3 |
| 5 | बांक नॅशनेल द पॅरिस | 5 |
| 6 | ब्रिटिश बँक ऑफ दि मिडल ईस्ट | 1 |
| 7 | चार्टर्ड बँक | 20 |
| 8 | ईस्टर्न बँक | 4 |
| 9 | फर्स्ट नॅशनल सिटी बँक | 8 |
| 10 | हाँगकाँग ॲन्ड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन | 2 |
| 11 | मर्कंटाईल बँक | 19 |
| 12 | मित्सुई बँक | 1 |
| 13 | नॅशनल ॲन्ड ग्रिंडलेज बँक | 56 |
| 14 | हबीब बँक लि. (पाकिस्तान) | 1 |
| 15 | नॅशनल बँक ऑफ पाकिस्तान लि. | 1 |
| | एकूण | 130 |

* प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि प्रमुख संपादक, ' अर्थसंवाद '.

# विदेशी बँका : 30 जून, 1990

| | बँकेचे नाव | कार्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | ए. एन. झेड. ग्रिंडलेज बँक | 56 |
| 2 | सिटिबँक एन. ए. | 6 |
| 3 | दि हाँगकाँग अँन्ड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन | 20 |
| 4 | स्टॅन्डर्ड चार्टर्ड बँक | 24 |
| 5 | अमेरिकन एक्सप्रेस बँक लि. | 3 |
| 6 | बँक ऑफ अमेरिका नॅशनल ट्रस्ट अँन्ड सेव्हिंग्ज असोसिएशन | 4 |
| 7 | बँक ऑफ क्रेडिट अँन्ड कॉमर्स इंटरनॅशनल (ओव्हरसीज) लि. | 1 |
| 8 | दि बँक ऑफ टोकियो लि. | 3 |
| 9 | दि ब्रिटिश बँक ऑफ दि मिडल ईस्ट | 1 |
| 10 | बांक नॅशनल द पॅरिस | 5 |
| 11 | ड्यूश बँक ए. जी. | 2 |
| 12 | अल्गेमेन बँक नेदर्लंड एन. व्ही. | 3 |
| 13 | बांक इन्डोसुएझ | 1 |
| 14 | बँक ऑफ ओमान लि. | 1 |
| 15 | सोशिएट जनरेल | 1 |
| 16 | ओमान इंटरनॅशनल बँक एस. ए. ओ. | 1 |
| 17 | अबू धाबी कमर्शियल बँक लि. | 1 |
| 18 | दि बँक ऑफ नोव्हा स्कॉटिया | 1 |
| 19 | दि मित्सुई बँक लि. | 1 |
| 20 | सोनाली बँक (बांगला देश) | 1 |
| 21 | दि बँक ऑफ बहरिन अँन्ड कुवेत बी. एस. सी. | 1 |
| 22 | क्रेडिट लिऑनेस (फ्रान्स) | 1 |
| | एकूण | 138 |

टीप : (1) भारतातील पहिली विदेशी बँक चार्टर्ड बँक असून तिने आपले पहिले कार्यालय 1856 मध्ये कलकत्ता इथे उघडले, अमेरिकन एक्सप्रेस या बँकेचे पहिले कार्यालय कलकत्ता येथे 1860 मध्ये उघडले.

(2) ग्रिंडलेज बँक ही पूर्वाश्रमीच्या लॉईड्स बँक, नॅशनल बँक आणि ग्रिंडलेज बँक यांच्या विलिनीकरणातून आता कार्य करीत असून ती भारतातील सर्वात मोठी विदेशी बँक आहे.

(3) विदेशी बँकांच्या कार्यालयांची प्रादेशिक विभागणी विचारात घेतल्यास सुमारे 90 टक्के कार्यालये क्रमाने पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, दिल्ली आणि तामिळनाडूमध्ये केंद्रित झालेली असून या प्रदेशांमध्ये प्राधान्येकरून कलकत्ता, मुंबई, दिल्ली व मद्रास शहरातच त्यांचे केंद्रीकरण झाले आहे.

## विदेशी बँकाचे आर्थिक चित्र ( 31 मार्च 1989 )

| | बँकेचे नाव | एकूण ठेवी ( कोटी रुपये ) | कर्जे / ठेवी गुणोत्तर ( % ) | नफा (कोटी रुपये) |
|---|---|---|---|---|
| 1 | ए. एन. झेड. ग्रिंडलेज बँक | 1,414.8 | 50.9 | 24.76 |
| 2 | सिटिबँक एन. ए. | 1,295.5 | 61.2 | 24.21 |
| 3 | दि हाँगकाँग अँन्ड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन | 782.8 | 71.6 | 17.82 |
| 4 | स्टॅन्डर्ड चार्टर्ड बँक | 608.0 | 67.2 | 6.91 |
| 5 | अमेरिकन एक्सप्रेस बँक लि. | 532.9 | 62.8 | 11.30 |
| 6 | बँक ऑफ अमेरिका नॅशनल ट्रस्ट | 475.6 | 116.3 | 12.15 |
| 7 | बँक ऑफ क्रेडिट अँन्ड कॉमर्स | 310.3 | 70.1 | 3.37 |
| 8 | दि बँक ऑफ टोकियो लि. | 173.7 | 85.4 | 0.35 |
| 9 | दि ब्रिटिश बँक ऑफ दि मिडल ईस्ट | 173.7 | 44.4 | 2.75 |
| 10 | बांक नॅशनेल द पॅरिस | 143.9 | 84.3 | 1.22 |
| 11 | ड्यूश बँक ए. जी. | 97.4 | 79.1 | 1.08 |
| 12 | अल्गेमेन बँक नेदरलँड एन. व्ही. | 88.3 | 70.6 | 2.58 |
| 13 | बांक इन्डोसुएझ | 85.1 | 79.9 | 1.92 |
| 14 | बँक ऑफ ओमान लि. | 72.3 | 57.5 | 0.71 |
| 15 | सोशिएट जनरेल | 63.9 | 111.4 | 0.82 |
| 16 | ओमान इंटरनॅशनल बँक | 44.9 | 103.3 | 2.07 |
| 17 | अबू धाबी कमर्शियल बँक | 29.3 | 65.6 | 0.32 |
| 18 | दि बँक ऑफ नोव्हा स्कॉटिया | 18.3 | 156.8 | 0.50 |
| 19 | दि मित्सुई बँक लि. | 16.0 | 150.0 | 0.88 |
| 20 | सोनाली बँक | 7.7 | 32.5 | 0.43 |
| 21 | दि बँक ऑफ बहरिन अँन्ड कुवेत | 7.2 | 35.3 | 0.10 |
| | **एकूण** | **6,441.5** | **67.9** | **116.23** |

## विदेशी बँकांच्या आर्थिक व्यवहारावर दृष्टिक्षेप

( 31 मार्च, 1989 )

| | तपशील | कोटी रुपये |
|---|---|---|
| 1 | ठेवी | 6,441.5 |
| 2 | घेतलेली कर्जे (बॉरोइंग्ज) | 1,370·0 |
| 3 | गुंतवणुकी | 2,313.0 |
| 4 | दिलेली कर्जे ( ॲडव्हान्सेस ) | 4,378.1 |
| 5 | खेळता निधी | 8,741.9 |
| 6 | उत्पन्न | 1,285.2 |
| 7 | खर्च | 1,169.0 |
| 8 | नफा | 116.2 |
| 9 | प्राधान्य क्षेत्रांना दिलेल्या कर्जाची टक्केवारी | 7.6 |

# सहकारी पतपुरवठा संस्था

## प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था

| वर्ष | संस्थांची संख्या (लक्ष) | सदस्य संख्या (लक्ष) | दिलेली कर्जे (कोटी रुपये) | थकबाकी (कोटी रुपये) | थकबाकीची येणे कर्जाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1948–49 | 1.12 | 44 | 14 | 5 | 23.80 |
| 1958–59 | 1.83 | 119 | 126 | 27 | 20.00 |
| 1968–69 | 1.68 | 292 | 503 | 214 | 34.57 |
| 1978–79 | 0.96 | 525 | 1,458 | 927 | 45.24 |
| 1988–89 | 0.87 | 919 | 4,197 | 2,407 | 38.57 |

## मध्यवर्ती सहकारी बँका

| वर्ष | संस्थांची संख्या | सदस्य संख्या (लक्ष) | दिलेली कर्जे (कोटी रुपये) | थकबाकी (कोटी रुपये) | थकबाकीची येणे कर्जाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1948–49 | 484 | 1.83 | 93 | उ. ना. | – |
| 1958–59 | 402 | 3.41 | 210 | 15 | 11.45 |
| 1968–69 | 341 | 3.40 | 823 | 173 | 26.99 |
| 1978–79 | 338 | 2.70 | 2,432 | 835 | 35.87 |
| 1988–89 | 351* | 3.04 | 7,903 | 2,321 | 24.15 |

उ. ना. = उपलब्ध नाही.

* वास्तवातील संख्या 354 आहे. तथापि जम्मू व काश्मीरमधील 3 बँकांचा पूर्ण तपशील उपलब्ध नसल्याने त्यांना इथे वगळण्यात आले आहे.

## राज्य सहकारी बँका

| वर्ष | संस्थांची संख्या | सदस्य संख्या (लक्ष) | दिलेली कर्जे (कोटी रुपये) | थकबाकी (कोटी रुपये) | थकबाकीची येणे कर्जाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1948–49 | 12 | 0.15 | 22 | उ. ना. | – |
| 1958–59 | 22 | 0.32 | 101 | 6 | 5.94 |
| 1968–69 | 25 | 0.21 | 540 | 18 | 5.03 |
| 1678–79 | 27 | 0.36 | 2,283 | 127 | 8.94 |
| 1988–89 | 28 | 0.54 | 10,159 | 611 | 10.20 |

उ. ना. = उपलब्ध नाही.

## प्राथमिक भूविकास बँका

| वर्ष | संस्थांची संख्या | सदस्य संख्या (लक्ष) | दिलेली कर्जे (कोटी रुपये) | थकबाकी (कोटी रुपये) | थकबाकीची येणे कर्जाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1948–49 | 272 | 1.51 | 1 | 0.4 | 10.00 |
| 1958–59 | 363 | 4.40 | 3 | 0.4 | 2.67 |
| 1968–69 | 740 | 28.42 | 104 | 7.0 | 2.45 |
| 1978–79 | 890 | 56.06 | 170 | 91.0 | 11.43 |
| 1988–89 | 906 | 58.31 | 319 | 267.0 | 12.36 |

## मध्यवर्ती भूविकास बँका

| वर्ष | संस्थांची संख्या | सदस्य संख्या (लक्ष) | दिलेली कर्जे (कोटी रुपये) | थकबाकी (कोटी रुपये) | थकबाकीची येणे कर्जाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1948–49 | 5 | 0.07 | 1 | 0.01 | 0.25 |
| 1958–59 | 15 | 1.40 | 6 | 1.00 | 4.35 |
| 1968–69 | 19 | 6.58 | 144 | 4.00 | 1.01 |
| 1978–79 | 19 | 25.59 | 249 | 166.00 | 11.93 |
| 1988–89 | 18 | 35.48 | 676 | 626.00 | 19.77 |

# सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी बँका (28)

## बँकांच्या कामकाजाचे महत्त्वाचे आर्थिक निर्देशक

(कोटी रुपये)

| | आर्थिक निर्देशक | डिसेंबर 1969 | मार्च 1989 | वार्षिक संयुक्त वृद्धी दर : 1969–89 (टक्के) |
|---|---|---|---|---|
| 1 | भांडवल | 40.68 | 1,591.20 | 20.89 |
| 2 | राखीव निधी | 60.27 | 1,850.50 | 19.75 |
| 3 | खेळता निधी | 5,930 | 1,91,088 | 19.68 |
| 4 | एकूण ठेवी | 4,817 | 1,57,129 | 19.76 |
| 5 | दिलेली कर्जे | 3,285 | 95,402 | 19.04 |
| 6 | उत्पन्न | 345.91 | 20,526 | 23.52 |
| 7 | खर्च | 341.78 | 20,161.30 | 23.48 |
| 8 | नफा | 9.16 | 364.50 | 20.99 |
| 9 | प्राधान्य क्षेत्रांना कर्जे | उ. ना. | 34,841 | — |
| 10 | कर्जे / ठेवी गुणोत्तर (%) | 68 | 61 | — |
| 11 | नफ्याची खेळत्या निधीशी टक्केवारी | 0.15 | 0.19 | — |
| 12 | नफ्याची उत्पन्नाशी टक्केवारी | 1.46 | 1.60 | — |
| 13 | नफ्याची खर्चाशी टक्केवारी | 2.68 | 1.81 | — |
| 14 | कर्मचारी संख्या | 3,10,648* | 8,39,324 | — |

* डिसेंबर 1973.

## बँकांच्या कर्जाचे क्षेत्रनिहाय विवरण

| | क्षेत्र | जून 1969 | | जून 1979 | | जून 1989 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कृषी | 188 | (5) | 2,288 | (12) | 14,133 | (16) |
| 2 | लघुउद्योग | 286 | (8) | 2,252 | (12) | 13,677 | (15) |
| 3 | इतर प्राधान्य क्षेत्रे * | 31 | (1) | 1,137 | (6) | 7,432 | (8) |
| 4 | **सर्व प्राधान्य क्षेत्रे : एकूण** | **505** | **(14)** | **5,677** | **(30)** | **35,242** | **(39)** |
| 5 | मध्यम व मोठे उद्योग | 3,094 | (86) | 7,291 | (38) | 33,735 | (38) |
| 6 | घाऊक व्यापार | | | 1,612 | (8) | 4,919 | (5) |
| 7 | इतर | | | 4,763 | (24) | 15,713 | (18) |
| | **एकूण कर्जे** | **3,599** | **(100)** | **19,343** | **(100)** | **89,609** | **(100)** |

**टीप :** कंसातील आकडे एकूणाशी टक्केवारी दाखवितात.

* यामध्ये वाहतूक व्यावसायिक, स्वयंरोजगारातील व्यक्ती, ग्रामीण कारागीर इत्यादींचा समावेश होतो.

# बँकनिहाय महत्त्वाचे निर्देशक ( मार्च 1989 )

(कोटी रुपये)

| बँक | कार्यालये भारता-तील | कार्यालये विदेशा-तील | ठेवी | कर्जे | नफा | खेळत्या निधीशी नफ्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| **[1] स्टेट बँक गट** | | | | | | |
| [अ] स्टेट बँक ऑफ इंडिया | 7,932 | 42 | 37,334 | 27,969 | 85.01 | 0.15 |
| [ब] **स्टेट बँकेच्या सहकारी बँका** | | | | | | |
| स्टेट बँक ऑफ | | | | | | |
| 1 पतियाळा | 548 | | 2,364 | 1,093 | 6.00 | 0.24 |
| 2 हैदराबाद | 663 | | 1,908 | 1,099 | 3.54 | 0.16 |
| 3 बिकानेर ॲन्ड जयपूर | 662 | | 1,903 | 1,216 | 4.71 | 0.16 |
| 4 त्रावणकोर | 594 | | 1,609 | 1,061 | 4.45 | 0.22 |
| 5 म्हैसूर | 485 | | 1,292 | 762 | 2.81 | 0.19 |
| 6 इंदूर | 320 | | 1,059 | 622 | 2.00 | 0.17 |
| 7 सौराष्ट्र | 311 | | 948 | 570 | 1.82 | 0.17 |
| **7 सहकारी बँकांची बेरीज** | **3,583** | **---** | **11,083** | **6,423** | **25.33** | **0.19** |
| **स्टेट बँक गटाची बेरीज** | **11,520** | **42** | **48,417** | **34,392** | **110.34** | **0.16** |
| **[2] राष्ट्रीयीकृत बँका** | | | | | | |
| [अ] **पहिला टप्पा** (1969) | | | | | | |
| 1 बँक ऑफ इंडिया | 2,080 | 26 | 13,036 | 8,449 | 22.08 | 0.15 |
| 2 पंजाब नॅशनल बँक | 2,752 | | 10,861 | 5,550 | 27.19 | 0.22 |
| 3 बँक ऑफ बडोदा | 2,106 | 48 | 10,735 | 6,291 | 23.50 | 0.20 |
| 4 सेंट्रल बँक ऑफ इंडिया | 2,720 | | 9,493 | 4,733 | 15.20 | 0.14 |
| 5 कॅनरा बँक | 1,946 | 1 | 9,341 | 5,802 | 54.94 | 0.49 |
| 6 युको बँक | 1,751 | 7 | 7,288 | 3,923 | 5.73 | 0.07 |
| 7 सिंडिकेट बँक | 1,474 | 1 | 6,011 | 3,493 | 8.01 | 0.12 |
| 8 इंडियन बँक | 1,165 | 2 | 5,701 | 3,737 | 14.29 | 0.22 |
| 9 इंडियन ओव्हरसीज बँक | 1,152 | 8 | 5,590 | 3,370 | 6.24 | 0.10 |
| 10 युनियन बँक ऑफ इंडिया | 1,740 | | 5,144 | 2,492 | 24.11 | 0.42 |
| 11 अलाहाबाद बँक | 1,509 | | 4,034 | 1,832 | 11.12 | 0.25 |
| 12 युनायटेड बँक ऑफ इंडिया | 1,166 | | 3,998 | 1,938 | 0.50 | 0.01 |
| 13 बँक ऑफ महाराष्ट्र | 1,071 | | 2,842 | 1,520 | 3.12 | 0.10 |
| 14 देना बँक | 1,067 | | 2,698 | 1,408 | 5.73 | 0.19 |
| **14 राष्ट्रीयीकृत बँकांची बेरीज** | **23,699** | **93** | **96,772** | **54,538** | **221.76** | **0.20** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| [ब] दुसरा टप्पा (1980) | | | | | | |
| 1 आंध्र बँक | 906 | | 2,647 | 1,429 | 9.29 | 0.32 |
| 2 विजया बँक | 702 | | 2,107 | 1,240 | 7.95 | 0.31 |
| 3 पंजाब अॅन्ड सिंध बँक | 657 | | 2,101 | 1,029 | 1.04 | 0.05 |
| 4 ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स | 502 | | 2,008 | 999 | 6.51 | 0.30 |
| 5 न्यू बँक ऑफ इंडिया | 567 | | 1,779 | 1,012 | 3.11 | 0.16 |
| 6 कॉर्पोरेशन बँक | 431 | | 1,298 | 763 | 4.50 | 0.30 |
| **6 राष्ट्रीयीकृत बँकांची बेरीज** | **3,765** | **–** | **11,940** | **6,472** | **32.40** | **0.24** |
| **20 राष्ट्रीयीकृत बँकांची बेरीज** | **27,464** | **93** | **1,08,712** | **61,010** | **254.16** | **0.21** |
| **सर्व 28 सार्वजनिक क्षेत्रातील बँका** | **38,984** | **135** | **1,57,129** | **95,402** | **364.50** | **0.19** |

# *खाजगी व्यापारी बँका (अनुसूचित)*

## बँकांच्या आर्थिक व्यवहारावर दृष्टिक्षेप

(कोटी रुपये)

| | तपशील | डिसेंबर 1985 | मार्च 1989 |
|---|---|---|---|
| 1 | कार्यालये (संख्या) | 4,141 | 4,285 |
| | (अ) भारतीय | 4,140 | 4,284 |
| | (आ) विदेशी | 1 | 1 |
| 2 | भाग भांडवल | 12.28 | 21.10 |
| 3 | राखीव निधी | 35.86 | 87.32 |
| 4 | घेतलेली कर्जे | 192.78 | 368.10 |
| 5 | गुंतवणुकी | 1,327.65 | 2,397.17 |
| 6 | ठेवी | 4,489.49 | 7,176.21 |
| 7 | दिलेली कर्जे | 2,468.84 | 3,831.98 |
| 8 | खेळता निधी | 5,052.81 | 8,114.73 |
| 9 | उत्पन्न | 473.93 | 983.26 |
| 10 | खर्च | 466.65 | 973.50 |
| 11 | नफा | 7.28 | 9.85 |
| 12 | कर्मचारी संख्या | 50,822 | 55,898 |
| 13 | कर्ज-ठेवी गुणोत्तर (टक्के) | 54.99 | 53.40 |
| 14 | खेळत्या निधीशी नफ्याची टक्केवारी | 0.144 | 0.121 |

टीप : 1985 मध्ये बँकांची संख्या 30 होती. मे 1988 मध्ये दि ट्रेडर्स बँक लि. ही बँक ऑफ बडोदामध्ये विलिनीकरण झाल्यामुळे खाजगी बँकांची एकूण संख्या तेव्हापासून 29 झाली.

# बँकनिहाय महत्त्वाचे निर्देशक (मार्च 1989)

(कोटी रुपये)

| | बँक | भारतातील कार्यालये | ठेवी | कर्जे | नफा | खेळत्या निधीशी नफ्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | दि जम्मू अँन्ड काश्मिर बँक लि. | 311 | 810.29 | 416.83 | 1.49 | 0.170 |
| 2 | दि वैश्य बँक लि. | 283 | 711.95 | 380.80 | 4.20 | 0.484 |
| 3 | दि बँक ऑफ राजस्थान लि. | 272 | 619.57 | 298.72 | 1.25 | 0.182 |
| 4 | दि फेडरल बँक लि. | 333 | 578.58 | 303.02 | 0.83 | 0.131 |
| 5 | दि साऊथ इंडियन बँक लि. | 300 | 438.97 | 232.80 | 0.47 | 0.098 |
| 6 | कर्नाटक बँक लि. | 270 | 424.43 | 247.41 | 0.80 | 0.167 |
| 7 | दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. | 176 | 397.16 | 209.28 | 0.44 | 0.102 |
| 8 | दि सांगली बँक लि. | 169 | 347.19 | 176.59 | 0.41 | 0.106 |
| 9 | दि कॅथलिक सीरियन बँक लि. | 229 | 344.12 | 182.09 | 0.46 | 0.122 |
| 10 | बँक ऑफ मदुरा लि. | 249 | 299.54 | 193.01 | 1.27 | 0.357 |
| 11 | युनायटेड इंडस्ट्रियल बँक लि. | 146 | 295.16 | 108.60 | –9.75 | –3.084 |
| 12 | दि करूर वैश्य बँक लि. | 155 | 213.12 | 155.75 | 1.05 | 0.383 |
| 13 | भारत ओव्हरसीज बँक लि. | 42(1)* | 192.29 | 130.06 | 0.95 | 0.410 |
| 14 | दि बनारस स्टेट बँक लि. | 92 | 188.36 | 87.26 | 0.57 | 0.280 |
| 15 | तामिळनाडू मर्कंटाईल बँक लि. | 115 | 177.92 | 108.20 | 2.28 | 1.044 |
| 16 | दि लक्ष्मी विलास बँक लि. | 168 | 177.10 | 93.77 | 0.46 | 0.233 |
| 17 | दि नेदुनगडी बँक लि. | 138 | 129.31 | 71.12 | 0.14 | 0.099 |
| 18 | बरेली कॉर्पोरेशन बँक लि. | 55 | 123.75 | 55.68 | 0.27 | 0.194 |
| 19 | सिटी युनियन बँक लि. | 80 | 101.31 | 61.25 | 0.77 | 0.640 |
| 20 | बँक ऑफ तंजावर लि. | 157 | 97.85 | 51.59 | 0.73 | 0.664 |
| 21 | दि धनलक्ष्मी बँक लि. | 124 | 96.02 | 47.99 | 0.08 | 0.077 |
| 22 | बँक ऑफ तामिळनाड लि. | 100 | 94.00 | 58.95 | 0.25 | 0.243 |
| 23 | नैनिताल बँक लि. | 48 | 90.00 | 39.65 | 0.25 | 0.255 |
| 24 | दि बँक ऑफ कराड लि. | 48 | 59.38 | 29.88 | 0.13 | 0.206 |
| 25 | दि रत्नाकर बँक लि. | 57 | 52.21 | 28.41 | 0.02 | 0.033 |
| 26 | दि पूर्वांचल बँक लि. | 40 | 46.49 | 25.52 | 0.02 | 0.036 |
| 27 | लॉर्ड कृष्ण बँक लि. | 66 | 37.43 | 17.59 | 0.02 | 0.050 |
| 28 | दि परूर सेंट्रल बँक लि. | 52 | 25.10 | 12.05 | –0.04 | 0.074 |
| 29 | दि पंजाब को-ऑपरेटिव्ह बँक लि. | 9 | 7.61 | 3.10 | 0.03 | 0.361 |

* कंसातील अंक विदेशातील कार्यालयाच्या संख्येचा निदर्शक आहे.

## भारतीय अनुसूचित व्यापारी बँका

### बँकांच्या लोकसंख्येच्या गटानुसार ठेवी व कर्जे

(कोटी रुपये)

| लोकसंख्या गट | जून 1969 | | | मार्च 1990 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ठेवी | कर्जे | कर्जे–ठेवी गुणोत्तर (%) | ठेवी | कर्जे | कर्जे–ठेवी गुणोत्तर (%) |
| 1 ग्रामीण | 144.96 (3.1) | 54.29 (1.5) | 37.5 | 26,015.98 (15.1) | 16,627.02 (14.6) | 63.9 |
| 2 अर्ध-नागरी | 1,024.06 (22.0) | 406.57 (11.2) | 39.7 | 36,052.87 (20.9) | 18,610.23 (16.3) | 51.6 |
| 3 नागरी | 1,209.17 (25.9) | 722.00 (20.0) | 59.7 | 42,300.67 (24.5) | 24,619.10 (21.7) | 58.2 |
| 4 महानगरे | 2,287.00 (49.0) | 2,426.00 (67.3) | 106.1 | 68,389.01 (39.5) | 53,735.65 (47.4) | 78.6 |
| **एकूण** | **4,665.19 (100.0)** | **3,608.86 (100.0)** | **77.3** | **1,72,758.53 (100.0)** | **1,13,592.00 (100.0)** | **65.8** |

**टीप :** कंसातील आकडे एकूणाशी टक्केवारी दाखवितात.

### संदर्भ सूची


1 **बेसिक स्टॅटिस्टिक्स रिलेटिंग टू दि इंडियन इकनॉमी, व्हॉल्यूम I : ऑल इंडिया,** सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकनॉमी, मुंबई, ऑगस्ट 1990, तक्ते 17.13.1 ते 17.13.5

2 **परफॉर्मन्स ऑफ फॉरेन बँक्स इन इंडिया,** 1988-89, इंडियन बँक्स असोसिएशन, मुंबई, 1990.

3 **सिग्मी इकनॉमिक रिव्ह्यू,** मंथली इकनॉमिक जर्नल ऑफ सिंडिकेट बँक, खंड 36, अंक 1, ऑगस्ट 1990 आणि खंड 36, अंक 2, सप्टेंबर 1990.

4 **प्रायव्हेट सेक्टर बँक्स–हायलाइट्स ऑफ परफॉर्मन्स,** इंडियन बँक्स असोसिएशन, मुंबई, 1987 चा अहवाल (सप्टेंबर 1988) आणि 1988-89 चा अहवाल (जुलै 1990).

5 **पब्लिक सेक्टर बँक्स (की इंडिकेटर्स ऑफ परफॉर्मन्स,** 1969-89), इंडियन बँक्स असोसिएशन, मुंबई, ऑक्टोबर, 1990.

6 रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, **ट्रेड अँन्ड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया ड्युरिंग दि इयर** 1961, स्टेटमेंट 25, पृ. 93.

7 रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, **सप्लिमेंट टू बँकिंग अँन्ड मॉनेटरी स्टॅटिस्टिक्स ऑफ इंडिया,** पार्ट I, जुलै 1964, पृ. 2 आणि 82.

8 रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, **स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टू बँक्स इन इंडिया,** 1969, पृ. 34, 40 आणि 52.

9 रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, **रिपोर्ट ऑन करन्सी अँन्ड फिनान्स** 1988-89, **व्हॉल्यूम I इकनॉमिक रिव्ह्यू,** पृ. 177.

10 रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, **रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिन (पुरवणी),** मार्च 1991, पृ. 41 आणि 83.

# पंधरावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे पंधरावे वार्षिक अधिवेशन 1991 च्या ऑक्टोबर / नोव्हेंबरमध्ये नांदेड येथे आयोजित होणार आहे. डॉ. ज. फा. पाटील, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, अध्यक्षस्थानी असतील.

अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आलेले आहेत :

(1) पैसाविषयक सिद्धान्तातील आधुनिक प्रवाह

(2) भारतातील अनौपचारिक क्षेत्रातील ( informal Sector ) कामगारांच्या समस्या : स्वरूप व उपाय

(3) महाराष्ट्र आणि गोवा राज्यांतील पर्यटन व्यवसाय

चौथा विषय तत्कालीन आर्थिक परिस्थितीशी संबंधित असेल व तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील.

निबंधलेखकांनी जास्तीत जास्त 2000 शब्दात विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 100 शब्दात त्याचा गोषवारा सादर करावयाचा आहे. **निबंधाच्या दोन प्रती पाठवाव्यात.**

निबंध मराठीतच असावेत. **लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता मराठीतच देणे आवश्यक आहे.** चर्चासत्रांसाठी सादर करण्यात येणारे निबंध पूर्वी अन्यत्र कोठेही सादर केलेले वा प्रसिद्ध केलेले नसावेत.

**निबंधलेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा पहा : 'अर्थसंवाद', ऑक्टोबर–डिसेंबर 1990, पृष्ठे 203–12. आणि जानेवारी–मार्च 1991, पृ. 287.**

31 ऑगस्ट 1991 ही निबंध स्वीकारण्याची अखेरची तारीख असून त्यानंतर पाठविलेला निबंध स्वीकारला जाणार नाही

निबंधलेखकांनी आपले निबंध **डॉ. ज. फा. पाटील, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** 416 004 या पत्त्यावर पाठवावयाचे आहेत.

**व्यं. सु. पाटणकर**
कार्यवाह – खजिनदार

# निबंधलेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

(1) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्याअंतर्गत एखादा उप–विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

(2) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वाद–ग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास व त्यातून आपण नवीन अर्थ ( Interpretation ) लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

(3) जी माहिती एम. ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण निबंधात असू नये; कारण, ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

(4) समाजाच्या आर्थिक जीवनाचा ( राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक ) सामाजिक-सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

(5) निबंधातील वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

(6) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

(7) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

(8) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### आजीव सदस्यांची यादी

**( जानेवारी–मार्च 1991 अंकावरून पुढे चालू )**

535 प्रा. एम. टी. पाटील, कोल्हापूर.
536 प्रा. अशोक गोविंद डांगे, सोलापूर.
537 प्रा. टी. एल. बारबोले, इचलकरंजी ( जि. कोल्हापूर ).
538 प्रा. अनिल विनायक गजेंद्रगडकर, सोलापूर.
539 प्रा. नागनाथ रामचंद्र धाराशिवकर, सोलापूर.
540 प्रा. ना. सी. काळे, अमरावती.
541 प्रा. अनिता भोरे, अमरावती.
542 डॉ. सौ. प्रतिभा बोरवणकर, मुंबई.
543 प्रा. का. व. दिवटे, धुळे.
544 प्रा. लक्ष्मण बाबू घोलप, माढा ( जि. सोलापूर ).
545 प्रा. मं. आ. उपासनी, जळगाव.
546 डॉ. सौ. रेणुका मारपकवार, नागपूर.
547 प्रा. पुरुषोत्तम मो. खोटले, वर्धा.
548 प्रा. राधाकृष्णन चाम, नागपूर.
549 प्रा. के. रा. खेरडे, नागपूर.
550 डॉ. संतोष भगवंत सदार, अमरावती.

551 प्रा. महादेव बा. मानकर, नागपूर.
552 प्रा. नामदेव सु. बोरसे, जळगाव.
553 प्रा. दिलीप छ. चव्हाण, जळगाव.
554 प्रा. किशोर देवराम गावंडे, मूर्तिजापूर ( जि. अकोला ).
555 प्रा. सुनंदा विजय अष्टेकर, सांगली.
556 प्रा. आर. के. शेख, पातूर (जि. अकोला).
557 प्रा. आनंद ना. वडस्कर, बल्लारपूर ( जि. चंद्रपूर ).
558 प्रा. शिशिर सिंदेकर, नाशिक.
559 प्रा. गणपत का. सोनवणे, नाशिक.
560 डॉ. सर्वोत्तम न. कुलकर्णी, सटाणा ( जि. नाशिक ).
561 प्रा. सौ. लीला स. कुलकर्णी, सटाणा ( जि. नाशिक ).
562 सौ. सुधा गो. पाटणकर, मुंबई.
563 डॉ. अरुण ह. पाचकवडे, अमरावती.
564 डॉ. वसंत जुगळे, कोल्हापूर.
565 प्रा. अर्जुन सुबराव पाटील, जयसिंगपूर ( जि. कोल्हापूर).
566 प्रा. सौ. जयमाला विलासराव देसाई, जयसिंगपूर (जि. कोल्हापूर).
567 प्रा. श्रीश विश्वनाथ भांडारी, कोल्हापूर.
568 प्रा. मन्मथ भगवानराव मोराळे, जयसिंगपूर (जि. कोल्हापूर).
569 डॉ. सौ. पुष्पांजली पायगोंडराव कोळी, कोल्हापूर.
570 प्रा. धन्यकुमार देवाप्पा मंडपे, हालोंडी (जि. कोल्हापूर).
571 प्रा. सौ. वसुधा प्रभाकर रुईकर, सांगली.
572 श्री. अशोक नामदेवराव सावळे, कोल्हापूर.
573 डॉ. प्रभाकर गोविंद कुलकर्णी, कोल्हापूर.
574 प्रा. चंद्रकांत बाबासाहेब पंडित, कोल्हापूर.

## दुःखद निधन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य, परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे विद्यमान सदस्य आणि जी. टी. पी. महाविद्यालय, नंदुरबार ( जिल्हा धुळे ) येथील अर्थशास्त्राचे प्राध्यापक भ. क. ढाकणे यांचे दिनांक 9 मे, 1991 रोजी मधुमेहाच्या विकाराने दुःखद निधन झाले. ऐन उमेदीत वयाच्या छत्तीसाव्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. मराठी अर्थशास्त्र परिषद त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो !

# ' अर्थसंवाद 'च्या लेखकांसाठी

1 ' अर्थसंवाद ' साठी पाठविलेला लेख अन्यत्र प्रसिद्ध झालेला अथवा अन्यत्र प्रसिद्धीसाठी पाठविलेला नसावा. मात्र एखादा प्रकाशित लेख ' अर्थसंवाद ' मध्ये वाचकांसाठी पुनर्मुद्रित करणे आवश्यक वाटल्यास तसे करण्याचे अधिकार प्रमुख संपादकांना राहतील.

2 परभाषेतील अत्युत्तम लेखांचे अनुवाद ' अर्थसंवाद ' मध्ये प्रसिद्ध होऊ शकतात. मात्र त्यासाठी प्रमुख संपादक यांनी अनुवाद स्वीकृत केल्यानंतर भाषांतर वगैरेचे अधिकार ज्यांच्याकडे असतील त्यांची लेखी अनुमती मिळवून भाषांतरकाराने ती प्रमुख संपादकांकडे पाठविली पाहिजे.

3 लेख वगैरे मजकूर टंकलिखित अथवा सुवाच्य हस्ताक्षरात निदान 1/3 समास सोडून कागदाच्या एकाच बाजूला लिहिलेला असावा. लेखात खाडाखोड टाळावी.

4 पाठविलेला मजकूर प्रकाशित करण्याच्यादृष्टीने परिपूर्ण असावा. लेखाच्या अग्रभागी मथळा देऊन त्याखाली लेखकाने आपले नाव लिहावे. नाव लेखाच्या शेवटी देऊ नये. लेखकाने नावाखालीच आपला हुद्दा आणि संस्था यांचा आवर्जून उल्लेख करावा. ग्रंथ परीक्षणाच्या बाबतीत मात्र प्रस्तुत अंकातील मांडणी पद्धत अनुसरावी.

5 लेखात उल्लेख होणाऱ्या सर्व व्यक्तींचा उल्लेख ( भारतीय वा परकीय, हयात वा दिवंगत ) आदरार्थी बहुवचनी करण्याचा ' अर्थसंवाद ' चा संकेत आहे. त्याप्रमाणे लेखातील व्यक्तींच्या नावामागे ' प्रा. ', ' डॉ. ', ' श्री. ' वगैरे उल्लेखही टाळण्याचा संकेत आहे. लेखकाने या बाबींची विशेष नोंद घ्यावी.

6 ' अर्थसंवाद ' मधील सर्व संख्यांक ( numerals ) आंतरराष्ट्रीय पद्धतीने– उदा० 1, 2, 3, 4, असे–दिले जातील. उपशीर्षकांना अ, आ, इ, ई असे क्रम द्यावेत. लेखकांनी आपल्या सर्व लेखनात याच पद्धतीने लिहावे.

7 लेखात तक्ते असल्यास खालील बाबींविषयी लेखकाने काटेकोर राहावे.
   (अ) प्रत्येक तक्त्यास क्रमांक देऊन त्यातील माहितीची संपूर्ण कल्पना देणारा मथळा द्यावा.
   (आ) तक्त्यातील स्तंभांचे मथळेही परिपूर्ण असावेत.
   (इ) तक्त्यातील माहिती कोठून घेतली याचा पूर्ण संदर्भ मान्य पद्धतीने देणे आवश्यक आहे.

8 लेखात आकृत्या असल्यास त्या पांढऱ्या शुभ्र कागदावर काळ्या शाईने सुबकपणे आरेखित करून तसेच मजकुरातील त्यांचे नक्की स्थळ निर्देशित करून पाठवाव्यात.

9 लेखातील ' संदर्भ टीपा ' लेखाच्या अखेरीस द्याव्यात. त्याचा तपशील लिहिताना तो पुढीलप्रमाणे क्रमशः द्यावा : (अ) **ग्रंथाचा संदर्भ असल्यास** : ग्रंथकर्त्याचे नाव (प्रथम आडनाव), ग्रंथाचे नाव (अधोरेखित), प्रकाशक, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष आणि पृष्ठ क्रमांक. (आ) **लेखाचा संदर्भ असल्यास** : लेखकाचे नाव (प्रथम आडनाव), लेखाचे नाव (अवतरण चिन्हांत), तो लेख प्रसिद्ध झालेले पुस्तक अथवा नियतकालिक याचे संपूर्ण नाव, प्रकाशन वर्ष/महिना/सप्ताह, खंड व अंक क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक. सर्वत्र विरामचिन्हांचा योग्य तो वापर करावा.

10 लेखास ' संदर्भ सूची ' ( Bibliography ) द्यावयाची असल्यास ती ' संदर्भ टीपा ' नंतर द्यावी. सूचीतील सर्व नोंदी ग्रंथकर्ता वा लेखकर्ता यांचे बाबतीत अकारविल्हे आणि यापूर्वी 9 मध्ये उल्लेखिलेल्या आवश्यक तपशीलासह द्याव्यात. ' संदर्भ टीपा ' आणि ' संदर्भ सूची ' मधील सर्व तपशीलाचे लेखन इंग्रजीमध्ये न करता देवनागरी लिपीतच करावे.

11 लेखातील परिभाषा महाराष्ट्र शासनाच्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' नुसार वापरली जावी. तशी न वापरल्यास आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार प्रमुख संपादकांना राहतील. लेखात वापराव्या लागणाऱ्या कोशातील एखाद्या मराठी प्रतिशब्दास लेखकाचा आक्षेप असल्यास त्याने आपली त्याविषयीची भूमिका स्पष्ट करणारे टिपण पाठवावे. त्यातील विवेचनाचा दर्जा 'अर्थसंवाद' मधील साहित्याच्या किमान पातळीएवढा असल्यास ते टिपण 'अर्थ शब्दांची वाट पाहे' या सदरात प्रसिद्ध केले जाईल. **लेखात वापरलेल्या महत्त्वाच्या संज्ञांसाठीचे इंग्रजी प्रतिशब्द कंसात द्यावेत.**

12 लेखकांनी शुद्धलेखनाकडे पुरेसे लक्ष द्यावे. त्यासाठी जरूर तर मो. रा. वाळंबे यांच्या 'मराठी शुद्धलेखन प्रदीप' या पुस्तकाचा वापर करावा.

13 पाठविलेल्या मजकुराची पोच देण्यात येईल. परंतु परतीचे पुरेसे टपाल हंशील लावून स्वतःचा पत्ता लिहिलेला लिफाफा मजकुरासोबत जोडलेला असल्यासच अस्वीकृत मजकुर परत पाठविला जाईल, अन्यथा नाही. लेखकांनी आपल्या लेखाची स्थळप्रत स्वत:कडे राखून ठेवावी.

14 लेख 'अर्थसंवाद' मध्ये प्रसिद्ध झाल्याबर त्यात लेखकास महत्त्वाचे मुद्रणदोष आढळल्यास ते त्याने प्रमुख संपादकांच्या नजरेस आणून द्यावेत. म्हणजे पुढील अंकात चुकीची दुरुस्ती करता येईल.

15 लेखन साहित्याच्या 'अर्थसंवाद' मधील प्रकाशनाबाबत प्रमुख संपादकांचा निर्णय अखेरचा राहील.

16 स्वतंत्र लेख आणि ग्रंथ परीक्षण यांच्याच सुट्या 10 प्रती लेखकांना दिल्या जातील; इतर मजकुराच्या दिल्या जाणार नाही. एखादा लेख दोन वा अधिक लेखकांनी संयुक्तपणे लिहिलेला असल्यास प्रथम क्रमांकाच्या लेखकाकडे त्या प्रती पाठविल्या जातील.


# फाइव्ह आर. इलेक्ट्रॉनिक्स

सर्व प्रकारच्या पॉवर इलेक्ट्रॉनिक्स (व्होल्टेज स्टॅबिलायझर, कट आऊट स्विच, सिंगल फेजिंग प्रिव्हेंटर इत्यादी) उपकरणांचे उत्पादक

**पत्ता : 'मधुसंचय', टिळक पथ, नाशिक** – 422 001
**(दूरध्वनी : 0253 – 79377)**

तुमच्या आशयघन लेखनाला
मुद्रणाचा सुबक आकार देण्यास आम्ही बांधील आहोत.

# हेमंत मुद्रण

थिसीस बाईंडिंग, बुक वर्क, कॉलेज मॅगेझीन, अहवाल, शैक्षणिक मासिके
यांच्या उत्कृष्ट छपाईसाठी.

ब्लॉक नं. 26, प्रतिभानगर मार्केट, सागरमाळ, कोल्हापूर–416 008
फोन (विनंतीवरून) 29692